eJeMe<eekeÀ

ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

Je<e 43 DekeÀ 5 heeve 76 cee®e 2016 ceu³e 20 ©.

## केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७




me j e#ele DeeeLekeÀ Jee{ Dehee#ele keÀe Deen?
[e . S®e. he heeCeoekeÀ j

ieeceeCe hee³eeYele meeJeOee DeeeCe eJeÐeleekeÀ j Ce
en j Cce³e j e³e, Deeveue keÀcee j , hemeve eÜJeoe

(eJeMe<e ueKe)
keÀêe³e DeLemekeÀuhe DeeeCe peueeme®eve
mee.Sme. mee. MeKe j

DeLemekeÀuhe DeeeCe oMeemecee j eue DeeJneve
ncele omeeF


DeLemekeÀuhe DeeeCe keÀ j ÒeCeeuee®ee ieeCele
pe³ele j e³e ®ee0e j e

(HeÀekeÀme)
m ì e ì Dehe: cekeÀ Fve Fe [³eemeeþe he j keÀ
vee j pe yeepehe³ee

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| eve³eecele DekeÀ ceu³e | 22.00 ©He³e |
| eJeMe<eekeÀ | 30.00 ©He³e |
| Jeee<ekeÀ JeieCee | 230.00 ©He³e |
| eÜJeee<ekeÀ JeieCee | 430.00 ©He³e |
| e$eJeee<ekeÀ JeieCee | 610.00 ©He³e |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४३ ❖ ❖ अंक ५ ❖ ❖ मार्च २०१६ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक अॅड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अॅड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ■ संरक्षित आर्थिक वाढ अपेक्षित का आहे? | डी . एच. पै पाणंदीकर | ५ |
| ■ केंद्रीय अंदाजपत्रकाचे वर्गीकरण | प्रा. डॉ. अशोक टिपरसे | ९ |
| ■ एक कल्याणकारी अर्थसंकल्प | प्रा.डॉ.आण्णासाहेब नलवडे | १३ |
| ■ केंद्रीय अर्थसंकल्प आणि महाराष्ट्र | बिरादार जीवन | १६ |
| ■ केंद्रीय अर्थसंकल्प आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. जे.एस. इंगळे | १९ |
| ■ ग्रामीण पायाभूत सुविधा आणि विद्युतीकरण | हिरण्मय रॉय, अनिल कुमार, प्रसून द्विवेदी | २५ |
| ■ केंद्रीय अर्थसंकल्प आणि जलसिंचन (विशेष लेख) | सी.एस. सी. शेखर | ३० |
| ■ अर्थसंकल्प आणि देशासमोरील समस्या | हेमंत देसाई | ३४ |
| ■ अर्थसंकल्पामुळे बँकिंग क्षेत्राला संजीवनी मिळेल का ? | एन.आर.भानूमूर्ती, मनीष प्रसाद | ३८ |
| ■ जेंडर बजेट तरतुदी | डॉ. शाहीन राझी | ४२ |
| ■ अर्थसंकल्प आणि करप्रणालीची गणिते | जयंत रॉय चौधरी | ४५ |
| ■ स्टार्टअप: मेक इन इंडियासाठी पूरक | नीरज बाजपेयी | ४८ |
| ■ शाश्वत विकासात शेती, शेतकऱ्यांचे स्थान व अर्थसंकल्प | प्रा.डॉ.बालासाहेब किलचे | ५२ |
| ■ ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकास पंखांना बळ | प्रा.डॉ.शिवाजी भ.यादव | ५५ |
| ■ भारतीय रेल्वे अर्थसंकल्प २०१६-१७ | प्रा. दत्तात्रय आण्णा होनमाने | ६० |
| ■ रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर "प्रभू" कृपा | कैलास कोरडे | ६६ |
| ■ आर्थिक विकास आणि हवामानातील बदलाची किंमत | पुर्णमिता दास गुप्ता | ७० |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# संपादकीय

## 'सर्वांगिन विकासाचा अर्थसंकल्प'

देशांतर्गत आणि विदेशातील स्थिती पाहता यंदाच्या अर्थसंकल्पाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्या पार्श्वभूमीवर अर्थमंत्री अरुण जेटली यांनी मांडलेला अर्थसंकल्प सर्वांना सुखावणारा ठरला. शेती आणि ग्रामीण विकास तसेच पायाभूत सुविधांवर अर्थसंकल्पात विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

आर्थिक विकास व रोजगारवाढ तसेच 'मेक इन इंडिया'करिता देशी उत्पादनास प्रोत्साहन ही अर्थसंकल्पाची आणखी काही उद्दिष्टे म्हणता येतील.करांची फेररचना व सुगमीकरणाबाबत अनेक उपाययोजना या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या आहेत.

अर्थमंत्र्यांनी पायाभूत क्षेत्रासाठी मोठी तरतूद करून अंतर्गत वाहतूकही खुली केली आहे. तसेच 'स्टार्टअप' उद्योगांना पहिली तीन वर्षे कोणताही कर लागू न करण्याचे स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. नव उद्योजकांना त्याचा लाभ होऊन उद्यमशीलता वाढीस लागण्यास त्याची मदत होणार आहे.

२०२५-१६ साठीची तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ३.%९एवढी राखण्यात आली आहे. २०१६-१७ मध्ये ती ३.५%व २०१७-१८ मध्ये ३%वर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अर्थसंकल्पात रस्ते व रेल्वे यांच्यासाठी मिळून २ लक्ष १८ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे.रस्ते बांधणीसाठी एकंदर ९७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ५५ हजार कोटी रुपयांचा निधी सरकारकडून देण्यात आला आहे तसेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) करमुक्त बॉण्ड्सच्या माध्यमातून १५ हजार कोटी रुपयांचा निधी उभारू शकते. शिवाय या योजनेतच तरतूद करण्यात आलेला २७ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारांनी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत (पीएमजीएसवाय) निर्माण करायचा आहे.

सार्वजनिक खर्चात वाढ करून,नवीन पायाभूत निधी तयार करून आणि मजबूत,पारदर्शक खाजगी- सरकारी भागीदारी अर्थातपीपीपी प्रारूपासाठी पाया रचून केंद्र सरकार प्रदीर्घ काळापासून विकासाच्या मार्गात अडथळा बनू पाहणाऱ्या आव्हानावर मात करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यातून दिसून येते.

अर्थमंत्र्यांनी अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राला समान महत्त्व दिले आहे. पायाभूत गुंतवणकीसह सामाजिक आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये गुंतवणूक,आरोग्यविमा,शेतकरी उत्पन्न योजना,शिक्षण आणि कौशल्य विकास तसेच अर्थमंत्र्यांनी अतिशय गरज असलेल्या आर्थिक आणि नियामक उपायांकडे लक्ष दिले आहे,जसे आर्थिक सुधारणा, उद्योग सुलभीकरणासाठी निर्णयप्रक्रियेत बदल, आर्थिक शिस्त आणि करसुधारणा.

केंद्रीय अर्थसंकल्प२०१६-१७मध्ये नियोजन, अंदाजपत्रक आणि हिशेब तपासणी (ऑडिटींग) याद्वारे सर्वांना (स्त्री-पुरुष) समप्रमाणात न्याय मिळेल यावरही भर दिला आहे. महिला सबलीकरणाची राष्ट्रीय मोहीम (नॅशनल मिशन फॉर एम्पावरमेन्ट ऑफ वुमेन) यासाठी सरकारने दुप्पट म्हणजे ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महिला आणि बालकल्याण मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोग यांच्यासाठीही तरतूद वाढवण्यात आली आहे. ग्रामीण भागात रोजगार पुरवणाऱ्या योजनेसाठी सरकारने२०१६-१७च्या अर्थसंकल्पात ११ टक्के वाढीव तरतूद केली आहे.

२०१६-१७ मध्ये मनरेगासाठी ३८,५००कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही आतापर्यंत मनरेगावर खर्च केली जाणारी सर्वात मोठी रक्कम असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे.महिलांसाठी एलपीजी जोडणी पुरवण्याच्या घोषणेवरुनही या अर्थसंकल्पाचा कल लक्षात येतो. गरीब कुटुंबातील महिलेला एलपीजी जोडणी दिली जाणार आहे. २०१६-१७मध्ये एलपीजी जोडणीसाठी २,०००कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे उद्यमशीलतेच्या माध्यमातून सबलीकरण करण्यात येणार आहे. यासाठी२०१६-१७च्या केंद्रीय अर्थसंकल्पात स्टँड अप इंडिया योजनेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय केंद्र (नॅशनल हब) निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे.

■■■

# संरक्षित आर्थिक वाढ अपेक्षित का आहे?

डी . एच. पै पाणंदीकर



***चालू आर्थिक वर्षाची महत्वाकांक्षी घोडदौड पाहता या सर्वेक्षणाने आर्थिक विकास दर ७ ते ७.५% इतका निश्चित केला आहे. मात्र सध्याची जागतिक अर्थव्यवस्थेची दुरावस्था पाहता, इतका दर खरच अपेक्षित नाही. यदाकदाचित पुढील वर्षी अनुकूल चित्र अपेक्षित असेल. मात्र या अनिश्चिततेदरम्यान, भारत मात्र आर्थिक उलाढालीतील स्थैर्याला नकार दर्शवत अधिकतम अविचल आणि सापेक्ष विकास दराचा पुरस्कार करत आहे. भविष्यात येत्या काळात ८ ते १०% विकासदराला स्पर्श करण्याची क्षमता आजही आपल्या भारतात आहे.***

आर्थिक सर्वेक्षणाने २०१६-१७ च्या अर्थसंकल्पाच्या चौकटीमागची पार्श्वभूमी रेखाटली आहे. हे सर्वेक्षण वस्तुनिष्ठ आहे आणि चालू आर्थिक अर्थस्थितीचे हे पुनरावलोकन करते. सोबत अर्थव्यवस्था ज्या सूज्ञ पवित्र्यावर उभी आहे, त्या विस्तृत धोरणांना सूचित करते आहे. हे अंदाजपत्रक अर्थव्यवस्थेच्या थोडं पुढं जाऊन राजकीय समजांना भिडताना दिसत आहे. तसेच प्राधान्य देता येण्याजोगे खर्च आणि संसाधने गतीशील करण्याकडेही या अर्थसंकल्पाचा कल आहे. अर्थमंत्रालयाद्वारा प्रकट झालेल्या, विविध खात्यांच्या दृष्टीकोनांना, हे सर्वेक्षण आणि अर्थसंकल्प उभारणी देतो आहे.

चालू आर्थिक वर्षाची महत्वाकांक्षी घोडदौड पाहता या सर्वेक्षणाने आर्थिक विकास दर ७ ते ७.५% इतका निश्चित केला आहे. मात्र सध्याची जागतिक अर्थव्यवस्थेची दुरावस्था पाहता, इतका दर खरच अपेक्षित नाही. यदाकदाचित पुढील वर्षी अनुकूल चित्र अपेक्षित असेल. मात्र या अनिश्चिततेदरम्यान, भारत मात्र आर्थिक उलाढालीतील स्थैर्याला नकार दर्शवत अधिकतम अविचल आणि सापेक्ष विकासाचा दराचा पुरस्कार करत आहे. भविष्यात येत्या काळात ८ ते १०% विकासदराला स्पर्श करण्याची क्षमता आजही आपल्या भारतात आहे.

इतरत्र मात्र हे चित्र काहीसे निराशाजनक दिसते. जपान व युरोप आर्थिक मंदीच्या उंबरठ्यावर आहेत. मागील २०१५ च्या तिमाहीत अमेरिकेची आर्थिक वाढ ही खुंटलेली पाहावयास मिळते. इतकेच नव्हे तर 'ब्रिक्स' देशांतही या समस्या आहेत. ब्राझील आणि रशिया यांचा विकास दर ४% असा निर्देशित होत असून दक्षिण आफ्रिकेतही समान परिस्थिती पाहावयास मिळते. चीनचा विकास दर १०% हून थेट ६.५ % पर्यंत कोसळला आहे.

संपूर्ण जगामध्ये असा एकही देश नाही ज्याला ही झळ पोहोचली नसेल. व्यापार आणि गुंतवणुकीच्या दुव्याने सारे देश एकमेकांशी जोडले गेले आहेत. आर्थिक विकासासाठी जे देश निर्यातीवर निर्भर आहेत, असे देश या आर्थिक घोडदौडीच्या शर्यतीतून केव्हाच बाहेर फेकले गेले आहेत. भारताचे विकासधोरण सुरुवातीच्या काळात आयात पूरक होते. मात्र सन १९९१ च्या सुधारणांनंतरही त्याचे पर्यवसन निर्यात धार्जिण्या देशामध्ये झाले नाही. आणि

आता तेच प्रयत्न आज 'मेक इन इंडिया' या नव्या रुपात अधिक वैविध्याने होताना दिसतात. देशांतर्गत उत्पादनांवर भर असल्याने आपली जगाबरोबर बांधलेली गाठ थोडी सैल आहे. हे सर्वेक्षण या मुद्यांवर अंगुलीनिर्देश करते की, जागतिक अर्थवाढीचा एक टक्का घसरण भारताच्या अर्थवाढीवर ०.२% इतका प्रभाव टाकते. मात्र २००८-०९ सारख्या घटना या अधिक धोकादायक असू शकतात.

जागतिक अर्थवातावरणातील औदासिन्यातही भारताची शाश्वत आर्थिक वाढ कशी काय?

येथे सर्वेक्षण, आर्थिक वाढीला उत्तेजन देणाऱ्या छोट्या घटकांकडे निर्देश करते, ज्यात बऱ्याच बाबी अंर्तभूत आहेत, जसे की, केंद्रातील अल्प प्रमाणात झालेले भ्रष्टाचारनिर्मूलन, थेट परदेशी गुंतवणुकीला वाव, व्यवसायातील खर्चांना कात्री, जन धन योजना आणि इतर सामाजिक महत्वपूर्ण योजना. मात्र या उपाययोजनांचा गुंतवणुकीवर फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही.

राष्ट्रीय उत्पन्नात १५ ते १६% इतका वाटा उचलत असताना उद्योगक्षेत्र स्थिर मार्गक्रमण करत आहे, असे दिसते. उद्योग समूहांनी आपली वाटचाल चालू ठेवली खरी परंतु चालू वर्षात त्यांच्या नफ्यात घट झालेली आहे. उत्पादन क्षमता असूनही मागणी अभावी क्षमतेचा वापर झालेला नाही. उद्योग क्षेत्र आणि भांडवलपुरवठेदार बँका यांवर आजमितीला मोठा ताण आहे.

काही क्षेत्रे मात्र फारच उत्तम गतिशीलता दाखवत आहे यात शंकाच नाही. सेवा समूह देखील अर्थव्यवस्थेला चांगलीच उभारी देत आहे. वित्तपुरवठा आणि वितरण उत्साहवर्धक आहे. 'स्टार्ट अप्स'नी भारतात नवीन रुजवात करण्यासाठी वाव शोधला आहे. थेट परदेशी गुंतवणुकीत फार काही मोठ्या प्रमाणात वाढ झाली नसली तरी त्यांनी गती कायम राखली आहे. खरेतर सुरुवातीच्या अधिकतम गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेला विविधांगी चालना मिळालेली आहे.

अर्थव्यवस्थेला पुन्हा झंझावात देण्यासाठी महत्वाचे हे की बाजारपेठेत 'मागणी' पुन्हा निर्माण झाली पाहिजे. त्यातील एक प्रभावशाली मार्ग म्हणजे सार्वजनिक क्षेत्राने, पायाभूत सोयी सुविधांत गुंतवणूक केली पाहिजे. कारण

***राष्ट्रीय उत्पन्नात १५ ते १६% इतका वाटा उचलत असताना उद्योगक्षेत्र स्थिर मार्गक्रमण करत आहे, असे दिसते. उद्योग समूहांनी आपली वाटचाल चालू ठेवली खरी परंतु चालू वर्षात त्यांच्या नफ्यात घट झालेली आहे. उत्पादन क्षमता असूनही मागणी अभावी क्षमतेचा वापर झालेला नाही. उद्योग क्षेत्र आणि भांडवलपुरवठेदार बँका यांवर आजमितीला मोठा ताण आहे.***

त्याला भविष्यात बराच वाव असून त्याचा विस्तृत आणि विविधांगी परिणाम साधला जाईल.

खाजगी क्षेत्रातील कूर्मगती गुंतवणुकीचे एक कारण म्हणजे येथील व्याजाचा अधिकतम दर. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अगोदरच्या काळात व्याजाचे दर वाढवण्यावर भर दिला होता, याचे कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील चलनफुगवटा. परिणामत: २०१०-११ नंतरची ४ वर्षे या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी खर्ची पडली. याच काळात गुंतवणुकही मोठ्या प्रमाणावर होत होती, त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण आला नाही. कृषी क्षेत्रातील अपुरा पुरवठा, त्यातही बागायती क्षेत्रातून झालेला कमकुवत पुरवठा ही प्रामुख्याने महागाईची कारणे होती.

या दोन वर्षांत महागाई आटोक्यात आली आहे. घाऊक पातळीवर तर महागाई ऋण निर्देशात असून किरकोळ पातळीवर ती ६% हूनही खाली आली आहे. परिणामत आरबीआयने रेपो रेट ६.७५% पर्यंत राखला असून सुध्दा व्यापारी बँकांनी कर्जे घेणाऱ्यांना पुरेसे प्राधान्य दिलेले दिसत नाही.

आर्थिक सर्वेक्षण हेच सुचवते की, व्याजदर काही अंशाने कमी करावेत आणि कर्जपुरवठ्यासाठी तरलता (रोकड्यात रुपांतर करण्याची सुलभता- लिक्विडीटी) आणावी त्यामुळे विकासाला खूप चालना मिळेल.

भारताने निर्यातीला पूर्वीही आणि आताही अर्थव्यवस्थेचा चालक या दृष्टीने पाहिलेले नाही. असे असूनही निर्यात ही महत्वाची आहेच कारण, उद्योगजगतामध्ये विक्रीचा तब्बल १२% सरासरी हिस्सा हा निर्यातीने व्यापला आहे. गेल्या १४ महिन्यांत निर्यातीमध्ये लक्षणीय घट झाल्याने जागतिक उत्पन्नावर खूप परिणाम जाणवत आहे. शिवाय, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचा वाढता व्याजदर हेच सुचित करतो की, भविष्यात यात अजून वाढ होणार असून त्यामुळे जगातील जवळपास सर्वच चलनांमध्ये घसरण होणार आहे. काहींमध्ये ही घसरण अधिक प्रमाणात असेल तर काहींमध्ये कमी. रुपया सर्वात निम्न नोंदीत असलेल्या

निर्देशांकाच्याही खाली गडगडला आहे मात्र या पलिकडे निर्यातीला तो पाठबळ देत नाही. याचे कारण म्हणजे इतर स्पर्धक देशांच्या तुलनेत ना आपला नफा अधिक आहे ना त्यांच्या चलनाची घसरण जास्त आहे. या दरम्यान आरबीआयला या चलन द्वंद्वात, 'रुपया'ची स्पर्धात्मक धार कायम ठेवत कुठेतरी स्थिरता आणावी लागणार आहे. सर्वेक्षण या बाबतीत सावध धास्ती व्यक्त करते.

आयात व्यापारात वाणिज्य निर्यातीत घट होऊन सुध्दा चालू खात्यातील तूट केवळ १.१ % इतकीच आहे. यामागील कारण हेच की, सेवा निर्याती (माहिती तंत्रज्ञान आणि निगडीत सेवा) यांकडून काही प्रमाणात मिळणारा पाठिंबा आणि अंशत आयातीकडून मिळालेला लाभ कारणीभूत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात घटलेल्या खनिजतेलाच्या किमती हा आपल्या आयातीच्या दृष्टीने लाभाचा विषय आहे. सर्वेक्षण अशी अपेक्षाही करते, की चालू आर्थिक वर्षात तेलाचा दर भारताला प्रति बॅरल ४५ डॉलर इतका असला तरी येत्या काळात २०१६-१७ मध्ये तो ३५डॉलर प्रति बॅरल इतका माफक असेल.

मूळ प्रश्न असा आहे की, धोरणावलंबनात त्वरित तथा तुल्य वाढ राखण्यासाठी कोणत्या आवश्यक बाबींचा पुरस्कार केला पाहिजे? अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प दृढ करण्याची व आर्थिक तूट कमी करण्याची निवड केली असल्याने नियोजित दर राष्ट्रीय उत्पादनाच्या ३.५% इतका निश्चित केला आहे. मात्र, सार्वजनिक क्षेत्रात मागणी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबरीने आक्रमक सुधारणांचा भडिमारही झाला पाहिजे.

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये (ओ आर ओ पी) म्हणजे 'समान पदाकरिता समान निवृत्ती वेतना'साठीच्या खर्चाकरिता भरीव तरतूद करावी लागली आहे. त्याच प्रमाणे सातव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या वेतन आणि भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आली. असे असताना खर्चाकरिता सुचविलेल्या रकमांकडे पहाता त्या विकासाला मारक आहेत. सर्वेक्षणामध्ये निर्देशित केलेल्या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आर्थिक तरतूदींमध्ये वाढ सुचविण्यात आली आहे.

त्यातील पहिले आहे शिक्षण क्षेत्र. शिक्षणाशिवाय कामगार जे काम करतात त्यामध्ये उत्पादकता कमी असते त्याचाच परिणाम महणून त्याला वेतनमानही कमी मिळते.

दुसरे म्हणजे आरोग्य. जो आरोग्यवान असतो त्याची उत्पादकता चांगली असते. त्याचा आरोग्यावरचा खर्च कमी असतो, म्हणजेत त्याची खर्चाची मात्रा अधिक असते.

शिक्षण आणि आरोग्य त्यांच्या एकत्रिकरणातून विकासासाठीचे सॉफ्टवेअर तयार होते आणि म्हणून सर्वेक्षणात निर्देश केल्याप्रमाणे विकासाचे महत्व अधोरेखित होते. याचा अनुभव अनेक देशाना आला आहे.

तिसरे क्षेत्र आहे कृषीक्षेत्र. सर्वेक्षणामध्ये अधिक उत्पादनाकरीता तसेच अन्नसुरक्षेकरिता, जनुकिय सुधारित पिके, सुधारित जलसिंचन योजना, कृषीक्षेत्रातील यांत्रिकीकरण, बाजारव्यवस्था तसेच कृषी निविष्ठा याबद्दल भाष्य केले आहे.

अर्थसंकल्पामध्ये, अनुत्पादित किंवा कमी उत्पादित खर्चावर, विशेषत: अनुदानासंदर्भामध्ये, खर्चावर नियंत्रण ठेवण्याकरिता प्रयत्न केलेले दिसत नाहीत. सर्वेक्षणात याच समस्येवर भाष्य केले गेले होते. जी अनुदाने नियोजित उपेक्षित वर्गासाठी दृष्टीकोन ठेवून तयार केली जातात ती त्यांच्या पर्यंत पोहचतच नाहीत.

या सर्वेक्षणात दोन महत्वाच्या सुचना करण्यात आल्या आहेत. त्यातील पहिली अशी की, जी अनुदाने समाजातील 'आहे रे' वर्गासाठी पोहचवली जातात, ती बंद करण्यात यावीत. उदाहरणार्थ, बचत खात्यातील योजनांमध्ये दिली जाणारी सूट, स्वयंपाकाच्या गॅसवरील करामधील सूट, रेल्व, वीज, हवाई इंधन, सोने तसेच रॉकेल वरील सूट इ. एकंदरीत या सवलतींचा आढावा घेता सुमारे एक लाख कोटी सूट दिली जाते असे निदर्शनास येते.

दुसरे म्हणजे, कृषीक्षेत्रातील धनाढ्य शेतकऱ्यांना दिली जाणारी कृषी उत्पन्नावरील सूट व खतांवरील अनुदानाचे सुसुत्रीकरण.

वरवर पहाता, या सूचना अर्थमंत्र्यांच्या पचनी पडतीलच असे नाही, याचे कारण त्यांना एकतर लोकसभेमध्ये विरोधी पक्षाला तोंड द्यावे लागणार आहे तसेच येऊ घातलेल्या विधानसभांच्या निवडणुका त्यांच्या पक्षालाही लढवायच्या आहेत. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे, राष्ट्रीय विकासाचा विचार करता ज्या गोष्टींची अंमलबजावणी होणे, अपेक्षित आहे. त्या बाबी राज्यसभेमध्ये स्विकारल्या गेल्या नाहीत.

करमहसुलातून खर्चांकरिता जास्तीत जास्त तरतूद करावी लागेल. आता अगदीच गरज पडली तर कर्ज काढून तरतूद करावी लागेल. सर्वेक्षणामध्ये जी काही माहिती प्रसिध्द झाली आहे त्यावरुन भारत हा कमीतकमी करप्रणाली असलेला

देश आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या १६.६% इतके करमहसुलाचे गुणोत्तर (रोखता प्रमाण) आहे. ब्रिक्स देशांचा विचार करता चीन मध्ये हे प्रमाण १९.४%, रशियामध्ये २३%, दक्षिण आफ्रिकामध्ये २८.८% आणि ब्राझिलमध्ये ३५.६% आहे.याचा अर्थ असा नव्हे की, या देशाच्या तुलनेत आपले दरडोई उत्पन्न कमी आहे. सर्वेक्षणामध्ये हे ही निदर्शनाला आले आहे की, दरडोई उत्पन्नाच्या या करमहसूलाचे प्रमाण कितीतरी पट कमी असून, गेल्या २५ वर्षांमध्ये, दरडोई उत्पन्नापेक्षा करावर दिलेल्या सवलतीच्या मर्यादेचा वेग अधिक आहे.

विशेष करुन चार अशा सुधारणांना वाव आहे की ज्यामुळे नाट्यमय परिवर्तन घडू शकेल. खाजगी तसेच सार्वजनिक गुंतवणुकी दरम्यान भूमी अधिग्रहण कायदा अडसर बनू पाहतोय. भूसंपादनाच्या अडथळ्यांमुळे, २५ % प्रकल्प रोखून ठेवण्यात आहे. सेवा वस्तू विधेयकावर अनेक वेळा चर्चा झाली आणि आजही ते संशयाच्या भोवऱ्यातच सापडलेले आहे. हे विधेयके जर संमत झाले असते तर राष्ट्रीय उत्पन्नात १ % ची भर पडली असती. थेट परकीय गुंतवणुकीला अडथळा आहे तो मुक्त प्रवेशाचा. याचा अर्थ मुक्तपणे बाहेर पडणे असाही होतो, परंतु या विधानाच्या दुसऱ्या बाजूने विचार करता, प्रवेशा संबंधी प्रश्नचिन्ह निर्माण होते. शेवटचे म्हणजे कामगारांविषयक धोरण. या सर्वेक्षणात नमूद केल्याप्रमाणे कामगार विषयक धोरणात बदल व्हावयास हवा आणि उत्तम दर्जाच्या संधी कशा काय निर्माण केल्या जावू शकतात यावर भर असावयास हवा.

विकासाला गती देण्याकरिता तसेच स्थिरता येण्याकरिता, कोणते मार्ग अनुसरता येतील याविषयी सर्वेक्षणात सुचविलेले काही मुद्दे खालील प्रमाणे-

१. विकास हा जास्तीत जास्त देशांतर्गत मागणीवर अवलंबून असायला हवा. या करिता पायाभूत सुविधांवर अधिकतम भर द्यायला हवा.
२. सोन्यावर, लघुबचत योजनांनावर तसेच निवृत्तीवेतनावर दिल्या जाणाऱ्या सवलती या बहुतांशी उच्च उत्पन्न गटाला मिळत असल्यामुळे त्यावरील अनुदाने तातडीने थांबवायला हवीत. यांच्या लाभापोटी सुमारे १ लाख कोटी रुपये खर्चले जातात.
३. व्यक्तीगत करांची व्याप्ती वाढवावयास हवी ज्यायोगे व्यक्तीगत आयकर प्रणालीत मिळणाऱ्या सवलतींना मर्यादा येतील.
४. शिक्षण, आरोग्य आणि कृषी क्षेत्रातला अधिकाधिक प्राधान्यक्रम द्यायला हवा.
५. धनाढ्य कृषी उत्पादकांचे कृषी उत्पन्न करांच्या जाळ्यात आणायला हवे.
६. खतांवरील अनुदाने नियंत्रित करायला हवीत कारण त्याचा फायदा धनाढ्यांना होतो आहे.
७. रिझर्व्ह बँकेने आपल्या भांडवलाचे प्रमाण १६% पर्यंत आणून तो पैसा सार्वजनिक बँकामधील भांडवलांपैकी 'बँकींग क्षेत्रातल्या पुर्नबांधणी' करिता वापरायला हवा.
८. उच्च दर्जाने रोजगार निर्माण व्हावे म्हणून कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करायला हवी.

***सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये (ओ. आर. ओ.पी.) म्हणजे 'समान पदाकरिता समान निवृत्ती वेतना'साठीच्या खर्चाकरिता भरीव तरतूद करावी लागली आहे. त्याच प्रमाणे सातव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या वेतन आणि भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आली. असे असताना खर्चाकरिता सुचविलेल्या रकमांकडे पहाता त्या विकासाला मारक आहेत. सर्वेक्षणामध्ये निर्देशित केलेल्या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आर्थिक तरतूदींमध्ये वाढ सुचविण्यात आली आहे.***

हे सर्वेक्षण विकास क्षमतेचा पूर्ण दीर्घकालीन परामर्श घेऊन, मूळ अर्थशास्त्रीय निष्कर्षावर आधारित विकासाच्या मुद्दयांवर येऊन पोहोचले आहे. मात्र, उपरोक्त उपाययोजना दीर्घकालात अधिकोत्तम आर्थिक वाढीसाठी योग्य आणि पोषक वातावरण निर्माण करण्याविषयी सुचवतात. ७ ते ७.७५ % आर्थिक वाढ ही या सर्वेक्षणास जरी अपेक्षित असली तरीही ती उपरोक्त उपाययोजनांवर आधारित आहे. या उपायांची अंमलबजावणी झाली नाही तर हे केंद्रीत लक्ष्यही साध्य होणार नाही. म्हणूनच हे सर्वेक्षण सावधपणा बाळगत आहे, जेणेकरुन यापुढे चुका टाळता येतील, व आर्थिक घोडदौड सुरु राहील.

■■■

*लेखक आर्थिक विषयाचे अभ्यासक असून 'आरपीजी फौंडेशन'चे अध्यक्ष आहेत.*
email: panandiker@hotmail.com

# केंद्रीय अंदाजपत्रकाचे वर्गीकरण

प्रा. डॉ. अशोक टिपरसे



***घटनेनुसार अर्थसंकल्पाला 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' असे म्हटले आहे. अंदाजपत्रकात सार्वजनिक खर्च, सार्वजनिक महसूल यांचा प्रामुख्याने सवमावेश केला जातो. अंदाजपत्रकाला अर्थसंकल्प असेही म्हटले जाते. एखाद्या राष्ट्रात आगामी वशांमध्ये कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करावयाचे आणि जमा केलेले उत्पन्न वेगवेगळया, क्षेत्रामध्ये कशा पध्दतीने खर्च करावयाचे याचा अराखडा म्हणजे अर्थसंकल्प होय.***

अर्थसंकल्प हा लोकशाहीचा महत्वाचा भाग आहे. अर्थसंकल्पाच्या एक दिवस अगोदर आर्थिक सर्वेक्षण अहवाल जाहीर होतो. अर्थसंकल्प हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेत ११२ अन्वये जाहीर केला जातो. तर २०२ व्या कलामानुसार राज्य सरकारचा अंदाजपत्रक मांडला जातो भारतीय राज्यघटनेत कुठेही 'बजेट' असा शब्द नाही घटनेनुसार अर्थसंकल्पाला 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' असे म्हटले आहे. अंदाजपत्रकात सार्वजनिक खर्च, सार्वजनिक महसूल यांचा प्रामुख्याने सवमावेश केला जातो. अंदाजपत्रकाला अर्थसंकल्प असेही म्हटले जाते. एखाद्या राष्ट्रात आगामी वशांमध्ये कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करावयाचे आणि जमा केलेले उत्पन्न वेगवेगळया, क्षेत्रामध्ये कशा पध्दतीने खर्च करावयाचे याचा अराखडा म्हणजे अर्थसंकल्प होय. केंद्रीय अर्थमंत्री देशाचे अंदापत्रक हे फेब्रुवारी महिण्याच्या अखेरीस लोकसभेत सादर करतात तदनंतर त्यावर सुचना, दुरुस्त्या नविन प्रस्ताव मागविले जातात. भारताच्या दृष्टीकोणातून विचार केल्यास आपल्या देशात केंद्र सरकार, राज्यसरकार व स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत प्रत्येक वर्षासाठी अंदाज पत्रक तयार केले जाते. थोडक्यात अंदाज पत्रक आर्थिक नियोजन प्रक्रियेतील महत्वाचे साधन असते. अर्थसंकल्प हे केवळ सार्वजनिक उत्पन्न-खर्चाचे विश्लेषण असत नाही तर अर्थसंकल्पाचा प्रभाव हा देशाच्या उत्पादन व्यवस्थेवर, उत्पन्नाच्या पुर्नवितरणावर आणि देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासावर फार मोठया प्रमाणात पडत असतो

**अंदाजपत्रकाचे वर्गीकरण**


अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. १.शिल्लकी अंदाज पत्रक २. तुटीचे अंदाजपत्रक ३. संतुलित अंदाजपत्रक हे अंदाजपत्रकाचे सर्वसाधारण प्रकार आहेत. केंद्र सरकारच्या उत्पन्न व खर्चाच्या बाबीचा विचार केल्यास केंद्रीय अर्थसंकल्पाचे वर्गीकरण दोन प्रकारात करण्यात येते. १. महसूली अंदाजपत्रक २. भांडवली अंदाजपत्रक

**१. महसूली अंदाजपत्रक** - ज्या अंदाजपत्रकात सरकारच्या प्रामुख्याने

चालू किंवा महसूली स्वरूपाचे उत्पन्न आणि चालू किंवा महसुली खर्चाचा समावेश होतो. तेंव्हा त्याला महसूली अंदाज पत्रक असे म्हणतात. यामध्ये आर्थिक वर्षात वेगवेगळया करापासून प्राप्त होणारे उत्पन्न, सार्वजनिक उपक्रमापासून मिळणारे उत्पन्न, सार्वजनिक उत्पादन संस्थापासून होणारा नफा सार्वजनिक व्यापारात झालेला नफा इ. चालू साधणाद्वारे मिळणारे उत्पन्न यांचा समावेश होतो. खर्चाच्या बाजूने प्रशासन, संरक्षण, न्यायव्यवस्था, स्वास्थ इ. वरील खर्च याशिवाय अनुदान. महसूली अंदाजपत्रकात करउत्पन्नाला महत्वाचे स्थान आहे.

**२. भांडवली अंदाजपत्रक** - ज्या अंदाजपत्रकात सरकारचा भांडवली खर्च पूर्ण करण्यासाठी भांडवली उत्पन्न उभारले जाते त्यास भांडवली अर्थसंकल्प असे म्हणतात. यात देशांतर्गत व परदेशी कर्ज आंतरराष्ट्रिय वित्तीय संस्था कडून घेतलेले कर्ज विदेशाकडून मिळणारे अर्थ सहाय्य., देशांतर्गत बचत इ. साधनाद्वारे आर्थिक वर्षात मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो. खर्चाच्या बाजूने विकास कार्यावर होणारा खर्च, नियोजनावरील खर्च, कर्जाची परतफेड, घटकराज्यांना वित्तीय सहाय्य, सार्वजनिक उपक्रमावरील खर्च, रस्ते, पुल, कालवे इ. चा समावेश होतो.

**अंदाजपत्रकाचे वर्गीकरण**




**अंदाजपत्रकातील तूट**

**१. महसूल तूट** :- महसूली खर्चाचे महसूल प्राप्तीवरील अधिक्य म्हणजे महसूली तूट होय. महसूली खात्यावरील अधिक्य हे सरकारची बचत दर्शविते. भारताचा विचार केला असता महसूली तूट ३५४०१५ ऐवढी आहे. महसूली तूट वाढत आहे.

**२. वित्तीय तूट** :- अंदाजपत्रक असमतोल मोजण्यासाठी वापरली जाणारी ही एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. वित्तीय तूट म्हणजे एकूण खर्चाचे ;महसूली व भांडवली खर्च महसूली प्राप्ती व भांडवली खात्यावरील कर्जेत्तर प्राप्तीवरील अधिक्य होय. भारतातील वित्तीय तूट ५३३९०४ त्याचे मूल्य -१,१८६ व -०.२२ टक्केवारी आहे.

**३. प्राथमिक तूट** :- वित्तीय तूटीमधून व्याजदेणी वजा केले असता. प्राथमिक तूट मिळते. या संकल्पनेमुळे सरकारने भूतकाळात घेतलेल्या कर्जावरील व्याजदेयी रकमेचे महत्व लक्षात येते. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला असता असे लक्षात येते की, ४१२३४ इतके अंदाजित दर्शविण्यात आले आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१६ - २०१७ तक्ता क्रं - ०१ आकडे कोटी रुपयात

| | अंतिम २०१४-१५ | अंदाजित २०१५-१६ | सूधारीत २०१५-१६ | अंदाजित २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| महसूल उत्पन्न | ११०१४७२ | ११४१५७५ | १२०६०८४ | १३७७०२२ |
| भांडवली उत्पन्न | ५६२२०१ | ६३५९०२ | ५७९३०७ | ६०१०३८ |
| **एकूण उत्पन्न** | **१६६३६७३** | **१७७७४७७** | **१७८५३९१** | **१९७८०६०** |
| योजनेविरहित खर्च | १२०१०२९ | १३१२२०० | १३०८१९४ | १४०८०५० |
| योजना खर्च | ४६२६४४ | ४६५२७७ | ४७७१९७ | ५५००१० |
| **एकूण खर्च** | **१६६३६७३** | **१७७७४७७** | **१७८५३९१** | **१९७८०६०** |
| महसुली तूट | ३६५५१९ | ३९४४७२ | ३४१५८९ | ३५४०१५ |
| वित्तीय तूट | ५९०७२५ | ५५५६४९ | ५३५०९० | ५३३९०४ |
| प्राथमिक तूट | १०८२८१ | ९९५०४ | ९२४६९ | ४१२३४ |

वरील तक्त्यात केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये एकूण महसूल भांडवली उत्पन्न १९७८०६० इतके तर व योजना व योजनाविरहीत खर्च एकूण १९७८०६० तर महसूली तूट ३५४०१५, वित्तीय तूट १३३९०४ प्राथमिक तूट ४१२३४ इतकी आहे.

वित्तीय तूट ही सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ३.५ टक्क्यापर्यंत खाली आणण्याचे आधिचे उदिदष्ट विसरून अर्थमंत्र्यानी सरळ हस्ते खर्च करावा, अशी मागणी सगळीकडून अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी व्यक्त होत होती. पायाभूत सुविधासाठी अधिक निधी देवून त्यांनी अर्थव्यवस्थेच्या कार्याला गती द्यायला हवी, अशी मानसीकता होती. या वर्शीची वित्तीय तूट सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ३.९ टक्क्यापर्यंत कमी करण्याबाबत गेल्या वर्षी दिलेले आश्वासन पाळतानांच अर्थत्र्यांनी पुढच्या वर्षी ही तूट ३.५ टक्क्यार्पंत मर्यादीत राखण्याचे उदिदष्टे ठरविले आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेला कांही प्रमाणात दिलासा मिळू शकेल रिझर्व्ह बँकेने या संदर्भात चिंता व्यक्त केली होती. आता मध्यवर्ती बँकेने व्याजदरात कपात केली तर स्थानिक आणि विदेशी गुंतवणूकदार या सोबतच गृहकर्जदार आकर्षित होऊ शकतात.

अरुण जेटली यांनी अर्थसंकल्पात कृषी, ग्रामीण, सामाजिक, तसेच महत्वाकांक्षी 'स्किल इंडीया' योजने मार्फत पुढील तीन वर्षात देशातील १ कोटी तरूणांना कौशल्या प्रशिक्षण देण्याची घोषणा केली. यासाठी १८०४ कोटी रूपयांची तरतूद केली आहे. कौशल्यविकास, पायाभूत सुविधा, आर्थिक सुधारणा, प्रशासकीय सुधारणा, वित व्यवस्थापन आणि कर सुधारणा याप्रमाणे ९ क्षेत्रावर अर्थमंत्र्यांनी विशेष लक्ष देले आहे. यानुसार शासणाला ग्रामीण आणि कृषी विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करावयाचे आहे. त्यासाठी एकूण तरदूद ४४ हजार ४८५ कोटी रूपये इतकी असून गेल्या वर्षी पेक्षा ती जवळपास दुप्पट आहे.

अर्थमंत्री जेटली यांनी सामाजिक विकासाकडे लक्ष देत त्यासाठी १५१५८१ कोटींची तरतूद केली आहे. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी जेटली यांनी एक योजना जाहीर केली असून येत्या १ जून पासून ३० सप्टेंबर पर्यंत ही योजना सुरू राहणार असून यात जाहीर केलेल्या मालमत्तेवर ३० टक्के कर या शिवाय ७.५ टक्के दंड आणि ७.५ टक्के व्याज असा एकूण ४५ टक्के कर भरून अघोषीत संपत्तीचा तपशील जाहीर करता येणार आहे. परदेशातील काळा पैसा धारकांसाठी हा एकूण दंड ६० टक्के असेल.

संरक्षण खात्यावरील खर्चात १३ टक्कयांनी वाढ करण्यात आलेली आहे. प्राप्तीकर मर्यादेमध्ये काणताही बदल या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. आर्थिक तूट वाढू न देण्याची दक्षता घेत असल्यामुळे या अर्थसंकल्पामध्ये करामध्ये कुठलीही लक्षणीय सवलत दिली गेली नाही. कलम ८०क खाली २००० रूपयाची कर सवलत जी मागील अर्थसंकल्पात देण्यात आली होती. ती आता ५००० रूपयापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. कलम ८०क अंतर्गत मिळणारी वजावट रूपये २४००० वरून रू.६०००० करण्यात आली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिक मजबूत करण्यासाठी आगामी आर्थिक वर्षामध्ये सरकारने २५००० कोटी रूपये देण्याची घोषणा केली. मनरेगासाठी आजवरची सर्वाधिक म्हणजे ३८५०० कोटींची तरतूद केली आहे. रालोआ सरकारच्या 'मेक इन इंडीया' कार्यक्रमांतर्गत नव्याने उद्योग सुरू

करणा-या ; स्टार्ट अप्स उद्योजकांना तीन वर्षांपर्यंत १०० टक्के कर सवलत दिली आहे.

**सेवा कर आता १५ टक्के** फेब्रुवारी २०१४ मध्ये १२.५ टक्क्यावर असलेल्या सेवाकरामध्ये गेल्या अर्थसंकल्पात वाढ केल्यानंतर, स्वच्छ भारत अधिभार लावल्यामुळे सेवा कराचा दर आता १५ टक्के झाला आहे. सेवाकराची अकारणी होणाऱ्या प्रत्येक घटकात यामुळे भाव वाढ होणार आहे.

राजकीय कारणामुळे प्रलंबीत पडलेल्या वस्तू सेवाकराबददल जी.एस.टी. अर्थमंत्र्याच्या भाषणात कोणताही उल्लेख नव्हता.

**समारोप :-**

अंदाजपत्रक हा देशाच्या राज्याच्या आर्थिक धोरणाचा आरसा असतो. अंदाजपत्रकाच्या माध्यमातून समाज व अर्थव्यवस्थेवर विधायक परिणाम घडून येत असतात. भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास जरी विकासाच्या दिशेने होत असला तरी या विकासाचा वेग वाढविण्यासाठी आणि त्याला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने आर्थिक सुधारणांचा वेग वाढविणे गरजेचे आहे. वित्तीय तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.९ टक्के इतकी आहे. त्यामुळे महागाई दर ४.५ ते ५ टक्के राहणार आहे. तसेच शिक्षण आरोग्य खर्चातही वाढ होणे गरजेचे आहे. देशातील युवा शक्तीमध्ये असलेल्या प्रचंड कौशल्याला वाव देण्यासाठी आणि त्यांच्या रोजगारात वाढ करण्यासाठी, या अर्थसंकल्पात अनेक उपक्रमाचा प्रस्ताव आहे.

■■■

*लेखक देगलूर येथील देगलूर महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभागप्रमुख आहेत*

email: ashoktiparse21@gmail.com

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. वर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी) ₹ ९०/-
२. तिलक का मुकदमा (हिंदी) ₹ ३३५/-
३. राजभाषा (हिंदी) ₹ १००/-

१. एक देश एक हृदय (हिंदी)
२. उपभोक्ता संरक्षण (हिंदी)
३. पर्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# एक कल्याणकारी अर्थसंकल्प

प्रा.डॉ.आण्णासाहेब नलवडे



***देशाच्या अर्थसंकल्पीय धोरणाचे, त्यातील बदलाचे व्यक्तीच्या उत्पन्न, खर्च आणि बचतीवर अनुकूल-प्रतिकूल परिणाम होत असतात. देशातील सरकार कोणते कर कोणत्या दराने आकारते, कोणाला किती सवलती दिल्या जातात. त्याचप्रमाणे सार्वजनिक खर्च किती व कोणत्या कारणासाठी करते, यावर देशातील लोकांचे कल्याण अवलंबून असते.***

जागतिक स्तरावर १९२९ साली आलेल्या महामंदीच्या पार्श्वभुमीवर १९३६ मध्ये अर्थशास्त्रज्ञ जे.एम.केन्स यांनी The General Theory of Employment Interest and Money हा ग्रंथ लिहिला, त्यानंतरच्या काळात जगातील सर्वच देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये देशातील लोकांच्या कल्याणाची जबाबदारी देशातील सरकारवर येऊन पडते, त्यामुळे देशातील सरकार देशातील लोकांचे जास्तीत जास्त हित साध्य करण्यासाठी राज्य वित्तीय धोरणाचा वापर करते आणि राज्य वित्तीय धोरणाचे एक महत्वाचे साधन म्हणजे अर्थसंकल्प. देशाच्या अर्थसंकल्पीय धोरणाचे, त्यातील बदलाचे व्यक्तीच्या उत्पन्न, खर्च आणि बचतीवर अनुकूल-प्रतिकूल परिणाम होत असतात. देशातील सरकार कोणते कर कोणत्या दराने आकारते, कोणाला किती सवलती दिल्या जातात. त्याचप्रमाणे सार्वजनिक खर्च किती व कोणत्या कारणासाठी करते, यावर देशातील लोकांचे कल्याण अवलंबून असते. सर्वसाधारणपणे देशाचा जलद आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, दारिद्र्या निर्मूलन, आर्थिक विषमतेचे निर्मूलन, प्रादेशिक विषमतेचे निर्मूलन, वाढत्या आणि घटत्या किंमतीचे नियंत्रण यासारखी उद्दिष्टे ठेवून दरवर्षी अंदाजपत्रकीय धोरण जाहीर केले जाते. सर्वसाधारणपणे केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी मांडलेल्या २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यानंतर खऱ्या अर्थाने हा अर्थसंकल्प कल्याणकारी आहे, असाच निष्कर्ष निघतो. प्रस्तुत लेखामध्ये वेगवेगळ्या क्षेत्राबाबतच्या २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील तरतुदी आणि त्याचा सबंधित क्षेत्रांवर आणि पर्यायाने मानवी कल्याणावर कसा अनुकूल परिणाम होईल हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**शेती क्षेत्र आणि ग्रामीण विकास**

भारत हा शेतीप्रधान देश आहे, त्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाला चालना दिल्याशिवाय देशाचा विकास अशक्य आहे, हे ओळखून स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वच अर्थसंकल्पामध्ये शेती क्षेत्राला झुकते माप दिलेले दिसून येते. यावर्षीचा अर्थसंकल्पही त्याला अपवाद

नाही. यावर्षीच्या अंदाजपत्रकात शेती क्षेत्र व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी ३५ हजार ९८४ कोटी रूपयाची तरतुद केली आहे. त्याचप्रमाणे सिंचन प्रकल्पासाठी २० हजार कोटी आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी ६० हजार कोटीची तरतुद केली आहे. ५ वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार असून शेतकऱ्यांना व्याजापोटी १५ हजार कोटीची सूट देण्यात येणार आहे, त्याचप्रमाणे खत निर्मिती कंपन्यासाठी २००० मॉडेल रिटेल दुकाने आणि त्यामध्ये माती व बीज परिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे केवळ शेतीवर अवलंबून राहून शेतकऱ्यांचे आर्थिक हित साध्य होणार नाही, हे ओळखून शेतीपुरक व्यवसायात वाढ करण्याची तरतुद या अर्थसंकल्पात दिसून येते. या सर्व तरतुदी पाहिल्यानंतर सातत्याने दुष्काळाच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकऱ्याला दिलासा मिळणार आहे. जलसिंचनाच्या भरीव तरतुदीमुळे निश्चितच जलसिंचनाखालील जमिनीत वाढ होईल, त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांच्या कल्याणावर अनुकूल परिणाम होईल अशी आशा वाटते.

भारत हा खेड्याचा देश आहे. एकुण लोकसंख्येपैकी आजही ६५% पेक्षा जास्त लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. याचाही विचार या अर्थसंकल्पात केलेला दिसून येतो. ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी ग्रामपंचायतीला जवळजवळ २ लाख ८७ हजार कोटी रूपये दिले जाणार आहेत. ग्रामीण भागात रस्ते वाहतुकीचा विकास व्हावा या हेतूने प्रधानमंत्री सडक योजनेसाठी १९ हजार कोटी रूपये देण्यात येणार आहेत. ग्रामस्वराज्य अभियानासाठी सुरवातीचा निधी म्हणुन ६५५ कोटी रूपये, ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात वीज उपलब्ध व्हावी या हेतूने ८ हजार ५०० कोटी रूपये देण्यात येणार आहेत. एकुण या अर्थसंकल्पात शेती आणि ग्रामीण विकासावर भर देऊन शेतकऱ्यांबरोबरच ग्रामीण भागातील लोकांना विकास प्रक्रियेत समाविष्ट करून त्यांचे हित संवर्धन करण्याचा प्रयत्न या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केलेला दिसुन येतो.

---

***अर्थसंकल्पात शिक्षणासाठी भरीव तरतुद केलेली दिसून येते. १५०० 'मल्टी स्किल' प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे ६२ नविन नवोदय विद्यालये देशभरात नव्याने सुरू करण्यात येणार आहेत. उच्च शिक्षणासाठी १००० कोटी आणि सर्व शिक्षण अभियानासाठी १००० कोटी रूपयांची तरतुद केली जाणार आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासासाठी ४००० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे टेक्नॉलॉजी विभागासाठी १८०० कोटी रूपयांची तरतुद केली आहे.***

---

### उद्योगांना दिलासा

शेतीबरोबरच औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या हेतूने या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतुद केलेली दिसून येते. औद्योगिक विकासासाठी पुरेशा प्रमाणात पायाभूत सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असते. पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यावर्षी २ लाख ११ हजार २४६ कोटीची तरतुद केली आहे, त्यामुळे पायाभूत सुविधात वाढ होऊन उद्योग क्षेत्रावर अनुकूल परिणाम होईल, त्याचप्रमाणे नविन उद्योगधंद्याचा प्रवेश सुलभ व्हावा या हेतूने स्टँडअप योजनेखाली अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती आणि महिला नव उद्योजकांसाठी ५०० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. अतिलघू, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयात स्टँडअप योजनेखाली एक स्वातंत्र राष्ट्रीय शाखा तयार करण्यात येणार आहे. या माध्यमातुन विविध उद्योग समूहाकडून या उद्योगांना व्यवसायीक मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच बँकेमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. कंपनी कर सध्या ३०% असुन तो पुढील आर्थिक वर्षापासुन ४ वर्षाच्या कालावधीत टप्याटप्याने २५% पर्यंत आणण्याचे सरकारचे धोरण आहे. त्याचाच एक भाग म्हणुन ज्या उद्योगांची आर्थिक उलाढाल ५ कोटी पेक्षा कमी आहे. त्याचा कंपनी कराचा दर २९% करण्याचे जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे निर्यातदारांना प्रोत्साहन देण्याच्या हेतुने सरकारने पावले उचलल्याचे दिसुन येते. वस्त्र उद्योगासाठी ३३०० कोटी रूपयांची तरतुद त्याचप्रमाणे प्रक्रिया उद्योगामध्ये १००% थेट विदेशी गुंतवणूकीचा निर्णय घेण्यात आला आहे. एकंदरीत शेती बरोबरच उद्योगाच्या विकासाला चालना देऊन रोजगारात वाढ करून देशातील लोकांचे हितसवर्धन करण्याचा प्रयत्न सरकारने केलेला दिसून येतो.

**शिक्षण व आरोग्य**

शिक्षण आणि आरोग्य ही दोन्ही क्षेत्रे मानवी विकासाचे महत्वाचे घटक मानले जातात आर्थिक विकास प्रक्रियेत मानवी विकासाची भूमिका ही अत्यंत महत्वाची असते. त्यादृष्टीने यावर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी भरीव तरतुद केलेली दिसून येते. १५०० 'मल्टी स्किल' प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे ६२ नविन नवोदय विद्यालये देशभरात नव्याने सुरू करण्यात येणार आहेत. उच्च शिक्षणासाठी १००० कोटी आणि सर्व शिक्षण अभियानासाठी १००० कोटी रूपयांची तरतुद केली जाणार आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासासाठी ४००० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे टेक्नॉलॉजी विभागासाठी १८०० कोटी रूपयांची तरतुद केली आहे.

दारिद्र्य रेषेंखालील कुंटूबांच्या आरोग्यासाठी १ लाख रूपयांची आरोग्य विमा योजना जाहिर करण्यात आली आहे. जेनेरिक औषधांची ३५०० दुकाने उभी केली जाणार आहेत. तसेच ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य चांगले रहावे या हेतूने त्यांची धुरापासून सुटका करून दारिद्र्या रेषेखालील १ कोटी ५० लाख घरामध्ये एलपीजी गॅसची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. एकूणच शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्यविषयक सुविधात वाढ करून मानवी कल्याणात वाढ घडवून आणण्याला दिलेले प्राधान्य अर्थसंकल्पामधून दिसुन येते.

**मध्यम वर्गीय आणि नोकरदारांना थोडासा दिलासा**

सर्वसामान्य नोकरदार आणि मध्यमवर्गीय लोकांकडून या वर्षीच्या अर्थसंकल्पात वैयक्तिक प्राप्तीकर सवलतीची मर्यादा ५ लाख रूपयापर्यंत वाढविली जाईल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात त्यामध्ये कोणताही बदल केला गेला नाही. असे असले तरी अर्थमत्र्यांनी या वर्गासाठी काही दिलासा दिले जाणारे निर्णय घेतले आहेत. त्यातील पहिला एचआरए चा सेक्शन ८० जीजी नुसार करमुक्त हाऊस रेंट अलाऊन्स म्हणजेच घरभाडे मर्यादा २४ हजारावरून ६० हजार रूपयांपर्यंत वाढविली आहे. तसेच आतापर्यंत ५ लाख रूपये उत्पन्नावर २ हजार रूपयांची कर सवलत दिली जात होती. ती आता ३ हजार इतकी दिली जाणार आहे. तसेच पहिले घर खरेदी करण्यासाठी ३५ लाख रूपयांपर्यंत गृह कर्ज देण्याची तरतुद आणि घराची किंमत ५० लाखापर्यंत असल्यास ५० हजार रूपयांची कर सवलत देण्याचा निर्णय अर्थसंकल्पात केलेला दिसून येतो. एकूण मध्यम वर्गीयांना अल्पसा दिलासा दिला आहे. तो सेवा करात वाढ करून काढून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. असे असले तरी मध्यम वर्गीयांच्या कल्याणावर त्याचा फारसा प्रतिकूल परिणाम होणार नाही. कारण १ जानेवारी २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केली जाणार आहे, हे केंद्र सरकारने अगोदरच घोषित केले आहे.

**सारांश**

केंद्रीय अर्थसंकल्पात शेती, ग्रामीण विकास उद्योग क्षेत्रातील भरीव तरतुदींचा विचार केला असता निश्चितच नजिकच्या काळात शेती क्षेत्र आणि उद्योग क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल. त्याचा परिणाम म्हणून सेवा क्षेत्राच्या विकासाला हातभार लागेल त्यातुन अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. लोंकाच्या उत्पन्न पातळीत वाढ होऊन दारिद्र्याची तीव्रता कमी होण्यास मदत होईल, त्याचप्रमाणे शिक्षण, आरोग्य इ. तरतुदींचा विचार केला असता लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा वाढून वाढत्या लोकसंख्येला विकास प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. एकंदरीत आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करत असताना त्यातुन सर्वसमावेशक विकासाला चालना देऊन मानवी कल्याण साध्य करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात केलेला दिसुन येतो. त्यामुळेच या अंदाजपत्रकाचा उल्लेख एक कल्याणकारी अंदाजपत्रक असाच करावा लागतो.

■■■

*लेखक अकलुज , जि. सोलापूर येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय येथे प्राध्यापक आहेत.*

*email: malawadeas99@gmail.com*

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# केंद्रीय अर्थसंकल्प आणि महाराष्ट्र

बिरादार जीवन



***मुख्यत: या अर्थसंकल्पात शेती व शेतकऱ्यांचे कल्याण आणि ग्रामीण विकास या दोन घटकांना केंद्रभूत ठेऊन अनेक धोरणांची आखणी केलेली दिसते. हे एक अत्यंत सकारात्मक असे पाऊल आहे असे आपणाला म्हणता येईल. या अर्थसंकल्पाचा आपल्या महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेवर काय व कसा परिणाम होऊ शकतो आणि कोणत्या शक्यतांची निर्मिती होईल याचा या लेखात आढावा घेण्यात आला आहे.***

अर्थसंकल्प हा कोणत्याही सत्ताधारी सरकारला देश्यामध्ये सकारात्मक बदल व विकास यांना चालना देण्यासाठी मिळालेली संधी असते. अर्थव्यवस्थेला चागले वळण देण्यासाठी मौद्रिक आणि वित्तीय असे दोन प्रकारची महत्वाची धोरणे असतात. मौद्रिक धोरण हे RBI जाहीर करते तर वित्तीय धोरण हे सत्ताधारी सरकार कडून अर्थ मंत्री जाहीर करत असतो.

आज जगामध्ये सर्वच देशांना जवळजवळ मंदीने ग्रासलेले असताना भारताचा विकास दर अजूनसुद्धा तुलनेने अधिक चांगला आहे. यामध्ये चांगली वृधी व विकासाला चालन देण्यासाठी व देशातील अत्यंत महत्वाच्या क्षेत्राला प्राध्यान्य देण्याची गरज असताना हा केंद्रीय अर्थसंकल्प-लोकसभेमध्ये अर्थ मंत्री अरुण जेटली यांनी मांडला .

**अर्थसंकल्पाची मुख्य वैशिष्टे:**

केंद्रीय अर्थसंकल्प हा प्रमुख्याने नऊ घटकांवर आधारलेला आहे. या नऊ घटकांच्या माध्यमातून Transform India ची घोषणा अर्थ मंत्री यांनी केलेली आहे .

१. शेती आणि शेतकऱ्यांचे कल्याण
२. ग्रामीण विकास
३. सामजिक क्षेत्र ( आरोग्य सहित )
४. शिक्षण , कौशल्य आणि रोजगार निर्मिती
५. पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक
६. वित्तीय क्षेत्रातील सुधारणा
७. शासन आणि Ease of Doing Business
८. वित्तीय शिस्त
९. कर सुधारणा

अशा प्रकारे वरील नऊ आधारस्थभावर हा केंद्रीय अर्थसंकल्प आधारलेला आहे .

एकंदरीत अर्थसंकल्पावरून नजर फिरवली असता असे लक्षात येते कि, बऱ्याच अंशी हा अर्थसंकल्प शेती व शेतकऱ्यांचे कल्याण, गरीब लोकांच्या जीवनमान सुधारणेसाठी आणि समाजातील अतिदुर्लभ घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेला एक प्रयत्न आहे. मुख्यत: या अर्थसंकल्पात शेती व शेतकऱ्यांचे कल्याण आणि ग्रामीण विकास या दोन घटकांना केंद्रभूत ठेऊन अनेक धोरणांची आखणी केलेली दिसते. हे एक अत्यंत सकारात्मक असे पाऊल आहे असे आपणाला म्हणता येईल.

तर या अर्थसंकल्पाचा आपल्या महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेवर काय व कसा परिणाम होऊ शकतो आणि कोणत्या शक्यतांची निर्मिती होईल याचा आपण आढावा घेऊ.

**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था :**

देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि विकसित राज्य अशी ओळख असलेली आपल्या राज्याची अर्थव्यवस्था ही 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' अहवालानुसार तरी ती सेवा क्षेत्रातील आर्थिक वृधी दरावर आधारलेली दिसते. म्हणजेच महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नात सेवा क्षेत्रा चा वाटा हा जवळजवळ ५९ % हा २०१३-१४ मध्ये होता जो की १९९३-९४ मध्ये ४७.६ % एवढा होता . पण त्याच काळामध्ये शेती क्षेत्राचा वाटा मात्र २१. % (१९९३-९४) वरून ११ % (२०१३-१४) एवढा घटलेला दिसून येतो (Table १). हे खरे तर चांगले आहे, कारण राज्याची अर्थव्यवस्था कृषी कडून सेवा क्षेत्रावर आधारलेली बनत चालली आहे. पण सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे कि, २०११ च्या जनगणेनुसार ५२.७ % रोजगार हा शेती क्षेत्रातून निर्माण केला जातो आणि तसेच शेती व शेती संलग्न क्षेत्रावर आधारलेली लोकसंख्या सुद्धा जवळपास ६०% च्या आसपास आहे .

Table 1: Share in Total State Gross Domestic Product (SGDP) (in %)

| Year | Agriculture and allied sector | Industry | Services |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | ३४.४ | २६.० | ३९.६ |
| १९९३-९४ | २१.२ | ३१.२ | ४७.६ |
| २००५-०६ | १३.२ | २७.२ | ५९.६ |
| २०१३-१४ | ११.० | ३०.० | ५९.० |

Source: Various Economic Survey of Maharashtra

ज्या क्षेत्रावर आधारलेली लोकसंख्या ६०% च्या आसपास आहे आणि ५२.७ % रोजगार निर्मिती ही या क्षेत्रातून केली जाते, आणि या क्षेत्राचा विकासदर मात्र खूप मोठ्या प्रमाणावर चढ - उतार होणारा दिसून येतो. गेल्या तीन वर्षातील शेती क्षेत्राचा वृध्दी दर हा ०.५ % (२०१२-१३), ७.७ % (२०१३-१४) आणि -८.५ % (२०१४-१५) असा राहिलेला आहे (Table २). याचा सरळ सबंध राज्यातील होणाऱ्या पावसावर आधारलेला आहे, असे दिसून येते. कारण , राज्यामध्ये एकूण लागवडीखालील जमिनीच्या फक्त १८% जमीन सिंचनाखालील आहे. हीच आकडेवारी राष्ट्रीय पातळीवर ४६% एवढी आहे . म्हणजेच राज्यातील शेती ही सरासरी पर्जन्यमान किती होते यावर अवलंबून आहे .

Table 2: Growth Rate of Agriculture and allied sector

| Sr. No. | Years | Growth Rate (in %) |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | ०.५ |
| २ | २०१३-१४ | ७.७ |
| ३ | २०१४-१५ | -८.५ |

Source: Economic Survey of Maharashtra 2014-15.

या सर्वच कारणांच्या मुळे अलीकडील दोन वर्षात राज्यातील सर्वच भागामध्ये खूपच भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. शेतकरी आत्महत्येचे लोन विदर्भातून आता मराठवाड्यामध्ये ही पसरले आहे. अशी मनाला सुन्न करणारी परिस्थिती असताना हा केंद्रीय अर्थसंकल्प हे एक खूपच चांगले सकारात्मक पाऊल आहे असे आपणाला म्हणता येईल.

**केंद्रीय अर्थसंकल्प आणि महाराष्ट्र :**

या अर्थसंकल्पा मधील शेती व शेतकऱ्यांचे कल्याण आणि ग्रामीण विकास यामधील सर्वच धोरणांचा व योजनांचा राज्याला मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, मृद्रा आरोग्य कार्ड योजना, कृषी वित्त पुरवठा व व्याजदरातील सवलत, पिक विमा योजना, सेंद्रीय शेतीला उत्तेजन, दुग्ध व्यवसाय व इतर पाळीव प्राण्यासाठीच्या योजना, ग्रामपंचायतीला थेट दिला

जाणारा निधी, ग्रामीण विद्दुतीकरण इ सर्वच योजनांचा प्रत्यक्षपणे राज्याचा खूप मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. या शेती आणि ग्रामीण विकास योजानांमुळे शेती व शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात नक्कीच वाढ होण्यास चालना मिळणार आहे. तसेच शेती संलग्न क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर थांबण्यास सुरवात होईल.

अलीकडील काळात राज्यामध्ये विजेचा वापर वाढलेला आहे, तरी सुद्धा २५७ गावे आज सुद्धा विजेविना आहेत. या सर्व गावांचे १ मे २०१८ पर्यंत विद्दुतीकरण केले जाईल, हा या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मिळालेला फायदा आहे. तसेच विजेच्या वापराबाबत सुद्धा सुधारणा करण्यात येतील ज्यामुळे ग्रामीण भागातील वीजकपात (Load Shedding) काहीशी कमी होण्यास नक्कीच मदत होईल.

राज्यामध्ये २२७२४१ ग्रामपंचायती आहेत. या अर्थसंकल्पानुसार खूप मोठा निधी या ग्रामपंचायतीना थेट पुरविला जाणार आहे.' राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान' या योजनेला सरकारने ६५५ कोटी रुपये दिलेले आहे. यापैकी मोठा निधी राज्याला मिळेल.

राज्यातील कुटुंबाच्या ऊर्जा साधन वापरामध्ये २०११ च्या जणगणेनुसार LPG चा वाटा हा ३२. ५५% एवढा आहे आणि यामध्ये ग्रामीण भागात तर हा वाटा नगण्यच आहे. अलीकडे यामध्ये सुधारणा होत आहे पण BPL कुटुंबे यापासून अजूनसुद्धा वंचित आहेत . या कुटुंबातील स्त्रियांना स्वयंपाक घरातील धुरापासून मोठी किंमत मोजावी लागत आहे. यासाठी या अर्थसंकल्पात BPL कुटुंबातील स्त्री च्या नावावर LPG जोडणी देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. याचा फायदा मोठ्या प्रमाणावर जनतेला होणार आहे.

तसेच 'stand up India scheme' हि सुद्धा राज्यातील SC व ST या लोकसंख्येतील उद्योजकता विकास यासाठी फायदा होणार आहे.

***या अर्थसंकल्पातील अनेक धोरणे व योजना यापासून राज्याला मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. गेल्या दोन दशकांत ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न तुलनेने वाढलेले नाही आणि शहरामधील रोजगारात कौशल्य अभावामुळे सहभाग घेता येत नाही असा खूप मोठा जनसमुदाय आपल्या राज्यामध्ये आहे. यावर हा अर्थसंकल्प दीर्घ कालीन उपाययोजना करणारा आहे.***

२०११ च्या जणगणे नुसार राज्यात अनुक्रमे १०. २० % व ८. ८५ % इतका SC आणि ST लोकसंख्ये चा वाटा एकूण लोकसंख्येमध्ये आहे. ह्या सर्व लोकसंख्येमध्ये उद्दोजकत्ता वाढीसाठी या योजना अंत्यंत लाभदायी ठरणार आहे.

तसेच MGNREG, Make in India, स्वछ भारत अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, स्मार्ट शहर योजना, मेट्रो प्रकल्प इ. अनेक योजनाचा लाभ महाराष्ट्राला या अर्थसंकल्पामधून मिळणार आहे असे आपणाला म्हणता येईल.

या अर्थसंकल्पातील अनेक धोरणे व योजना यापासून राज्याला मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. गेल्या दोन दशकांत ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न तुलनेने वाढलेले नाही आणि शहरामधील रोजगारात कौशल्य अभावामुळे सहभाग घेता येत नाही असा खूप मोठा जनसमुदाय आपल्या राज्यामध्ये आहे. यावर हा अर्थसंकल्प दीर्घ कालीन उपाययोजना करणारा आहे.

**समारोप**

मागील दोन वर्ष्यातील मान्सूनची परिस्थिती लक्षात घेता राज्यामध्ये शेती व शेतकऱ्याची आणि ग्रामीण विकासाची परिस्थिती खूप चिंताजनक आहे. या स्थितीत केंद्रीय अर्थसंकल्पामुळे राज्यातील खूप मोठ्या लोकसंखेला फायदा होणार आहे. यामध्ये आणखी सकारात्मक बाब म्हणजे सध्या राज्यात आणि केंद्रात एकाच पक्ष्याचे सरकार असल्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये सुद्धा 'Transform India सारखेच 'Transform Rural Maharashtra' अशा स्वरूपाच्या धोरणाची आणि योजनाची वर्णी लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जे की आजच्या -८. ५ % वृद्धी दर असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या शेती क्षेत्रासाठी तसेच शेतकऱ्यासाठी अत्यंत गरजेच आहे.

■■■

*लेखक पुणे येथील 'माई'र्स आर्ट, कॉमर्स अन्ड सायन्स कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक आहेत.*

*email: jivan.biradar@gmail.com*

# केंद्रीय अर्थसंकल्प आणि ग्रामीण विकास

प्रा. डॉ. जे.एस. इंगळे



***देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा विकसित देशांपेक्षा जास्त आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा सुमारे १४% इतका आहे. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात तेथील कृषी क्षेत्राचा वाटा २% ते ४% एवढा आहे. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ५५. ४०% होता. तो आता १४% पर्यंत घटला असला तरी हे प्रमाण विकसित देशांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आजही भारतातील शेती व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाचा आहे.***

यंदाच्या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, आदिवासी, दलित, महिला या विविध घटकांच्या विकासासाठी सरकारने भरीव तरतूद केलेली दिसते. या लेखात केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने भारतीय शेती व ग्रामीण विकासासाठी कोणत्या तरतुदी केल्या आहेत आणि त्यांचे शेती, ग्रामीण विकास व एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम होतील याची माहिती दिली आहे.

**कृषी क्षेत्रासाठी तरतूदी :-**

भारतात अलिकडच्या काळात द्वितीय (औद्योगिक) आणि तृतीय (व्यापार व सेवा क्षेत्र) ही दोन्ही क्षेत्रे वेगाने विकसित होत असली आणि त्यांच्यापासून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर सतत वाढत असली तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व कमी झालेले नाही. याची प्रमुख दोन कारणे आहेत. एक म्हणजे आजही भारतातील जवळ जवळ ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. भारतात उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण विकसित देशांपेक्षा मोठे आहे. विकसित देशात हे प्रमाण १ ते ५ % च्या आसपास आहे. भारतीय शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असण्याचे दुसरे महत्वाचे कारण म्हणजे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा विकसित देशांपेक्षा जास्त आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा सुमारे १४ % इतका आहे. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात तेथील कृषी क्षेत्राचा वाटा २ % ते ४ % एवढा आहे. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ५५. ४०% होता. तो आता १४ % पर्यंत घटला असला तरी हे प्रमाण विकसित देशांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आजही भारतातील शेती व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. कृषी क्षेत्रावर उद्योग, वाहतूक, व्यापार क्षेत्र इत्यादी क्षेत्रे अवलंबून असल्याने सरकारला कृषीक्षेत्राकडे दुर्लक्ष करता येत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषिक्षेत्राचे महत्व ओळखून आणि शेतीची दयनीय स्थिती लक्षात घेवून अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २०१६-१७ च्या केंद्रीय अर्थ संकल्पात कृषी क्षेत्रासाठी ३५९८४ कोटी रु एवढ्या पैशाची भरीव अशी तरतूद

केली आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प शेतीला झुकते माप देणारा ठरला आहे. या

अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने पुढील तरतुदी / उपाययोजना केल्या आहेत.

**कृषी कर्ज**

भारतातील सुमारे ८०% शेतकरी हे अल्पभूधारक आणि सीमांत शेतकरी आहेत. एकूण शेतकऱ्यांपैकी जवळ-जवळ ८० % शेतकरी हे गरीब आहेत. त्यांची शेती मागासलेली आहे. त्यामुळे त्यांना कर्जाची/भांडवलाची गरज आहे. म्हणून सरकारने केंद्रीय अंदाजपत्रकात शेतकऱ्यांसाठी ९ लाख कोटी रुपये कर्जाची तरतूद केली आहे. २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात ही तरतूद ८ लाख कोटी रुपयांची होती. तर २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात ही तरतूद ८.५० लाख कोटी रुपयांची होती. अशा प्रकारे २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात कृषी कर्जासाठी ५० हजार कोटींची वाढ सरकारने केली आहे.

**कृषी कर्जावरील व्याजात सवलत**

भारतीय शेतीची आणि शेतकऱ्यांची आजची दयनीय स्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना कर्जावरील व्याजात सवलत/ सूट देणे आवश्यक आहे. त्याचा विचार केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केलेला दिसतो. कारण २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांना कृषी कर्जावरील व्याज सवलतीसाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**जलसिंचन**

भारतात अद्यापही सुमारे ५४ % जमीन कोरडवाहू/ जिराईत / पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. ४६ टक्के जमीन ओलिताखाली आहे. भारतीय शेतीची उत्पादकता आणि उत्पादन यामध्ये वाढ घडवून आणण्यासाठी ओलीता खालील क्षेत्रात वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने अंदाजपत्रकात २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. नाबार्ड (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक) मार्फत सरकार जलसिंचनासाठी हा निधी उपलब्ध करून देणार आहे. सुमारे २८.५० लक्ष हेक्टर शेती सिंचनाखाली आणण्याचे सरकारचे लक्ष आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजने अंतर्गत सरकार हे लक्ष साधणार आहे. तसेच जलद सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत ८९ सिंचन योजनांची कामे सरकार वेगाने करणार आहे. सरकार काही रक्कम विहिरी आणि तलावांसाठी खर्च करणार आहे.

---

***शेतमाल चांगल्या दर्जाचा, आरोग्यासाठी उपयुक्त असा तयार व्हावा यासाठी सरकारने जैविक शेतीवर /सेंद्रिय शेतीवर भर दिला आहे. त्यासाठी ईशान्य भारतात केल्या जाणाऱ्या सेंद्रिय शेतीसाठी सरकारने ४१२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे देशातील पाच लाख एकर जमीन जैविक / सेंद्रिय होणार आहे. एक लाख गावामध्ये सेंद्रिय शेतीची पद्धत सुरु करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. आता त्यांची ही घोषणा अर्थमंत्री प्रत्यक्षात आणणार आहेत.***

---

**पीक विमा योजना**

अर्थमंत्री जेटली यांनी २०१६-१७ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात चार नव्या विमा योजनांची घोषणा केली आहे. त्यासाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात होत असून शेतकऱ्यांना यासंदर्भात दिलासा देण्याची गरज होती. सरकारने पीक विमा योजनेसाठी पुरेसा निधी दिल्याने नैसर्गिक आपत्तीशी मुकाबला करणे शेतकऱ्यांना शक्य होईल.

**जैविक / सेंद्रिय शेतीवर भर**

२०१६-१७ च्या अंदाजपत्रकात सरकारने शेतीच्या आणि ग्राहकांच्या हितासाठी सेंद्रिय शेतीवर भर देला आहे. रासायनिक खते, जंतुनाशके, कीटकनाशके यांच्या अतिवापराने शेतीची उत्पादकता घटत चालली आहे. तसेच रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापराने शेतमालही खाण्यालायक राहिलेला नाही. शेतमाल चांगल्या दर्जाचा, आरोग्यासाठी उपयुक्त असा तयार व्हावा यासाठी सरकारने जैविक शेतीवर /सेंद्रिय शेतीवर भर दिला आहे. त्यासाठी ईशान्य भारतात केल्या जाणाऱ्या सेंद्रिय शेतीसाठी सरकारने ४१२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे देशातील पाच लाख एकर जमीन जैविक / सेंद्रिय होणार आहे. एक लाख गावामध्ये सेंद्रिय शेतीची पद्धत सुरु करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. आता त्यांची ही घोषणा अर्थमंत्री प्रत्यक्षात आणणार आहेत. रासायनिक खताऐवजी कम्पोष्ट खतांचा वापर वाढविण्यावर सरकार भर देणार आहे. सेंद्रिय शेतीसाठी लागणारे सेंद्रिय खत मिळविण्यासाठी शहरातील कचरा आणि मैला गोळा करून त्यापासून कंपोष्ट खत तयार केले जाणार आहे.

**जलपुनर्भरण / भू-जल संधारण**

शेतीसाठी / शेतीची पाण्याची गरज भागविण्यासाठी जलपुनर्भरण अत्यंत आवश्यक असून सरकारने २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात त्यासाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

### मृदा आरोग्य कार्ड

२०१५-१६ प्रमाणे २०१६-१७ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात सरकारने मृदा हेल्थ कार्ड योजनेसाठी खर्चाची तरतूद केली आहे. ही योजना सरकार जमिनीची शाश्वत पद्धतीने उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी राबविणार आहे.

### कृषी विज्ञान केंद्र

शेती क्षेत्राच्या विकासासाठी अर्थमंत्र्यांनी २०१६-१७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याचा संकल्प जाहीर केला असून त्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद केली आहे.

### बियाणांच्या तपासणीसाठी प्रयोगशाळा

सरकारने शेती क्षेत्राच्या विकासासाठी या अर्थसंकल्पात घेतलेला आणखी एक चांगला निर्णय म्हणजे बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होवू नये म्हणून सरकार देशभरात बियाणांच्या तपासणीसाठी सुमारे २००० प्रयोगशाळा उभारणार आहे. भारतात अनेक बोगस कंपन्या शेतकऱ्यांना बोगस बियाणे विकतात. त्यामुळे केवळ शेतकयांचे नुकसान होत नाही तर कृषी उत्पादनात घट होऊन कृषी मालाच्या किंमती भडकतात. शेतकऱ्यांना हलक्या दर्जाचे बियाणे मिळू नये यासाठी देशभरात प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार असून बियाणांची तपासणी केल्याशिवाय बियाणे बाजारात विक्रीसाठी येणार नाही.

### पशुधन विकास

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पशुधन अत्यंत महत्वाचे आहे. परंतु शेती व्यवसाय अडचणीत आल्यामुळे पशुधनही अडचणीत आले आहे. जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांना जिकीरीचे झाले असल्याने पशुधन कमी होत आहे. म्हणून शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी या अर्थसंकल्पात पशुसंगोपन व संवर्धन आणि पशुखाद्य योजना जाहीर केली आहे. सरकारने जाहीर केलेल्या एनिमल हेल्थ कार्ड योजनेमुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळेल. पशुधनासाठी ८५० कोटी रु तरतूद सरकारने केली आहे.

### डाळ उत्पादन वाढीकडे लक्ष

भारतात आजही तूर डाळीसारख्या काही डाळींचे उत्पादन खूपच कमी प्रमाणात होते. डाळींच्या मागणीच्या सुमारे ७० टक्के डाळ उत्पादन आयात होते. उर्वरित मागणी पूर्ण करण्यासाठी विदेशातून डाळींची आयात करावी लागते. मध्यंतरी तूर डाळीची किंमत प्रतिकीलोला २०० रुपयांपर्यंत भडकली होती. डाळीची वाढती मागणी आणि डाळींच्या वाढत्या किंमती विचारात घेवून केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी पाचशे कोटी रुपयांची तरतूद केली आहे. देशाच्या ६२२ जिल्ह्यात डाळींचे उत्पादन वाढावे यासाठी सरकार हा पैसा खर्च करणार आहे.

***केंद्रीय अर्थमंत्र्यांनी घेतलेला आणखी एक चांगला निर्णय म्हणजे त्यांनी भारतातील शेतमाल प्रक्रिया उद्योगात विदेशी कंपन्यांना १०० टक्के गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्राबरोबर शेतीशी संबंधित शेतमाल प्रक्रिया उद्योगात १०० % थेट विदेशी गुंतवणुकीस परवानगी देवून अर्थमंत्र्यांनी आर्थिक सुधारणांचा वेग वाढवलेला दिसतो.***

### विदेशी गुंतवणुकीस परवानगी

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी घेतलेला आणखी एक चांगला निर्णय म्हणजे त्यांनी भारतातील शेतमाल प्रक्रिया उद्योगात विदेशी कंपन्यांना १०० टक्के गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्राबरोबर शेतीशी संबंधित शेतमाल प्रक्रिया उद्योगात १०० % थेट विदेशी गुंतवणुकीस परवानगी देवून अर्थमंत्र्यांनी आर्थिक सुधारणांचा वेग वाढवलेला दिसतो.

### कृषी उत्पन्न बाजार समिती कारभारात सुधारणा

शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळवा यासाठी आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढावी यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा केली आहे.

### ई-मार्केटिंगवर भर

सरकारने आगामी ५ वर्षात भारतीय शेतकऱ्यानचे उत्पन्न दुप्पट करण्यावर भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकात शेतमालाच्या ई-मार्केटिंगला (ऑनलाइन खरेदीला) स्थान दिले आहे. औद्योगिक मालाप्रमाणे शेतमालाची ऑनलाइन खरेदी झाल्यास शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा अधिक उत्पन्न मिळेल असा सरकारचा दावा आहे.

### राष्ट्रीय कृषी बाजार पोर्टल

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठी लवकरच एकिकृत राष्ट्रीय कृषी बाजार पोर्टल देशातील बारा राज्यात उभे करण्याची घोषणा अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेत केली आहे. त्याचाही फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

**खतांचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात**

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी घेतलेला आणखी एक चांगला निर्णय म्हणजे खत उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना अनुदान देण्याऐवजी ती अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे होय. ज्या प्रमाणे गॅस अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट जमा केली जाते त्याप्रमाणे खतावरील अनुदान शेतकऱ्यांना मिळणार आहे. मागच्या अंदाजपत्रकात खतावरील अनुदानासाठी अर्थसंकल्पात ७३ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. एका युरिया खताची सबसिडी ५१ हजार कोटी रु. असून ही सबसिडी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे.

**नैसर्गिक आपत्ती फंड**

भारतीय शेतीच्या अवनतीचे प्रमुख कारण म्हणजे देशात अधून मधून पडणारा दुष्काळ हे होय. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ पडतो. दुष्काळामुळे शेतकऱ्यांची जगण्याची उमेदच नष्ट होते. अर्थमंत्र्यांनी त्याचाही विचार अर्थसंकल्पात केलेला दिसतो. दुष्काळावर मात करण्यासाठी दुष्काळाचा समावेश राष्ट्रीय आपत्तीत करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यासाठी नैसर्गिक आपत्ती फंडाची घोषणा त्यांनी केली आहे.

**कृषी कल्याण कर**

शेतकरी बांधवांच्या कल्याणासाठी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी बराच चार केलेला दिसतो. कृषी कल्याण कर ०.०५ % (अर्धा टक्के) आकारण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्यावरून शेतकऱ्यांच्या कल्याणाची जबाबदारी केवळ सरकारची नसून संपूर्ण समाजाची ती जबाबदारी आहे असे त्यांना सुचवायचे आहे. अर्थमंत्री जेटली यांनी कोणत्याही करपात्र व्यवहारावर यापुढे ०.०५ % कृषी कल्याण कर द्यावा लागेल असे म्हटले आहे. त्यामुळे १४.५० % असणारा सेवा कर आता १५ टक्क्यावर पोहचला आहे. हा अर्धा टक्के कृषी कल्याण कर सर्वच नागरिकांना द्यावा लागणार असून या करापोटी जमा होणार पैसा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी खर्च केला जाणार आहे. म्हणजे यापूर्वी काही लोक शेतकऱ्यांच्या नावावर सरकारवर केवळ चिखलफेक करत होते, शेतकऱ्यांच्या अवनतीला सरकारला जबाबदार धरत होते त्या लोकांना आता शेतकऱ्यांच्या नावाने केवळ गळा काढता येणार नाही किंवा केवळ दु:खाश्रू ढाळता

***अर्धा टक्के कृषी कल्याण कर सर्वच नागरिकांना द्यावा लागणार असून या करापोटी जमा होणार पैसा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी खर्च केला जाणार आहे. म्हणजे यापूर्वी काही लोक शेतकऱ्यांच्या नावावर सरकारवर केवळ चिखलफेक करत होते, शेतकऱ्यांच्या अवनतीला सरकारला जबाबदार धरत होते त्या लोकांना आता शेतकऱ्यांच्या नावाने केवळ गळा काढता येणार नाही किंवा केवळ दु:खाश्रू ढाळता येणार नाहीत तर स्वत:च्या खिशात हात घालून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी चार पैसे द्यावे लागणार आहेत.***

येणार नाहीत तर स्वताच्या खिशात हात घालून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी चार पैसे द्यावे लागणार आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लेख लिहून, भाषणे करून, सरकारवर टीका करून आपली जबाबदारी संपली असे मानणाऱ्या लोकांना सरकारने कृषी कल्याण कर बसवून चांगली चपराक दिली आहे असे म्हणावे लागेल.

**ग्रामीण विकास**

भारत सरकारचा २०१६-१७ चा केंद्रीय अर्थासंकल्प हा कृषी आणि ग्रामीण विकास केंद्रित आहे. कारण ग्रामीण विकासासाठी सरकारने सुमारे ८,७७,६६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ग्रामीण विकासासाठी सरकारने केलेली खर्चाची ही तरतूद शेती आणि शेतकरी यांच्या हिताचीच आहे. या अर्थसंकल्पात सरकारने ग्रामीण विकासावर अधिक भर दिला असल्याने शेतकरी बांधवांना त्याचा अधिक लाभ मिळणार आहे. ग्रामीण विकासासाठी सरकारने या अंदाजपत्रकात पुढील तरतुदी केल्या आहेत.

**मनरेगासाठी भरीव तरतूद**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही ग्रामीण विकासाचे इंजिनच मानले पाहिजे. या अंदाजपत्रकात मनरेगासाठी ३८५०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. मागच्या वर्षीच्या अंदाजपत्रकात मनरेगासाठी ३४६९९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मागच्या वर्षीच्या तुलनेत या वर्षीच्या अंदाजपत्रकात मनरेगासाठी ३८०० कोटींची वाढ करण्यात आली असून ग्रामीण भागातील बेरोजगारांना याचा लाभ होणार आहे. मनरेगासाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदीमुळे शेतीचा आणि शेतकयांचाही लाभ होणार आहे. कारण सिंचन सुविधेत वाढ करण्याची जबाबदारी मनरेगावर सोपवण्यात येणार आहे.

**ग्रामसडक योजना**

ग्रामीण विकासासाठी सरकारने उचललेले आणखी एक पाऊल म्हणजे पंतप्रधान ग्रामसडक योजनेसाठी केलेली भरीव तरतूद होय. या योजनेसाठी सरकारने सुमारे १९००० कोटी रु. तरतूद केलेली आहे.

**ग्रामज्योती योजना**

ग्रामीण भागाला वीज पुरवठा करण्यासाठी, ग्रामीण भागाचे १००% विद्युतीकरण घडवून आणण्यासाठी दीनदयाळ ग्रामज्योती योजना सरकार राबविणार आहे. प्रत्येक गावात वीज पोचवण्याचा सरकारचा मानस आहे. १ मे २०१८ पर्यंत १०० टक्के ग्रामीण भागाचे विद्युतीकरण करण्याचा निर्धार सरकारने केला आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना होणार आहे.

**ग्रामपंचायतींना व नगरपालिकांना अनुदान**

ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती भक्कम व्हावी यासाठी सरकार दर वर्षी ग्रामपंचायतींना ८० लाख रु देणार आहे. तर नगरपालिकांना २१ कोट रु प्रतिवर्षी देणार आहे.

**ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता**

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी ग्रामीण भागातील ६ कोटी कुटुंबांना येत्या ३ वर्षात डिजिटल साक्षर बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी त्यांनी विशेष योजना बनविली आहे. राष्ट्रीय साक्षरता मिशन आणि डिजिटल साक्षरता अभियान अशा दोन योजना तयार करण्यात आल्या आहेत. यामुळे संगणक, Tablet, स्मार्ट फोन आणि इंटरनेट या सुविधांचा लाभ ग्रामीण जनतेला होणार आहे.

**गरीब महिलांना गॅस कनेक्शन**

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी घेतलेला आणखी एक चांगला निर्णय म्हणजे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलेच्या नावावर गॅस कनेक्शन देणे होय. त्यासाठी चालू वर्षात २००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून चालू वर्षात या योजनेचा देशातील दीड कोटी लोकांना फायदा होणार आहे. त्यासाठी सरकारला २४०० कोटी रुपये खर्च येणार आहे. पुढच्या वर्षी दीड कोटी आणि तिसऱ्या वर्षी २ कोटी गॅस जोडण्याचे उद्दिष्ट सरकारने ठरवले आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागातील गरीबांना सरकारच्या या योजनेचा लाभ होणार आहे.

**दलित, आदिवासी, आणि महिला उद्योजक**

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी दलित, आदिवासी लोक आणि महिला उद्योजक यांच्या विकासासाठी अंदाजपत्रकात ५०० कोटी रु तरतूद केली असून ग्रामीण भागातील दलित, आदिवासी आणि महिला यांना त्याचा लाभ होणार आहे.

***बियाणांच्या तपासणीसाठी प्रयोगशाळा उभारण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांची बियाणे कंपनीकडून होणारी फसवणूक थांबेल. त्यामुळे चांगले बियाणे मिळून कृषी उत्पादनात वाढ होईल. बोगस कंपन्यांच्या बोगस बियाणांमुळे बियाणे उगवून न आल्याने किंवा कमी प्रमाणात पीक आल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. बोगस बियाणांच्या कारणामुळे होणाऱ्या आत्महत्या आता थांबतील.***

**आरोग्य विमा**

भारतातील प्रत्येक कुटुंबाला १ लाख रुपयाच्या आरोग्य विम्याचे कवच (संरक्षण) देणारी योजना सरकारने जाहीर केली असून ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ३० हजार रु संरक्षण मिळणार आहे.

**केंद्रीय अर्थसंकल्पाचे संभाव्य परिणाम**

२०१६-१७ या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पातील शेती आणि ग्रामीण विकासासंबंधीच्या विविध तरतुदी आपण वर पहिल्या. या तरतुदींचे कोणते परिणाम होवू शकतील हे पाहणे आवश्यक आहे. ते संभाव्य परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) कृषी कर्जावरील व्याजात १५००० कोटी रु सवलत सरकारने जाहीर केली आहे. त्याचा फायदा कर्जबाजारी शेतकऱ्यांना होणार आहे.

२) जलसिंचनासाठी पुरेशी तरतूद केली असल्याने ओलिताखालील क्षेत्रात वाढ घडून येईल. तसेच जलसिंचनाच्या रखडलेल्या योजना मार्गी लागतील.

३) पीक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कारण विमा हप्त्याची रक्कम अत्यंत कमी असून आपत्तीच्या काळात ही योजना शेतकऱ्यांना वरदान ठरणारी आहे.

४) सरकारने सेंद्रिय शेतीवर भर दिल्याने शेतकऱ्यांचाही फायदा होणार आहे आणि ग्राहकांचाही. ग्राहकांना चांगला कृषी माल मिळणार आहे. सेंद्रिय शेतीमुळे कंपोष्ट खतांचा वापर वाढून रासायनिक खतांचा वापर कमी होईल. त्यामुळे शेतजमिनी नापीक होण्याचे किंवा खराब होण्याचे थांबेल.

५) बियाणांच्या तपासणीसाठी प्रयोगशाळा उभारण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांची बियाणे कंपनीकडून होणारी फसवणूक थांबेल. त्यामुळे चांगले बियाणे मिळून कृषी उत्पादनात वाढ होईल. बोगस कंपन्यांच्या बोगस बियाणांमुळे बियाणे उगवून न आल्याने किंवा कमी प्रमाणात पीक आल्याने अनेक शेतकयांनी आत्महत्या केल्या आहेत. बोगस बियाणांच्या कारणामुळे होणाऱ्या आत्महत्या आता थांबतील.

६) पशुधन विकासासाठी सरकारने योजना आखल्यामुळे पशुधनात वाढ होईल. पशुधन सांभाळणे शेतकऱ्यांना कठीण होणार नाही.

७) डाळ उत्पादन वाढीसाठी ५०० कोटी रु तरतूद केल्यामुळे देशात डाळींचे उत्पादन वाढेल. शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होईल. आणि ग्राहकांना योग्य दारात पुरेशी डाळ मिळेल.

८) शेतमाल प्रक्रिया उद्योगात विदेशी गुंतवणुकीस परवानगी दिल्याने प्रक्रियेविना जो शेतमाल वाया जात होता तो वाया जाणे थांबेल. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळेल व त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. रोजगारही वाढेल.

९) दुष्काळाचा समावेश राष्ट्रीय आपत्तीत करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने दुष्काळी भागातील लोकांना दिलासा मिळणार आहे. तसेच सरकार दुष्काळग्रस्त भागात काही योजना राबविणार आहे. त्याचाही फायदा तेथील जनतेला होईल.

१०) कृषी कल्याण कर अर्धा टक्के बसविल्यामुळे काही लोक नाराज होतील. परंतु या करामुळे त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यात सरकारला यश येणार आहे.

११) मनरेगासाठी भरीव तरतूद केल्याने ग्रामीण भागातील दारिद्र्य, बेकारी, आत्महत्या यांचे प्रमाण कमी होईल. ग्रामीण लोकांची खरेदीशक्ती वाढून त्यांची परिस्थिती सुधारेल. तसेच 'मनरेगा'अंतर्गत कृषिविकासाची कामे हाती घेण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

१२) पंतप्रधान ग्रामसडक योजनेमुळे खेड्यातील रस्ते वाहतुकीची परस्थिती सुधारणार आहे. कृषी मालाची वाहतूक जलद व स्वस्तात होईल. खेड्यातील प्रवाशांनाही त्याचा लाभ होणार आहे.

१३) ग्रामज्योती योजनेमुळे प्रत्येक घरात वीज पोचून खेड्यातील मुला मुलींना शिक्षणात चांगली प्रगती करता येईल. संगणक, मोबाईल, इंटरनेट यांचा वापर वाढेल.

१४) गरीब महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने ग्रामीण व शहरातील गरीब स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.

**समारोप**

२०१६-१७ चा केंद्रीय अर्थसंकल्प बारकाईने पाहिला असता हा अर्थसंकल्प शेतकरी बांधवांच्या विकासासाठीच तयार करण्यात आला आहे हे स्पष्ट दिसते. गेल्या काही वर्षापासून भारतीय शेतीला अनेक संकटांनी ग्रासले असून शेती व्यवसाय दिवसेंदिवस तोट्यात येत चालला आहे. शेती आणि शेतकऱ्यांना यांना वाचवण्यासाठी सरकारने काही ठोस उपाय योजणे आवश्यक होते. ते उपाय या अंदाजपत्रकात योजलेले दिसतात. परंतु अंदाजपत्रकाची अंमलबजावणी कशी होती त्यावरच अंदाजपत्रकाचे परिणाम अवलंबून असणार आहेत.

अंदाजपत्रकात शेती व ग्रामीण विकासासाठी जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे केली व विविध योजनांसाठी सरकारने पैसा कमी पडू दिला नाही तर शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील असा निष्कर्ष काढता येईल.

■■■

*लेखक बळवंत महाविद्यालय विटा, जि. सोलापूर येथे अर्थशास्त्र विभाग प्रमुख आहेत*

*email: jayavantingale@gmail.com*

## आगामी अंक

**एप्रिल २०१६**

**'ईशान्य भारत'**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.

# ग्रामीण पायाभूत सुविधा आणि विद्युतीकरण

हिरण्मय रॉय, अनिल कुमार, प्रसून द्विवेदी



***केंद्र सरकारने कृषी व ग्रामीण क्षेत्र, सामाजिक, पायाभूत क्षेत्रांबरोबरच रोजगारनिर्मिती व बँकांचे पुनर्भांडवलीकरण या मुद्द्यांवर अधिक भर देत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. पायाभूत सुविधांसाठी लागणाऱ्या निधीच्या चणचणीची कोंडी फोडण्याच्या त्यांच्या जुन्या आश्वासनाला जागण्यासाठी भारत सरकारने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, असे म्हणायला वाव आहे.***

जागतिक अर्थव्यवस्थेचा वेग २०१४च्या तुलनेत (३.४ टक्के) गेल्या वर्षी ३.१ टक्क्यांवर घसरलेला असताना भारतीय अर्थव्यवस्था मात्र ७ टक्के विकासदराने स्थिर पण आश्वासक अशी वाटचाल करत आहे. म्हणूनच जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर भारत हे गुंतवणुकीसाठीचे एक सुरक्षित ठिकाण ठरू शकते, अशी स्तुतिसुमने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकतीच उधळली आहेत. देशांतर्गत बाजारपेठीय वातावरण सशक्त असल्याने भारताची विकासाची घोडदौड सकारात्मक राहिली आहे, आणि त्यामुळेच २०१४-१५च्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेने २०१५-१६ या आर्थिक वर्षात स्थिर गतीने विकासदर राखला आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने कृषी व ग्रामीण क्षेत्र, सामाजिक, पायाभूत क्षेत्रांबरोबरच रोजगारनिर्मिती व बँकांचे पुनर्भांडवलीकरण या मुद्द्यांवर अधिक भर देत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. पायाभूत सुविधांसाठी लागणाऱ्या निधीच्या चणचणीची कोंडी फोडण्याच्या त्यांच्या जुन्या आश्वासनाला जागण्यासाठी भारत सरकारने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, असे म्हणायला वाव आहे.

**व्हिजन : २०१६-१७ :**

पुढील आर्थिक वर्षात देशाचा जमा-खर्च कसा असेल याची संपूर्ण माहिती अर्थसंकल्पात देण्यात येते. आगामी आर्थिक वर्षात सरकार कोणत्या क्षेत्रासाठी किती रक्कम खर्च करणार आहे, किंवा कुठे गुंतवणूक करणार आहे, याची कल्पना गुंतवणूकदार व इतर हितचिंतकांना येते व अर्थव्यवस्थेवर होणारा अर्थसंकल्पाचा परिणाम दीर्घकाळ टिकणारा असतो. चर्चेसाठी संसदेच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अर्थसंकल्पात (२०१६-१७) विकासाच्या मूळ नऊ आधारस्तंभांवर भर देण्यात आला आहे, जसे की...

१. कृषी आणि शेती कल्याण
२. ग्रामीण रोजगार व पायाभूत सुविधा यांच्यावर भर देणारे ग्रामीण क्षेत्र
३. आरोग्य देखभालीसह सामाजिक क्षेत्र
४. शिक्षण व कौशल्य विकास
५. पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक
६. वित्तीय क्षेत्रातील सुधारणा
७. गव्हर्नन्स आणि उद्योगस्नेही धोरण
८. वित्तीय शिस्त

९. कर सुधारणा

**पायाभूत क्षेत्राची भूमिका :**

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाचा कणा हा पायाभूत क्षेत्र असतो. एकदा अमेरिकेचे ४२वे अध्यक्ष विल्यम क्लिंटन म्हणाले होते की, 'समान संधी आणि आर्थिक सक्षमता हातात हात घालून चालू लागले तर ते नैतिकदृष्ट्या योग्य आणि अर्थव्यवस्थेसाठी चांगले असते, कारण भेदभाव, गरिबी आणि दुर्लक्ष हे विकास रोखतात, मात्र त्याचवेळी शिक्षण, पायाभूत सुविधा आणि विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधन यांसाठी केलेली गुंतवणूक प्रगतीसाठी पोषक ठरते, त्यामुळे अधिकाधिक चांगल्या रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि आपणा सर्वांसाठी नवनवीन संपत्ती निर्माण होत असते'. क्लिंटन यांचे हे म्हणणे भारताला तंतोतंत लागू ठरत आहे, जे की कालपरवाच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात प्रतिबिंबित आहे, कारण ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास होणे महत्त्वाचे आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत क्षेत्राला देण्यात आलेले महत्त्व दुर्लक्षून चालणार नाही, कारण रेल्वे, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांसाठी तब्बल दोन लाख २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पायाभूत क्षेत्राची भूमिका ही महत्त्वाची कारण सर्व क्षेत्रांना त्यांच्या विकासासाठी मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास होणे गरजेचे आहे.

**भौतिक पायाभूत क्षेत्रासाठी अर्थसंकल्प**

राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या सुमारे १० टक्के उत्पन्न पायाभूत क्षेत्रातील बांधकामांतून येत असते, ज्याला पाच वर्षांत जवळपास दहा लाख डॉलरच्या गुंतवणुकीची गरज असते आणि त्यातील निम्मी गुंतवणूक खासगी क्षेत्राकडून येणे अपेक्षित असते. अतिरिक्त कर आणि व्याज यामुळे गृहनिर्माण क्षेत्र तेजीत राहू शकते.

**रस्तेबांधणी क्षेत्र**

रस्तेबांधणीसाठी एकंदर ९७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ५५ हजार कोटी रुपयांचा निधी सरकारकडून देण्यात आला आहे तर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) करमुक्त बॉण्ड्सच्या माध्यमातून १५ हजार कोटी रुपयांचा निधी उभारू शकते. तर या योजनेतच तरतूद करण्यात आलेला २७ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारांनी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत (पीएमजीएसवाय) निर्माण करायचा आहे.

पायाभूत प्रकल्पांना वित्तीय सहाय्य मिळण्यात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी नवीन क्रेडिट रेटिंग पद्धती विकसित व्हायला हवी. २०१६-१७ या आर्थिक वर्षात १० हजार किमी लांबीच्या रस्त्यांची उभारणी करण्याचा केंद्राचा संकल्प आहे आणि आणखी १० हजार किमी लांबीच्या रस्त्यांना हिरवा कंदिल दाखवण्यात येणार आहे. मोटार वाहन नियमन कायद्यात सुधारणा करून रस्त्यांवरील प्रवासी वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी नव्या सुधारणा अंमलात आणाव्या लागतील. मोटार वाहन नियमन कायद्यातील सुधारणेमुळे आंत्रप्रिन्युअर्सना सुरक्षा व व्यवहार्यतेचे सर्व निकष पाळून विविध ठिकाणांवर वाहतूक सेवा सुरू करण्यास प्रोत्साहन मिळू शकेल.

लहान आकाराच्या पेट्रोल कार, एलपीजी कार व सीएनजी कार, विशिष्ट क्षमतेच्या डिझेल कार आणि उच्चकोटीची इंजिन क्षमता असलेली वाहने व एसयूव्ही आदींवर अनुक्रमे एक, अडीच व चार टक्के पायाभूत सुविधा उपकर लावण्यात यायलाच हवा. या उपकरासाठी कोणतेही क्रेडिट दिले जाणार नाही की इतर कोणताही कर किंवा अतिरिक्त कर यांचा वापर या उपकरासाठी केला जाणार नाही. त्यामुळे पेट्रोल, एलपीजी, सीएनजी व इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला उत्तेजन मिळते.

**ऊर्जा क्षेत्र**

कोणत्याही देशातील कोणत्याही उद्योगाची मूलभूत गरज ही विजेची उपलब्धता ही असते, कारण वीज व ऊर्जा या दोन्ही कोणत्याही देशाच्या विकासात महत्त्वाच्या भूमिका निभावत असतात. अर्थसंकल्पातील उल्लेखानुसार गेल्या दोन दशकांत सरकारकडे कोळशाचे सर्वाधिक उत्पन्न जमा झाले आहे, तसेच वीजनिर्मितीमध्ये सर्वोच्च वाढ झाली आहे, वीजवितरण वाहिन्यांमध्ये सर्वोच्च वाढ झाली आहे आणि एलईडी बल्ब्सचे वितरणही वाढले आहे.

**ग्रामीण विद्युतीकरण आणि रिन्युएबल ऊर्जा**

१ एप्रिल २०१५ रोजी देशातील एकूण १८ हजार ५४२ गावांमध्ये वीज नव्हती. पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या त्यांच्या भाषणात एक हजार दिवसांत देशातील सर्व खेडी विजेच्या लखलखाटाने उजळून निघतील, असे स्पष्ट केले होते. तथापि, दीनदयाळ ग्रामीण विद्युतीकरण योजना (डीडीजीव्हीवाय) आणि एकात्मिक विकास योजना (आयपीडीएस) या योजनांच्या माध्यमातून

मे, २०१८ पर्यंत १०० टक्के ग्रामीण भागांत वीजपुरवठा हे केंद्र सरकारचे लक्ष्य असून त्यामुळे विजेच्या मागणीत वाढ होणे आणि कन्झम्प्शन वाढण्याची शक्यता आहे, त्यामुळे वीजनिर्मिती कंपन्यांच्या 'प्लान्ट लोड फॅक्टर' पातळीत वाढ होण्याची दाट शक्यता आहे. ग्रामीण भागात १०० टक्के विद्युतीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना व एकात्मिक विकास योजना यांच्यासाठी आठ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रिन्युएबल ऊर्जेसाठी अर्थसंकल्पात वाढता नकारात्मक घसारा कमी करण्याचे सुचवण्यात आले आहे, त्यामुळे मार्च, २०१७ मध्ये स्थापित होणाऱ्या पवनऊर्जा प्रकल्पांच्या विजदरामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

**अणु ऊर्जा**

आगामी १५ ते २० वर्षांत देशाची अणु ऊर्जा क्षमता विकसित करण्याचे उद्दिष्ट आखण्यात आले आहे. हे एक हरित ऊर्जेकडे आणि देशासाठी उर्जेचे सर्वंकष स्त्रोत निर्माण करण्याकडे टाकलेले पाऊल आहे, जे की थोरियमच्या मुबलकतेमुळे शक्य आहे. भारतात अणु ऊर्जेचा विकास व्हावा यासाठी अर्थसंकल्पात तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**स्वच्छ उर्जेवरील उपकर**

कोळसा, लिग्नाइट आण पीट यांच्यावर लावण्यात आलेल्या स्वच्छ ऊर्जा उपकरचे नामकरण आता स्वच्छ पर्यावरण उपकर असे करण्यात आले आहे आणि त्याचा दर २०० रुपये प्रतिटनावरून ४०० रुपये प्रतिटन असा करण्यात आला आहे. याचा परिणाम कोळसाधारित ऊर्जा प्रकल्पांवर होईल आणि पर्यायी इंधन स्रोतांच्या विस्तारीकरणाला त्याचा लाभ मिळेल.

**तेल आणि वायू क्षेत्र**

खोल समुद्र व जलस्त्रोतांतून नवीन तेल व वायूंच्या संशोधनाची व्यवहार्यता सुधारावी यासाठी संशोधन आणखी तीव्र करण्यात आले आहे. तेल व वायू उत्पादनात अधिकाधिक स्वदेशी कंपन्यांची रुची त्यामुळे वाढेल, आणि त्यामुळे तेलआयातीचा अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण हलका होईल आणि आपल्या देशातील तेल व वायूच्या किमती अधिकाधिक स्पर्धात्मक होण्यास मदत होईल.

***रस्तेबांधणीसाठी एकंदर ९७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ५५ हजार कोटी रुपयांचा निधी सरकारकडून देण्यात आला आहे तर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) करमुक्त बॉण्ड्सच्या माध्यमातून १५ हजार कोटी रुपयांचा निधी उभारू शकते. तर या योजनेतच तरतूद करण्यात आलेला २७ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारांनी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत (पीएमजीएसवाय) निर्माण करायचा आहे.***

**सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी)**

विद्यमान अर्थसंकल्पात सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) प्रारुप हा एक महत्त्वाचा घटक आहे. सर्व क्षेत्रांतील सर्व मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या विकासासाठी, जे दीर्घ कालावधीचे असतात, खासगी क्षेत्राची गुंतवणूक व खासगी क्षेत्रातील तज्ज्ञ महत्त्वाची भूमिका पार पाडतात. खासगी गुंतवणूकदार स्वस्त आणि अधिक कार्यकुशल असल्याने पीपीपी प्रारूप सार्वजनिक क्षेत्राच्या गुंतवणुकीवरील वित्तीय ताण हलका तर करतेच शिवाय जोखीमही कमी करते. पीपीपी प्रारूप अद्याप त्याच्या बाल्यावस्थेत असले तरी भारत सरकार पीपीपी प्रारूप अधिकाधिक लवचिक कसे होईल, यासाठी प्रयत्नशील आहे.

**पीपीपीच्या पुनरुज्जीवनाच्या पायऱ्या**

- २०१६-१७ दरम्यान पब्लिक युटिलिटी (वादांचा निपटारा) विधेयक आणले जाईल
- पीपीपी सवलत कराराच्या पुनर्रअटींची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जातील
- पायाभूत प्रकल्पांसाठीची नवीन क्रेडिट रेटिंग सिस्टीम सादर केल जाईल

(पीपीपीबाबतचे वरील मुद्दे पीपीपी प्रारूपाच्या नविनीकरणासंदर्भात केळकर समितीने जारी केलेल्या अहवालातील आहेत. )

पीपीपी कंत्राटाच्या पुनर्अटीसाठीची प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वे निर्मात्या कंपन्यांसाठी, ज्यांच्यावर अव्यवहार्य टेरिफचा परिणाम झाला होता, सकारात्मक आहेत. तसेच दीर्घ काळ टिकणाऱ्या प्रकल्पांसाठीही ते हितकारक आहे.

- पायाभूत व ऊर्जा क्षेत्रातील खर्चात आणखी वाढ करण्यासाठी सरकार

एनएचएआय, पीएफसी, आरईसी, आयआरईडीए, नाबार्ड आणि अंतर्गत जलस्रोत प्राधिकरण यांच्यावतीने २०१६-१७ मध्ये बाँड्सची उभारणी करून ३१ हजार ३०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देऊ शकेल.

**वादांचे निराकरण**

विद्यमान अर्थसंकल्पात वादांच्या निराकरणासाठी स्वतंत्र कायदेशीर मार्ग तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे पीपीपी

***विद्यमान अर्थसंकल्पात सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) प्रारुप हा एक महत्त्वाचा घटक आहे. सर्व क्षेत्रांतील सर्व मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या विकासासाठी, जे दीर्घ कालावधीचे असतात, खासगी क्षेत्राची गुंतवणूक व खासगी क्षेत्रातील तज्ज्ञ महत्त्वाची भूमिका पार पाडतात. खासगी गुंतवणूकदार स्वस्त आणि अधिक कार्यकुशल असल्याने पीपीपी प्रारूप सार्वजनिक क्षेत्राच्या गुंतवणुकीवरील वित्तीय ताण हलका तर करतेच शिवाय जोखीमही कमी करते.***

प्रारूपाच्या प्रकल्पांमध्ये तक्रार वा वादांचे निराकरण अधिकाधिक लवचिकतेने, पारदर्शक पद्धतीने आणि जलदगतीने होऊ शकेल.

**एफडीआय धोरणे**

थेट विदेशी गुंतवणुकीच्या धोरणांत बदल करण्याचे सुतोवाच करण्यात आले आहे. अन्नप्रक्रिया व स्टोअरेज उद्योगांत १०० टक्के एफडीआयला परवानगी देण्यात आली आहे, कारण त्यामुळे सरकारला स्वस्त भांडवल आणि कमी जोखीम प्राप्त होते. तसेच ज्या परदेशी गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करण्यात रुची आहे, त्यांनाही त्यामुळे संधी प्राप्त होते.

**कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधा**

भारतातील जवळपास निम्मे मनुष्यबळ कृषी क्षेत्रात (मत्स्यपालन आणि फूलशेती यांच्यासह) कार्यरत आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी या क्षेत्रातील पुढील पायाभूत सुविधांचा विकास होणे गरजेचे आहे.

- अन्नसुरक्षेसाठी स्टोअरेज व कोल्ड चेन इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सुधारणा
- उत्पादनवाढीसाठी सेंद्रीय खाद्य आणि खते यांची खरेदी
- भूजलाची गरज कमी करण्यासाठी सर्वसमावेशक पायाभूत सुविधांचा विकास
- जलसिंचन न झालेल्या शेतजमिनींसाठी सिंचनाच्या पायाभूत सुविधांचा विकास करणे
- शेतक-यांच्या थेट महसुलासाठी पायाभूत सुविधांची ऑनलाइन विक्री व खरेदी
- रासायनिक खतांसाठी देण्यात येणारी सबसिडी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे

**ग्रामीण भागातील पायाभूत क्षेत्र**

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७२.२ टक्के लोक ग्रामीण भारतात राहतात. मात्र तरीही शहरी भागाप्रमाणे या भागातील पायाभूत सुविधा तशा कच्च्याच आहेत. कारण शहरी भागात लोकसंख्येची घनता जास्त आहे आणि साक्षरताही चांगली आहे. त्या तुलनेत ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करण्याइतपत ते तितके आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाहीत, असा समज आहे. मात्र, आता ग्रामपंचायतींना आर्थिक व कार्यात्मक दृष्टीने अधिकाधिक सक्षम करण्यात येत आहे.

- ३०० रुर्बन (ग्रामीण आणि नागरी) क्लस्टर्सचा श्यामाप्रसाद मुखर्जी रुर्बन मिशनअंतर्गत विकास करण्यात आला आहे
- १ मे २०१८ पर्यंत सर्व खेड्यांचे १०० टक्के विद्युतीकरण करण्यात येणार आहे
- पुढील तीन वर्षांत ६ कोटी अतिरिक्त घरांमध्ये नवीन डिजिटल साक्षरता मिशनअंतर्गत जोडण्यात येणार आहे
- केंद्राद्वारे अनुदानित असलेल्या योजनांच्या माध्यमातून जी गावे हागणदरीमुक्त झाली आहेत, त्यांच्यासाठी बक्षीस योजना
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पीएमजीएसवाय) भारत प्रथमच प्रचंड ताकदीने राबवत आहे. निधीअभावी भूतकाळात या योजनेचे प्रचंड नुकसान झाले. २०१२-१३ आणि २०१३-१४ या कालावधीत या योजनेसाठी अनुक्रमे आठ हजार ८८५ कोटी आणि नऊ हजार ८०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन वर्षांत या योजनेत भरीव तरतूद करण्यात आली असून यंदाच्या अर्थसंकल्पात तब्बल १९ हजार कोटी रुपयांची

तरतूद प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसाठी करण्यात आली आहे. राज्यांच्या साथीने एकूण २७ हजार कोटी रुपये या योजनेत यंदाच्या वर्षी खर्च केले जातील. २.२३ लाख किमीचे रस्ते उभारून उर्वरित ६५ हजार ठिकाणे जोडण्याचे २०२१ सालचे उद्दिष्ट २०१९ मध्येच पूर्ण करण्याचा इरादा आहे. त्यासाठी दरदिवशी १०० किमीच्या रस्त्यांची उभारणी करण्याचा सध्याचा वेग, जो २०११-१४ या कालावधीत सरासरी ७३.५ किमी एवढा होता, आणखी वाढवावा लागणार आहे.

**समाप्ती**

एकंदरच यंदाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागासाठी करण्यात आलेली भरीव तरतूद ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा प्रचंड विकास करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्धाराचे प्रतीक आहे. खरोखरच, सार्वजनिक खर्चात वाढ करून, नवीन पायाभूत निधी तयार करून आणि मजबूत, पारदर्शक पीपीपी प्रारूपासाठी पाया रचून केंद्र सरकार प्रदीर्घ काळापासून विकासाच्या मार्गात अडथळा बनू पाहणाऱ्या आव्हानाचा कायमचा सोक्षमोक्ष लावण्याप्रती कटिबद्ध असल्याचे यातून सिद्ध होते. अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशी गुंतवणूकदारांनीही वेळोवेळी याच अडथळ्यांवर बोट ठेवले होते.

अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना, ज्यातून हे ध्वनित होत आहे की, सरकारला सार्वजनिक पैसा दीर्घकाळासाठी वापरण्याची इच्छा आहे आणि त्यांनी आर्थिक प्रगतीचा गाडा पायाभूत सुविधांमधील गुंतवणूकीच्या माध्यमातून पुढे रेटायचा ठरवल्याचे दिसून येत आहे. अर्थसंकल्पातून हे एक स्पष्ट होत आहे की, सरकारला केवळ नागरी भागातच पायाभूत सुविधांचा विकास करायचा नसून सुधारित धोरणानुसार ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचाही विकास करायचा आहे. भूतकाळात खासगी निधीअभावी अनेक पायाभूत प्रकल्प सुरूच होऊ शकले नाहीत अथवा मध्येच बंद पडले. परंतु या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांमधील गुंतवणूकीसाठी खासगी क्षेत्रही पुढे येईल याची हमी देण्यात आली आहे. एकूणच हा अर्थसंकल्प चांगला आहे, सर्वच क्षेत्रांना समान न्याय देण्याचा त्यात प्रामाणिक प्रयत्न आहे. शेतकरी, ग्रामीण, सामाजिक आणि पायाभूत सुविधांचा विकास यांच्यावर स्पष्टपणे लक्ष केंद्रित केलेला हा अर्थसंकल्प बदलाचे प्रतीक आहे.

***सरकारला सार्वजनिक पैसा दीर्घकाळासाठी वापरण्याची इच्छा आहे आणि त्यांनी आर्थिक प्रगतीचा गाडा पायाभूत सुविधांमधील गुंतवणूकीच्या माध्यमातून पुढे रेटायचा ठरवल्याचे दिसून येत आहे. अर्थसंकल्पातून हे एक स्पष्ट होत आहे की, सरकारला केवळ नागरी भागातच पायाभूत सुविधांचा विकास करायचा नसून सुधारित धोरणानुसार ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचाही विकास करायचा आहे.***

■■■

*लेखक वेगवेगळ्या नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये आर्थिक तसेच पायाभूत सुविधा या विषयांचे अध्यापन करीत आहेत.*





# केंद्रीय अर्थसंकल्प आणि जलसिंचन

सी.एस. सी. शेखर



***कृषी क्षेत्राच्या पुढील काळातील वाढीत पाटबंधारे सुविधांसाठी केलेली तरतूद महत्वाची ठरणार आहे. गेली दोन वर्षे लागोपाठ दुष्काळ पडल्याने शेती क्षेत्रात विकासाची स्थिती तर नव्हतीच उलट मोठा फटका बसलेला होता त्यावर उपाय म्हणून शेती क्षेत्रास झुकते माप देण्यात आले आहे.***

यंदाचा म्हणजे२०१६-१७ या वर्षाचा अर्थसंकल्प हा कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रासाठी प्रोत्साहक आहे. त्यात अनेक नवीन योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. त्याच पाटबंधारे सुविधांचा प्रामुख्याने समावेश आहे. कृषी क्षेत्राच्या पुढील काळातील वाढीत पाटबंधारे सुविधांसाठी केलेली तरतूद महत्वाची ठरणार आहे. गेली दोन वर्षे लागोपाठ दुष्काळ पडल्याने शेती क्षेत्रात विकासाची स्थिती तर नव्हतीच उलट मोठा फटका बसलेला होता त्यावर उपाय म्हणून शेती क्षेत्रास झुकते माप देण्यात आले आहे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेत इतर क्षेत्रात चांगला विकास झाला तरी कृषी क्षेत्रातील वाढ २०१२-१३ मध्ये १.५ टक्के होती त्यानंतरच्या वर्षात ४.२ टक्के व उणे०.२ टक्के अशी वाढ कृषी क्षेत्रात नोंदली गेली.सांख्यिकी संस्थेच्या आकडेवारीनुसार २०१५-१६ मध्ये कृषी वाढीचा अंदाजित दर १.१ टक्के होता त्यापेक्षा स्थिती थोडी बरी राहिली. दोन वर्षे दुष्काळ, काही व्यवस्थात्मक समस्या होत्या त्यात पाटबंधाऱ्यांची अपुरी संख्या ही एक समस्या होती. विपणनात पुरेशी भांडवली गुंतवणूक नव्हती त्यामुळे कृषी क्षेत्राची वाढ ऋण होती. सध्याच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रातील सर्व समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात जास्त महत्वाची योजना पाटबंधाऱ्यांची आहे शिवाय ग्रामीण पायाभूत सुविधा व विपणन यातही चांगल्या योजना प्रस्तावित केल्या आहेत.

अर्थसंकल्पातील तरतुदींचे सकारात्मक परिणाम हे एकूण कृषी क्षेत्राच्या वाढीचा विचार करता महत्वाचे आहेत. त्यात अन्नधान्य उत्पादन, अन्नधान्याची दरवाढ व कृषी वाढ या सर्व आघाड्यांवर त्यामुळे फरक पडणार आहे. १९० च्या मध्यावधीपासून कृषी क्षेत्राची दुरवस्था सुरू झाली. कृषी वाढ खुंटली, अन्नधान्य उत्पादन कमी झाले. कृषी उत्पादन वाढीचा दर १९९७-९८ व २००४-०५ दरम्यान वार्षिक २.२ टक्के होता. ही वाढ हरितक्रांतीच्या आधीच्या काळातील वाढीइतकी कमी होती असे म्हणायला हरकत नाही. अन्नधान्य उत्पादन वेगाने कमी होत गेले. त्यानंतर कृषी क्षेत्रातील अपुरी भांडवली गुंतवणूक या समस्येत भर टाकणारी ठरली, शेतीतील नफा कमी झाला.जो आधीही कमीच होता. २००५-०६ या वर्षात शेतीची स्थिती सुधारण्यास सुरूवात झाली सरकारने काही सकारात्मक पावले उचलली. शेतीत गुंतवणूक थोडी वाढली. २००७-०८ या वर्षात अनेक कार्यक्रम राबवण्यात आले. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमुळे गुंतवणूक वाढली आहे. एनएफएसएम योजनेने अन्न उत्पादन

वाढले आहे.या कार्यक्रमांमुळे कृषी क्षेत्रातील कामगिरी सुधारली पण तरी नंतर उत्पादनातील शाश्वती राहिली नाही व विपणन म्हणजे विक्रीतील समस्या कायम राहिल्या त्यामुळे शेती क्षेत्राचा आर्थिक विकास पुरेसा झालाच नाही. सध्याचा अर्थसंकल्पात अनेक प्रलंबित प्रश्नांचा विचार केला आहे.

**पाटबंधारे-** भारतीय कृषी क्षेत्र हे मान्सूनवर जास्त अवलंबून आहे. केवळ ४५ टक्के जमीन ही सिंचनाखाली आहे त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनक्षमतेबाबत कमालीची अस्थिरता आहे. या अर्थसंकल्पाने प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून कृषी पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. हा महत्वाचा पाटबंधारे कार्यक्रम असून त्यात १७ हजार कोटींचा योजना आराखडा आहे. त्यामुळे २८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. देशात बंद पडलेल्या किंवा रेंगाळलेल्या ८९ पाटबंधारे योजना जलद सिंचन लाभ कार्यक्रमात आणण्यात येणार आहेत त्यामुळे ८१ लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल. भूजल स्त्रोत वापरण्यासाठी व त्यात जलपुनर्भरण करण्यासाठी सहा हजार कोटी रूपयांचा निधी दिला आहे. याशिवाय शेततळी, विहिरी खणणे या उपाययोजना मनरेगा म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत केल्या जाणार आहेत. या उपाययोजनांसह दीर्घकालीन पाटबंधारे योजनांसाठी २५ हजार कोटींच्या निधीची तरतूद केली आहे त्यामुळे कृषी क्षेत्राच्या वाढीला नक्कीच चालना मिळणार आहे.

***कृषी पतपुरवठ्याचे यंदाच्या वर्षातील लक्ष्य हे गेल्या वर्षीच्या ८.५ लाख कोटी रूपयांच्या ऐवजी ९ लाख कोटी करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना व्याजाच्या पोटी १५००० कोटी रूपयांची मदत केली जाणार आहे. असे असले तरी प्रत्यक्ष कृषी उत्पादकांना कर्ज मिळते किंवा ते कर्ज घेतील याची शाश्वती असली पाहिजे. ते जमिनीचे कायदेशीर हक्क व औपचारिक मालकी यावर अवलंबून आहे.***

**पतपुरवठा व विमा**

पतपुरवठ्यातील अडचणी हा कृषी क्षेत्रातील मोठा अडथळा आहे. कृषी पतपुरवठा व देशांतर्गत कृषी उत्पन्न यांचा विचार केला तर हे प्रमाण १९९९-२००० या काळात १० टक्के तर २०१२-१३ या काळात ३८ टक्के होते. दीर्घमुदतीच्या कर्जांचे प्रमाण हे गेल्या काही वर्षात झपाट्याने कमी झाले आहे. २००६-०७ मध्ये ते ५५ टक्के होते


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______ date ______

Name (in block letters) : ______

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______

Phone No. / email : ______

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in **येथे ऑनलाईन भरावे.**

ते २०११-१२ मध्ये ३९ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. यातून आपल्याला दीर्घ मुदतीचा पतपुरवठा हा आगामी काळात वाढवण्याची गरज आहे हेच दिसून येते.याच उद्देशाने कृषी पतपुरवठ्याचे यंदाच्या वर्षातील लक्ष्य हे गेल्या वर्षीच्या ८.५ लाख कोटी रूपयांच्या एवजी ९ लाख कोटी करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना व्याजाच्या पोटी १५००० कोटी रूपयांची मदत केली जाणार आहे. असे असले तरी प्रत्यक्ष कृषी उत्पादकांना कर्ज मिळते किंवा ते कर्ज घेतील याची शाश्वती असली पाहिजे. ते जमिनीचे कायदेशीर हक्क व औपचारिक मालकी यावर अवलंबून आहे. हवामानाच्या लहरीपणामुळे पिकांचे नुकसान होते व त्यामुळे शेतकऱ्यांना फटका बसतो. पंतप्रधान पीक विमा योजना ही यावर उपाय म्हणून सुधारित स्वरूपात सादर केली आहे. या योजनेसाठी ५५०० कोटी रूपयांची तरतूद केली असून पिकांचे खराब हवामानाने किंवा अतिपाऊस- दुष्काळाने नुकसान झाले तर शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळणार आहे. त्यासाठी तेलबिया व अन्नधान्यासाठी प्रीमियम २ टक्के तर फळपीके व कापसासाठी प्रीमियम ५ टक्के असेल. या योजनेतील आकर्षक बाब म्हणजे जी रक्कम आश्वासित केली आहे त्यात कपात केली जाणार नाही व प्रीमियमवर कुठलीही मर्यादा नाही. खतांच्या अनुदानासाठी थेट अनुदान हस्तांतराचा प्रयोग प्रायोगिक पातळीवर राबवण्यात येणार आहे. त्यामुळे खतांचे अनुदान थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केले जाणार आहे. या योजना चांगल्याच आहेत पण त्यांचे यश हे जमिनीचे औपचारिक हक्क व जमिनीच्या भाडेपट्ट्याचे स्वरूप यावर अवलंबून असणार आहे. या मुद्द्याकडे आपण नंतर परत येणार आहोत.

खरेदी, वितरण व विपणन- विकेंद्रित खरेदी मोहीम अनेक राज्यांनी राबवावी यासाठी काही उत्तेजक योजना या अर्थसंकल्पात आहेत ऑनलाईन खरेदी व पारदर्शक खरेदी व्यवस्था याचे महत्व त्यात आहे. राखीव साठा हा सरकारी खरेदीतून केला जाणार आहे. किमान किफायतशीर दर म्हणजे स्वस्त धान्य दुकानांची यंत्रणा स्वयंचलित केली जाणार आहे. त्यात तीन लाख दुकानांचा समावेश आहे देशात एकूण ५.३५ लाख स्वस्त धान्य म्हणजे रेशन दुकाने आहेत. राष्ट्रीय कृषी बाजारपेठ सुरू करण्यात येणार असून त्यात कृषी-तंत्र पायाभूत निधीचा वापर केला जाईल, जुलै २०१५ मध्ये त्यासाठी मंत्रिमंडळाने काही निधी मंजूर केला असून अर्थसंकल्पात आणखी २०० कोटी रूपये मंजूर केले आहेत. आताचा अर्थसंकल्प हा या योजनेशी ५८५ नियमित बाजारपेठांना जोडणार आहे. तरी त्यात काही अडचणी आहेत. कारण कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

बदल करावे लागणार आहेत. त्यात संपूर्ण राज्यात एकच परवाना , एकच बाजारपेठ शुल्क, इलेक्ट्रॉनिक लिलाव पद्धती यांचा अवलंब करावा लागणार आहे. सध्या केवळ बारा राज्यात कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात सुधारणा केली आहे व इतर राज्यांनीही या सुधारणा वेगाने राबवण्याची गरज आहे. यात आणखी एक प्रमुख समस्या अशी की, फलोत्पादन क्षेत्राच्यापुढे हंगामोत्तर पीक नासाडीचा धोका असतो. फळे खराब होतात त्यामुळे बरेच उत्पादन वाया जाते. भारतात एकूण उत्पादनापैकी २०-२२ टक्के फळ उत्पादन हे खराब झाल्याने वाया जाते (अपेडा २००७). आताचे सुधारित अंदाज बघितले तर एकूण १५ टक्के फळे व भाजीपाला सडल्याने वाया जातो (आर्थिक सर्वेक्षण २०१५-१६ खंड २ पान ११५). या वाया जाणाऱ्या फळे व भाजीपाल्याचे प्रमाण कमी केले पाहिजे. फळ व भाज्या उत्पादनांच्या विपणनात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली आहे त्यामुळे अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना मिळणार आहे परिणामी वाया जाणारी फळे व भाजीपाला यांचे प्रमाण कमी होईल.

ग्रामीण विकास - ग्रामीण विकासाची तरतूद ८७,७६५ कोटी रूपयांपर्यंत वाढवली आहे. त्यातील ३८,५०० कोटी मनरेगाला दिले आहेत. आतापर्यंत ग्रामीण भागाला एवढी तरतूद प्रथमच मिळाली आहे. ग्राम पंचायती व पालिका यांचे अनुदान २.८७ लाख कोटी केले आहे. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीला ८० लाख रूपयचे मिळतील व ते पुरेसे आहेत. ग्रामीण विभागातील तरतुदीत केलेली वाढ ही पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेसाठी म्हणजे रस्ते बांधण्यासाठी महत्वाची आहे. कृषी वगळता इतर क्षेत्र व ग्रामीण बांधकामे, वाहतूक व इतर सेवा सुधारण्यात येणार आहेत त्यातून रोजगार निर्मिती होईल. यातील तरतूद वाढल्याने ग्रामीण भागातील कृषीतर खर्च वाढून त्याचा सकारात्मक परिणाम होईल त्यामुळे ग्रामीण रोजगार वाढेल.

**अर्थसंकल्पातील उणिवा**

या अर्थसंकल्पात कृषी व ग्रामीण क्षेत्राचा विचार करता काही कमतरता आहेत. राज्यांना कृषी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी उत्तेजन देणे महत्वाचे आहे कारण कृषी हा राज्यसूचीतील म्हणजे राज्यांच्या अखत्यारीतील विषय आहे व त्यात वाढीसाठी राज्यांची गुंतवणूक वाढणे गरजेचे आहे. कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीत गेल्या काही वर्षात कपात झाली आहे. एकूण भांडवल निर्मिती ही कृषी क्षेत्रात २०११-१२ मध्ये १८.३ टक्के होती ती २०१४-१५ मध्ये १५.८ टक्के झाली आहे. गेल्या काही वर्षात हा विरोधाभास दिसतो आहे विशेष करून २००४-०५ नंतर भांडवलात वाढ झाली होती, ती अलिकडे कमी झालेली दिसते आहे. त्यामुळे गुंतवणूकही कमी झाली आहे. अर्थसंकल्पात शेतीमधील गुंतवणुकीत राज्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना नाहीत, आपल्या देशात हवामान फार लहरी आहे. वेगवेगळ्या राज्यात भिन्न स्थिती आहे. त्यामुळे पीक विमा व इतर योजना अर्थसंकल्पात असल्या तरी त्यांची रचना ठरवताना स्थानिक बाबींचा विचार करायला पाहिजे तरच त्या यशस्वी होतील. त्यामुळे धोरण ठरवताना वरून खाली म्हणजे केंद्राकडून राज्याकडे असा क्रम चालणार नाही. किंबहुना तो दृष्टिकोन महत्वाच्या योजनांसाठी हितकारक नाही. प्रदेश विशिष्ट अशा घटकांचा विचार करून जिल्हा कृषी आराखडे विविध राज्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेत तयार केले आहेत. त्याचा वापर यात करायला पाहिजे. (सेन २०१६)

आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे थेट हस्तांतर, पतपुरवठा या योजनांचे यश हे भाडेपट्टा सुधारणा, जमीन मालक सुधारणा, भूनोंदी आधुनिकीकरण यावर अवलंबून आहे. योग्य लाभार्थीचा शोध घेणेही यात महत्वाचे आहे. जमीन नोंदणीच्या आधुनिकीकरणाला महत्व आहे त्यामुळे भाडेपट्टा मालकी व जमीन मालकी यातील सुधारणा योजनांच्या यशासाठी महत्वाच्या आहेत. जमीन मालकी व भाडे कायदे सुधारणे गरजेचे आहे कारण त्यातून भाडेपट्टा करार औपचारिक होतील. त्यामुळे कृषी उत्पादकांना कर्ज मिळणे सोपे होईल. नेमके लाभार्थी ओळखणे सोपे जाईल. पीक विमा व थेट निधी हस्तांतर योजनेत त्याचा फायदा होईल. सध्या फायदे जमीन मालकांना मिळतात प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळत नाहीत. जमीन नोंदींचे आधुनिकीकरण गरजेचे आहे. त्यामुळे जमिनीचे हक्क योग्य व्यक्तींना मिळतील. जमीन महसूल विभागाचे डिजिटायझेशन करावे लागेल व त्यातील नोंदी प्रकरणे, दावे हे वेगाने निकाली काढावे लागतील (निती आयोग २०१५).

संलग्न व विस्तारित सेवांचे आधुनिकीकरणही यात महत्वाचे आहे. त्यावर अर्थसंकल्पात फार लक्ष दिलेले नाही त्यात कृषी क्षेत्रातील संलग्न सेवांकडे लक्ष द्यायला हवे. सरकारी योजनांच्या वापरचा अभाव. तंत्रज्ञान वापराचा अभाव नेमका कुठे आहे, याचा शोध घेऊन काही योजना राबवायला हव्यात. संलग्न व विस्तारित सेवा नसल्याने शेतकऱ्यांना तंत्रज्ञान व सरकारी योजनांची माहिती नाही त्यांच्या पर्यंत ती पोहोचवण्याची व्यवस्था आवश्यक होती. कृषी क्षेत्राला पुन्हा वाढीच्या मार्गावर आणण्यासाठी अशा पूरक सेवांची गरज आहे.

■■■

*लेखक दिल्ली विद्यापीठाच्या इन्स्टिटयूट ऑफ ग्रोथ या संस्थेत सहयोगी प्राध्यापक आहेत.*

*email: sekhar@iegindia.org*

# अर्थसंकल्प आणि देशांसमोरील समस्या

हेमंत देसाई



***आर्थिक विकास व रोजगारवाढ तसेच मेक इन इंडियाकरिता देशी उत्पादनास प्रोत्साहन ही अर्थसंकल्पाची उद्दिष्टे असतील, असे महसूल सचिव हसमुख अढिया यांनी जाहीरच केले होते. त्या दिशेने काही पावले टाकण्यात आली आहेत. करांची फेररचना व सुगमीकरणही केले जाईल, असा अंदाज मी आधीच व्यक्त केला होता. त्या दिशेने काही उपाययोजना करण्यात आली आहे. मात्र भारतात ठोकळ उत्पन्नाच्या प्रमाणात करांचे प्रमाण फक्त १० टक्के, म्हणजे इतर देशांच्या मानाने खूपच कमी आहे.***

गेल्या १० फेब्रुवारीस सेन्सेक्स २३ हजाराच्या खाली गेला, तर निफ्टी २१ महिन्यांत गेला नव्हता, अशा पातळीवर, म्हणजे ७००० अंशांच्याही खाली घसरला. फेब्रुवारीमधील चार दिवसांतच भागधारकांकडे असलेल्या शेअर्स किंवा समभागांचे मूल्य ७ लक्ष कोटी रुपयांनी घटले. युरोप-अमेरिका व आशियाई बाजारपेठा कोसळल्यामुळे हे घडले. तसेच जगभरच्या बाजारांत चढउतार वाढल्यामुळे परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी १२ हजार कोटी रुपयांचे आपले शेअर्स विकून टाकले. नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी आल्यावरच्या दीड वर्षांत सेन्सेक्स जेवढा वधारला, तेवढाच तो आपटून पूर्ववत स्थितीस आला. त्यात अरुणाचल प्रदेशातील राष्ट्रपती राजवट, जेएनयू, असहिष्णुता या मुद्द्यांवरून वातावरण तापल्यामुळे जीएसटी विधेयक लटकले. देशासमोर अभूतपूर्व असे शेतीसंकट निर्माण झाले आहे. त्यामुळेच जेटलींपुढची डोकेदुखी वाढली होती.

२००८च्या जागतिक मंदीच्या वेळी विदेशी अर्थसंस्थांनी भारतात गुंतवलेले २५० कोटी डॉलर्स काढून आपल्या देशांत नेले होते. २०१६ मध्ये हा आकडा आताच २०० कोटी डॉलर्सवर गेला आहे. डॉलर्स पळून चालल्यामुळे, त्यांचा भाव वधारून रुपया ६८.४७ वर गेला. अडीच वर्षांतील हा नीचांक होता. भारतीय कंपन्यांची निराशाजनक कामगिरी व औद्योगिक उत्पादनाचा घसरलेला निर्देशांक यामुळे विदेशी अर्थसंस्था भारतीय बाजारपेठांपासून दूर जाऊ लागल्या आहेत. त्यामुळेच रुपयाची घसरगुंडी सुरू आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत सत्ताधारी पक्षाला नुकसान सहन करावे लागले. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २०१६-१७च्या मांडलेल्या अर्थसंकल्पात म्हणूनच समाजातील अस्वस्थ घटकांना खूश करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आर्थिक विकास व रोजगारवाढ तसेच मेक इन इंडियाकरिता देशी उत्पादनास प्रोत्साहन ही अर्थसंकल्पाची उद्दिष्टे असतील, असे महसूल सचिव हसमुख अढिया यांनी जाहीरच केले होते. त्या दिशेने काही पावले टाकण्यात आली आहेत. करांची फेररचना व सुगमीकरणही केले जाईल, असा अंदाज मी आधीच व्यक्त केला होता. त्या दिशेने काही उपाययोजना करण्यात आली आहे. मात्र भारतात ठोकळ उत्पन्नाच्या प्रमाणात करांचे प्रमाण फक्त १० टक्के, म्हणजे इतर देशांच्या मानाने खूपच कमी आहे. ते वाढवायचे, तर कर वाढवून अधिक

करदात्यांना जाळ्यात ओढावे लागेल. तसे पुरेसे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. भारतात ३ ते ३.५ टक्के लोकच कर भरतात. बहुसंख्य लोक शेती करतात, शेतीवर कर नाही. २२ टक्के जनता दारिद्र्यरेषेखालील आहे. आणखी बरेच लोक, ज्यांचे उत्पन्न अडीच लाख रुपयेही नाही, त्यांना कर भरावा लागत नाही. तेव्हा महसूल वाढवायचा, तर कोणत्या तरी वर्गाला (मध्यम अथवा श्रीमंत) दुखवावे लागते. यावेळी श्रीमंतांवर काही प्रमाणात कर लावण्यात आले आहेत. मात्र त्यांना उद्योग व अन्य क्षेत्रांत देण्यात येणाऱ्या सवलतींच्या प्रमाणात हा भार काहीच नाही.

***मागच्या तीन वर्षांत राष्ट्रीयीकृत बँकांनी १ लक्ष १४ हजार कोटी रुपयांची कर्जे 'राइट ऑफ' म्हणजे बुडीत खाती जमा करून टाकली आहेत. मुख्यत: ही बड्या उद्योगांची कर्जे असून, त्याचे खापर संयुक्त पुरोगामी आघाडीवर फोडून मोकळे होता येणार नाही. कारण २०१४-१५ मध्ये ५३ हजार कोटी रु.ची कर्जे बुडाली असून, चालू वर्षात ५२ हजार कोटी रु.ची कर्जे बुडीत खाती जाणार आहेत. सरकारी बँकांच्या 'स्ट्रेस्ड ॲसेट्स'चे, म्हणजे धोक्यात आलेल्या कर्जाचे प्रमाण गतवर्षी एकूण कर्जांच्या जे १३.६ टक्के होते, ते आता चालू वर्षात १४.१ टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे.***

आर. व्ही. ईश्वर समितीने मुळातून कर कापण्याच्या (टीडीएस) दरांत आणि थ्रेशोल्ड्स किंवा मर्यादांमध्ये बदल सुचवले होते. पाच लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांच्या करसवलत मर्यादेत किरकोळ वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तीन हजार रु. पर्यंतचा कर वाचेल. साडेतीन लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना प्राप्तिकर नाही. तीन लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांना प्राप्तिकर नाही.

देशातील चित्र काय आहे? कारखान्यांमधील उत्पादन सलग दुसऱ्या महिन्यात, म्हणजे डिसेंबर २०१५ मध्ये १.३ टक्क्यांनी घसरले आहे. नोव्हेंबरमध्ये ते ३.४ टक्क्यांनी घटले होते. कॅपिटल गुड्स किंवा भांडवली मालाचे उत्पादन तर २० टक्क्यांनी घटले आहे. उत्पादन क्षेत्राचा औद्योगिक उत्पादनातील वाटा ७५ टक्के असतो. त्याची वाढही २.४ टक्क्यांनी ओसरली आहे. त्यामुळे या क्षेत्राची भरभराट कशी होईल, हे अर्थमंत्र्यांना पाहावे लागणारच होते. अर्थमंत्र्यांनी पायाभूत क्षेत्रासाठी घसघशीत तरतूद करून अंतर्गत वाहतूकही खुली केली आहे. तसेच स्टार्टअप उद्योगांना पहिली तीन वर्षे कोणताही कर लागू होणार नाही. हे योग्यच आहे, परंतु व्हेंचर कॅपिटल गुंतवणुकीसाठी अर्थसंकल्पात कोणतेही प्रोत्साहन नाही. तसेच विविध स्तरांवर संशोधनावर मिळणारी गुंतवणूक वजावट टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. हे गैरच आहे.

मागच्या तीन वर्षांत राष्ट्रीयीकृत बँकांनी १ लक्ष १४ हजार कोटी रुपयांची कर्जे 'राइट ऑफ' म्हणजे बुडीत खाती जमा करून टाकली आहेत. मुख्यत: ही बड्या उद्योगांची कर्जे असून, त्याचे खापर संयुक्त पुरोगामी आघाडीवर फोडून मोकळे होता येणार नाही. कारण २०१४-१५ मध्ये ५३ हजार कोटी रु.ची कर्जे बुडाली असून, चालू वर्षात ५२ हजार कोटी रु.ची कर्जे बुडीत खाती जाणार आहेत. सरकारी बँकांच्या 'स्ट्रेस्ड ॲसेट्स'चे, म्हणजे धोक्यात आलेल्या कर्जाचे प्रमाण गतवर्षी एकूण कर्जांच्या जे १३.६ टक्के होते, ते आता चालू वर्षात १४.१ टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे. 'याप्रश्नाचे अतिरंजित चित्र तयार करू नका' व 'घाबरून जाऊ नका' एवढेच जेटलीजी सांगत आहेत. परंतु स्टेट बँकेसारख्या मोठमोठ्या बँकाही अडचणीत येत असल्या, तर 'आम्ही व्यवस्थापनांना पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे', असे सांगून सरकारला मोकळे होता येणार नाही. अर्थसंकल्पात बँकांसाठी २५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ती अत्यल्प आहे. त्याच्या बळावर बँका सुदृढ होण्याची शक्यता सुतराम नाही. मुळात कर्जबुडव्या बड्या उद्योगपतींना वेसण घालण्याची धमक सरकारने दाखवलेली नाही.

अर्थसंकल्पात महागाईची दखल घेतलेली नाही. जानेवारी २०१६ मध्ये ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारलेली चलनवाढ ५.६९ टक्क्यांवर गेली होती. १७ महिन्यांतील ती सर्वाधिक आहे. त्यात अन्नधान्याची चलनवाढ सरासरी ६.८५ टक्के झाली. भाज्यांचे भाव ६ टक्क्यांनी, तर मांस-मासे यांचे ८ टक्क्यांनी वधारले. लोकांचा दैनंदिन प्रवासावर व शिक्षणावरचा खर्चही फुगलेला आहे.

देशात सर्वात मोठे संकट आहे ते शेतीचे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना पुन्हा उभे करावे लागेल. परंतु आत्महत्यांच्या कारणांचा मुळातून शोध घेऊन उपाय योजावे लागतील. प्रधानमंत्री पीक विमा योजना, राष्ट्रीय कृषी बाजारपेठेचा डिजिटल प्लॅटफॉर्म या नवीन योजनांचे स्वागत केले पाहिजे. कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी अर्थसंकल्पात ४४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून, ९

लाख कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषीवरच्या खर्चात ४४ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. मात्र शेतीमालासाठी अत्यंत कमी आधारभाव दिलेले आहेत. ते वाढवल्याशिवाय सहा वर्षांत कृषी उत्पन्न दुप्पट होणार कसे? वीज, पाणी, खत अनुदानांपेक्षा स्वस्तातील विमाछत्र पुरवणे केव्हाही चांगले. तसेच शेतकऱ्यांना आपला माल देशात कोठेही विकण्याचे स्वातंत्र्य दिल्यामुळे त्यास बाजारभाव अधिक मिळेल. परंतु कोरडवाहू शेतीसाठी व कृषी संशोधनासाठी अधिक तरतूद, एकूण कृषीतील सरकारी गुंतवणूक वाढवणे आणि शेती उत्पादकता वाढवण्याचे ठोस प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतीला न सावरता फक्त उत्पादक, कारखानदारी व सेवा क्षेत्रावर भर देणे धोक्याचे ठरेल. कारण शेतीतून बाहेर पडणारे लोक सामावून घेण्याइतकी कारखानदारी व सेवाक्षेत्रे ही अद्याप फोफावलेली नाहीत. तसेच शेतीतील स्वावलंबन आपण गमावता कामा नये.

आज जगात भारताचेच त्यातल्या त्यात बरे चालले आहे. पण त्याचे कारण आपली लोकसंख्या. इथली अंतर्गत बाजारपेठच मोठी आहे. त्यामुळे शेती व उद्योगातील माल खपतोही. पण यात प्रौढी मिरवण्यासारखे काही नाही. आपली निर्यातही घसरत आहे. मानवी विकास निर्देशांकाच्या क्रमवारीत भारत बराच खाली आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मांडला जाण्यापूर्वी आयएमएफ किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारत सरकारला एक स्पष्ट सूचना केली होती. ती अशी की, फिस्कल कन्सॉलिडेशन म्हणजेच आर्थिक सुसूत्रीकरण जारी ठेवा, व्यापक करसुधारणा आणि अनुदानकपात करा, अशी ती शिफारस होती. भारतातील कंपन्यांची प्रकृती बिघडलेली असून, सरकारी बँका तापाने फणफणलेल्या आहेत. त्याचा वित्तीय स्थैर्यावर परिणाम होईल, असा इशाराही देण्यात आला होता!

जगातील बाजारपेठांत अस्थिरता आणि नैराश्य आहे. अशावेळी संयम, विवेक आणि आर्थिक शहाणपणाची गरज असते. ३.५% वित्तीय तुटीचे लक्ष्य काढून केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्तुत्य कामगिरी केली आहे. आर्थिक विकासदर एक-दोन टक्क्याने नाही वाढला तरी चालेल; परंतु स्थूल अर्थशास्त्रीय स्थैर्य हे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, असा संदेशच सरकारने दिलेला आहे. परदेशी गुंतवणूकदार व अर्थसंस्था जेव्हा कोणत्याही देशात भांडवल टाकतात, त्यापूर्वी हे स्थैर्य विचारात घेत असतात.

---

***जगातील बाजारपेठांत अस्थिरता आणि नैराश्य आहे. अशावेळी संयम, विवेक आणि आर्थिक शहाणपणाची गरज असते. ३.५% वित्तीय तुटीचे लक्ष्य काढून केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्तुत्य कामगिरी केली आहे. आर्थिक विकासदर एक-दोन टक्क्याने नाही वाढला तरी चालेल; परंतु स्थूल अर्थशास्त्रीय स्थैर्य हे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, असा संदेशच सरकारने दिलेला आहे. परदेशी गुंतवणूकदार व अर्थसंस्था जेव्हा कोणत्याही देशात भांडवल टाकतात, त्यापूर्वी हे स्थैर्य विचारात घेत असतात.***

---

कारण स्थैर्यामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीची सुरक्षितता व शाश्वती मिळत असते. त्यामुळे रोखेबाजारासही विश्वास वाटतो. आता वित्तीय शिस्त प्राप्त झाल्यामुळे रिझर्व बँक व्याजदर कपातीचा विचार करू शकेल.

अर्थसंकल्पानंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत जेटलींना हा प्रश्न करण्यात आला, तेव्हा ते हसून उत्तरले की 'ही गोष्ट तुम्ही रिझर्व बँकेच्या गव्हर्नरनाच विचारा!' परंतु त्यांनी दिलेला संकेत स्पष्ट होता. राजन यांनीही आर्थिक सुसूत्रीकरणाचा, म्हणजेच वित्तीय तूट मर्यादा पाळण्याचा आग्रह सरकारकडे धरला होता. आता सरकारने त्याप्रमाणे वर्तन केल्यानंतर डॉ. राजन काय करतात, तीच कुतूहलाची बाब आहे.

२०१५-१६ साठीची तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ३.९% एवढी राखण्यात आली आहे. २०१६-१७ मध्ये ती ३.५% व २०१७-१८ मध्ये ३% वर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या भारतातील औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक घटला आहे. निर्यातविकासाचा वेग १३%नी उतरला आहे. कारखान्यांमधील उत्पादन कमी झाले आहे. कुठल्याही औद्योगिक वसाहतींत चक्कर मारा; मागणी नसल्याने वा वीज/पाणी यांच्या अभावी अनेक कारखाने बंद आहेत, असे दिसेल.

हे चित्र बदलण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक वाढणे आवश्यक होते. कारण खासगी गुंतवणूक नाही. ती नाही, कारण मागणी नाही. परंतु गुंतवणुकीवरचा सरकारचा खर्च वाढला की तूट वाढते. तेव्हा तूट नियंत्रण की विकास हा पेच होता. केंद्र सरकारने पहिला पर्याय निवडला. पण त्यामुळे विकासास कदाचित अपेक्षेपेक्षा जास्त झळ पोहोचण्याची भीती आहे, ती कशामुळे? तर चालू वर्षात (२०१५-१६) भांडवली खर्चात १५%ने वाढ झाली. आगामी वर्षात ती फक्त ३.९%ने होणार आहे. उलट चालू वर्षात महसुली खर्चात ५.५%नेच वृद्धी झाली, तर

पुढील वर्षी ती ११.८%ने होणार आहे. म्हणजे व्याज, पगार, आस्थापनांवरचा खर्च जास्त आणि स्थावर मालमत्तांवरचा/ विकासात्मक खर्च कमी. हे चांगले लक्षण नाही.

सरकार म्हणते की, नॉमिनल जीडीपी, (म्हणजे ज्यात चलनवाढीचा दर विचारात घेतलेला नसतो) आगामी वर्षात ८.६% वरून ११% वर जाईल. चलनवृद्धीचा ५.५% वगळल्यास, भारताचा विकासदर असेल - ५.५%च. मग आपण ७-७.५%ची भाषा कशी करतो आहोत? पुन्हा स्पेक्ट्रम विक्रीतून ७३% व निर्गुंतवणुकीतून १२३% जादा उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. ते साध्य करणे सोपे नाही.

आणकी एक मुद्दा. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने राष्ट्रीय उत्पन्नातील आपली नॉमिनल वाढ ८.६%नी झाल्याची माहिती दिली आहे. पुन्हा भविष्यात चलन फुगवट्याचा दर आणखी घटणे अपेक्षित आहे. तेव्हा आगामी वर्षातील नॉमिनल जीडीपी दर अवास्तवच वाटतो. म्हणजे मुळात तोच दर जास्त गृहीत धरला की, त्याबरोबर कर महसुलाचे अंदाजही अवास्तव केले जातात. निव्वळ करमहसूल ११.२%नी वाढेल. असे भाकित सरकारने केले आहे. चालू वर्षात ही वाढ फक्त ४.९% होती. कदाचित काळ्या पैसाविरोधी केलेल्या उपाययोजनांमुळे, मुख्यत: स्वेच्छा उत्पन्न जाहीर करण्याच्या घोषणेमुळे भरपूर निधी गोळा होईल, असा होरा असावा. परंतु पी. चिदंबरम संयुक्त आघाडी सरकारचे अर्थमंत्री असताना अशीच योजना आली होती. तेव्हा १० हजार कोटी रुपये मिळाले होते. हा आतापर्यंतचा विक्रम आहे. इतर वेळी आलेल्या अशा योजना अपयशी ठरल्या. उद्या समजा याच्या दुप्पट रक्कम मिळाली, तरी ती फार नव्हे.

चालू वर्षात धान्य अनुदानावर १८.५% जादा रक्कम खर्च झाली. परंतु पुढील वर्षात कमी खर्च होईल, असे अर्थमंत्र्यांना वाटते! तसेच सातव्या वेतन आयोगाचा बोजा विचारात घेताना त्यात भत्ते समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. म्हणजे प्रत्यक्षात तो खर्च वाढेलच.

अर्थसंकल्पाचा भर पायाभूत सुविधा व अन्य क्षेत्रांवर आहे. रस्ते व रेल्वे यांच्यासाठी मिळून २ लक्ष १८ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यामुळे नितीन गडकरी व सुरेश प्रभू या महाराष्ट्राच्या दोन मंत्र्यांना आपल्या कल्पना साकार करता येतील.

***आधारमार्फत रोख अनुदाने देण्यासाठी सरकार एक विधेयकच आणणार आहे, हे स्वागतार्ह आहे. कच्च्या तेलाचे भाव घसरल्यामुळे पेट्रोलियम अनुदाने आपोआपच १०ऱ्नी कमी झाली आहेत. खत अनुदानांमध्ये किरकोळ कपात झाली आहे. ही तरतूद ७२ हजार कोटींवरून ७० हजार कोटी रु. वर आली आहे. जनधन योजना, आधार व मोबाइल फोन (जॅम ट्रिनिटी) यामुळे अनुदानांमधील गळती रोखली जाईल.***

अर्थसंकल्पात अनुदानांमध्ये फक्त ३% कपात आहे. सरकार दरवर्षी युरियावर ५० हजार कोटी अनुदान देते. पण त्यातले १७ हजार कोटीच नीट खर्च होऊन त्याचा फायदा फक्त ३५% गरीब शेतकऱ्यांना होतो. रॉकेलवरचे ५५०० कोटींचे, विजेवरचे ३९ हजार कोटींचे, घरगुती गॅसवरचे ४० हजार कोटींचे आणि सोन्यावरचे ४००० कोटी रुपये अनुदान वाया जाते. म्हणजे ज्यांना नको त्यांना ते दिले जाते अथवा योग्यप्रकारे खर्च होत नाहीत. जगभर अनुदाने दिली जातात. कमकुवत लोकांना वर आणण्यासाठी अथवा शेतकऱ्यांना जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दिली जातात. परंतु श्रीमंतांना अनुदाने दिली जात नाहीत. तेव्हा त्यांना कात्री लावणे गरजेचे होते. आर्थिक पाहणी अहवालातच ही गरज प्रतिपादन केली होती.

आधारमार्फत रोख अनुदाने देण्यासाठी सरकार एक विधेयकच आणणार आहे, हे स्वागतार्ह आहे. कच्च्या तेलाचे भाव घसरल्यामुळे पेट्रोलियम अनुदाने आपोआपच १०%नी कमी झाली आहेत. खत अनुदानांमध्ये किरकोळ कपात झाली आहे. ही तरतूद ७२ हजार कोटींवरून ७० हजार कोटी रु. वर आली आहे. जनधन योजना, आधार व मोबाइल फोन (जॅम ट्रिनिटी) यामुळे अनुदानांमधील गळती रोखली जाईल. परंतु मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी आर्थिक सर्वेक्षणात ज्या अनुदानांचा उल्लेख केला आहे, ती श्रीमंतांना मिळतात. त्यावर वर्षाला १ लक्ष कोटी रुपये खर्च होतात. त्यांना धक्का लावण्यात आलेला नाही. सुमारे २० वर्षांपूर्वी चिदंबरम यांनीही अनुदानांबाबत श्वेतपत्रिका जारी केली होती. त्याचे पुढे काही झाले नाही. नुसत्या श्वेतपत्रिका, घोषणा, पाहणी अहवाल, संकल्प यांना अर्थ नसतो. सिद्धी काय होणार ते महत्त्वाचे!

■■■

*लेखक ज्येष्ठ पत्रकार असून आर्थिक विषयांचे अभ्यासक आहेत.*
emant.desai001@gmail.com

# अर्थसंकल्पामुळे बँकिंग क्षेत्राला संजीवनी मिळेल का ?

एन.आर.भानूमूर्ती व मनीष प्रसाद




***जागतिक आर्थिक पेचप्रसंगानंतर इतर अनेक देशांप्रमाणे भारतातही आर्थिक बाजू सावरण्यासाठी संपुट योजना म्हणजे धोक्यात असलेल्या क्षेत्रात पैसा ओतण्याचे प्रयत्न करण्यात आले, त्यामुळे अर्थव्यवस्था सावरली पण या उपाययोजना कुठल्याच देशासाठी दीर्घकालीन फायद्याच्या नव्हत्या तशा भारतासाठीही नव्हत्या. त्यामुळे भारताची आर्थिक तूट वाढली.***

यंदाच्या आर्थिक आढाव्यात भारतापुढे असलेल्या दोन आर्थिक आव्हानांचा उल्लेख करण्यात आला होता एक म्हणजे बँकिंग क्षेत्राचा कमजोर ताळेबंद, विशेष करून सार्वजनिक बँकांची वाईट स्थिती व दुसरे आव्हान होते ते कंपनी क्षेत्राच्या विकासाचे. दोन्ही गोष्टी तशा एकमेकांशी निगडित, त्यामुळे या दोन्ही बाबींवर २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात उपाययोजना अपेक्षित होत्या. सार्वजनिक बँकांचा भांडवलाचा प्रश्न महत्वाचा होता, त्यानुसार अर्थसंकल्पात बँकिंग क्षेत्राचे पुनरूज्जीवन करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यात काही थेट तर काही अप्रत्यक्ष धोरणात्मक उपाययोजनांचा समावेश आहे. त्या उपाययोजना नेमक्या काय आहेत हे जाणून घेण्याच्या आधी नेमक्या समस्येचे निदान आवश्यक आहे.

**प्रश्न नेमका काय आहे.**

जागतिक आर्थिक पेचप्रसंगानंतर इतर अनेक देशांप्रमाणे भारतातही आर्थिक बाजू सावरण्यासाठी संपुट योजना म्हणजे धोक्यात असलेल्या क्षेत्रात पैसा ओतण्याचे प्रयत्न करण्यात आले, त्यामुळे अर्थव्यवस्था सावरली पण या उपाययोजना कुठल्याच देशासाठी दीर्घकालीन फायद्याच्या नव्हत्या तशा भारतासाठीही नव्हत्या. त्यामुळे भारताची आर्थिक तूट वाढली. २००८-०९ मध्ये ही तूट दोन



अंकी झाली व ती एफआरबीएम लक्ष्य २००८-०९ मध्ये जवळ आले होते पण ते नंतर दूरचे स्वप्न ठरले. थोडक्यात आर्थिक तूट इतकी वाढली की ती कमी करणे हे एक मोठे आव्हान ठरले. त्याचा परिणाम म्हणून पतधोरणातही व्याज दर वाढले गेले. मोठी आर्थिक तूट व त्याचे स्थूल आर्थिक चलांवरचे परिणाम वाईट झाले. त्यातून भारताचा देशांतर्गत उत्पन्नाचा वाढीचा दर कमी झाला म्हणजेच विकास दर कमी झाला. चलनवाढ झाली, चालू खात्यावरची तूट वाढली परिणामी आर्थिक जोखीम वाढत जाऊन देशातील आर्थिक अस्थिरता वाढली. परिणामी देशाच्या आगामी काळातील आर्थिक वाढीवरही अनिष्ट परिणाम झाला.

आलेखात आर्थिक पेचापूर्वीचा काळ ते आताचा काळ या दरम्यानचा अनुत्पादित मालमत्तेचा कल खासगी व सरकारी बँकांच्या संदर्भात दाखवला आहे. या काळात दोन्ही गटातील बँकांची अनुत्पादित मालमत्ता तीन टक्क्यांच्या खाली होती किंमान खासगी बँकांपेक्षा १ टक्का कमी होती. याचे कारण कमी आर्थिक तूट व पेचापूर्वीच्या काळात बचतीस अनुकूल वातावरण हे होते. आर्थिक पेचानंतरच्या काळात सरकारी बँकांच्या अनुत्पादित मालमत्तेत वाढ झाली, खासगी बँकांची अनुत्पादित मालमत्ता तुलनेने मर्यादित राहिली. यातून आर्थिक व्यवस्था व तिची अवस्था यांचे नाते कळते, आर्थिक निकष पाळले गेले नाहीत तर त्याचा परिणाम आर्थिक बाजारपेठेत वेगवेगळ्या प्रकारे दिसतो. २०१६-१७ या वर्षात तिसऱ्या तिमाहीत ११ सार्वजनिक बँकांनी बऱ्याच काळानंतर तोटा जाहीर केला. त्यामुळे गुंतवणुकीवर वाईट परिणाम झाला. आर्थिक वाढीवरही परिणाम झाला. निव्वळ अनुत्पादित मालमत्तेवरही परिणाम झाला. मग मालमत्तेची म्हणजे कर्जाची फेररचना किंवा ते माफ करणे असे मुद्दे आले. सार्वजनिक बँकांचे माफ केलेले किंवा फेररचना केलेले कर्ज अग्रीमाच्या १७ टक्के होते. खासगी बँकांचे हेच प्रमाण ६.७ टक्के होते (तक्ता १ पाहा).

**तक्ता क्रमांक १- सार्वजनिक व खासगी बँकातील मालमत्तेची स्थिती**

| | सार्वजनिक बँका | | | | खासगी बँका | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मार्च१३ | मार्च१४ | मार्च१५ | सप्टेंबर १५ | मार्च१३ | मार्च१४ | मार्च१५ | सप्टेंबर १५ |
| निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (%) | २.० | २.७ | ३.२ | ३.६ | ०.५ | ०.७ | ०.९ | ०.९ |
| पुनर्रचित मालमत्ता (%) | ७.२ | ७.२ | ८.१ | ७.९ | १.९ | २.३ | २.४ | २.४ |
| | | | | | | | | |
| ढोबळ + पुनर्रचित मालमत्ता (%) | ११.० | ११.९ | १३.५ | १४.० | ३.८ | ४.२ | ४.६ | ४.६ |
| ढोबळ पुनर्रचित मालमत्ता कर्जमाफी+ (%) | १३.४ | १४.१ | १६.१ | १७.० | ५.४ | ६.४ | ६.७ | ६.७ |

स्त्रोत- रिझर्व बँकेचे संकेतस्थळ

ही अनुत्पादक मालमत्ता कुठल्या क्षेत्रामुळे वाढली हे पाहणे महत्वाचे आहे. तक्ता क्रमांक दोन मधील माहितीनुसार साधारण समजपेक्षा विपरित म्हणजे कृषी क्षेत्रामुळे अनुत्पादित मालमत्तेचे प्रमाण कमी आहे व कमी वाढीच्या काळात ते घसरत चालले होते. पण २०१५-१६ मध्ये कृषी कर्जांचे प्रमाण वाढले व दोन वर्षांच्या दुष्काळामुळे असे घडून आले असावे. औद्योगिक क्षेत्रात मध्यम व लघु उद्योगात अनुत्पादक मालमत्ता वाढलेली दिसते. कमी आर्थिक वाढीमुळे हा परिणाम दिसत आहे.

*अनुत्पादित किंवा वाया गेलेल्या मालमत्तांचे विभागनिहाय विवरण*

| | सर्व बँका (ढोबळ + पुनर्रचित व माफ मालमत्ता (%)) | | | |
|---|---|---|---|---|
| | मार्च१३ | मार्च१४ | मार्च१५ | सप्टेंबर१५ |
| कृषी | ८.२ | ७.४ | ७.५ | ७.९ |
| उद्योग (सूक्ष्म) | १०.२ | १०.० | १०.५ | १२.३ |
| उद्योग (लघु) | १३.२ | १३.३ | १४.८ | १६.८ |
| उद्योग (मध्यम) | २०.२ | २३.६ | २७.० | ३१.५ |
| उद्योग (मोठे) | १६.३ | १९.० | २३.० | २३.७ |

***स्त्रोत- रिझर्व बँक संकेतस्थळ***

**परिणाम**

अनुत्पादित मालमत्तेचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो. असा एक प्रश्न आहे. पतपुरवठ्याच्या मार्गाने व व्याज दराच्या मार्गाने त्याचा विचार करता येतो. अलिकडे चलनवाढ नियंत्रित करण्याच्या लवचिक व्यवस्थेमुळे व तेलाच्या किंमती घसरल्याने देशांतर्गत चलनवाढ ५.६ टक्के इतकी खाली आली. त्यानंतर रिझर्व बँकेने व्याज दर आणखी कमी करण्याची अपेक्षा ठेवण्यात आली. रिझर्व बँकेने रेपो दर डिसेंबर २०१४ पासून टप्प्याटप्प्याने १.२५ टक्के कमी केला. बँकांचे व्याज दर मात्र केवळ ०.४ टक्के कमी झाले त्यात खासगी व सरकारी बँकांचा समावेश आहे. लिव्हरेज प्रमाण योग्य ठेवण्यासाठी बँकांना मुदत ठेवींचे व्याज दर मर्यादित ठेवावे लागले. त्यामुळे पतधोरणाचा फायदा बँकांनी ग्राहकांना फार दिला नाही. त्यामुळे गुंतवणूकही वाढली नाही. रेपो दर कमी केल्याने गुंतवणूक चक्र टिकले नाही. बँकांनी त्यांची भांडवली तरलता वाढवली पाहिजे. व्याज दराचे विवरण पाहिले तर त्याचा गुंतवणुकीशी संबंध उमगतो. आता रिझर्व बँक रेपो दर आणखी कमी करायला तयार नाही. त्यामुळे खासगी गुंतवणूक व आर्थिक विकास दोन्ही रखडले आहेत.

जास्त अनुत्पादित मालमत्तेच्या जोखमी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने त्यांच्या आताच्या अहवालात सांगितल्या आहेत. अनुत्पादित मालमत्तांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला धोका आहे. भारताला बाहेरील परिस्थितीमुळे जोखीम टाळता आली व चलनवाढ वेगाने कमी झाली त्यामुळे जास्त चलनवाढ व मोठी आर्थिक तूट हे स्थूल आर्थिक आव्हाने म्हणून कायम राहिले. पतधोरणातील भूमिका ताठर आहे कारण चलनवाढ कमी करणे हे उद्दिष्ट आहे. आर्थिक मजबुती कायम राहिली पाहिजे व करसुधारणा झाल्या पाहिजेत. अनुदाने कमी झाली पाहिजेत. कंपन्यांची आर्थिक जोखीम कमी होणे अपेक्षित आहे. सार्वजनिक बँकांच्या मालमत्ता अनुत्पादित असतील तर आर्थिक स्थिरता धोक्यात येते. त्यामुळे त्याकडे लक्ष द्यावे लागेल. (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी २०१६ अहवाल)

**अर्थसंकल्पातील उपाययोजना**

- बँकांना भांडवल हवे आहे त्यामुळे अर्थसंकल्पात २५ हजार कोटींची फेरभांडवलीकरणाची तरतूद करण्यात आली. केंद्र सरकार गरज भासल्यास आणखी पैसे देण्यास तयार आहे. हा थेट उपाय झाला पण इतरही अप्रत्यक्ष उपाय यात आहेत ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

- आर्थिक आस्थापनांसाठी सर्वंकष ठराव संहिता
- एसएआरएफएइएसआय कायदा २००२ मध्ये सुधारणा करून एआरसीच्या प्रायोजकांना त्यात १०० टक्के भांडवल ठेवण्यास उत्तेजन व असंस्थात्मक गुंतवणूकदारांना रोख्यांमध्ये गुंतवणुकीस परवानगी.
- कर्ज वसुली लवाद कायद्यात सुधारणा त्यांच्यात ऑनलाईन कार्यपद्धती
- बेकायदा ठेव योजनांना आळा घालण्यासाठी केंद्रीय कायदा
- रोखे अपील लवाद खंडपीठे व सदस्यात वाढ
- प्रधानमंत्री मुद्रा योजनेत मंजूर रक्कम १८०००० कोटी.

वरील उपाय पतपुरवठा सुरळित

करतील व स्थावर मालमत्ता क्षेत्रातील कर्जाचे अडथळे दूर होण्यास मदत होईल पण हे सार्वजनिक बँकांची स्थिती सुधारण्यास पुरेसे आहे का हा प्रश्न आहे. आमच्या मते बँकिंग क्षेत्राची स्थिती सुधारण्यासाठी आणखी बऱ्याच गोष्टी कराव्या लागतील. एकूणच बँकातील प्रशासकीय सुधारणेवर लक्ष द्यावे लागेल. पी.जे. नायक समितीच्या शिफारशी आधीच आलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करावी लागेल. त्यातील काही शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

**नायक समितीच्या बँक प्रशासनाबाबत शिफारशी**

- बँकिंग राष्ट्रीयकरण कायदा १९७० व १९८० तसेत एसबीआय कायदा व एसबीआय (उपबँक कायदा) रद्द करणे.
- बँकांना कंपनी कायद्यात आणणे व बँक गुंतवणूक कंपनी स्थापन करणे त्यातून सरकार भाग हस्तांतरण
- तीन टप्प्यात पूर्णवेळ संचालक नेमण्यासाठी बँकिंग बोर्डस ब्युरोची मदत घेणे
- सरकारचा वाटा ५० टक्के कमी करणे
- व्यवस्थापनात तरूणांना संधी देणारे मनुष्यबळ धोरण आखणे.
- धोरणावर भर देण्यासाठी संचालक मंडळाच्या पातळीवर विचार.
- विकास उद्दिष्टांवर सरकारने सार्वजनिक बँकांना सल्ले न देणे.
- सरकारी बँकांवरील अकारण निर्बंध हटवणे.

याशिवाय आणखी एक मुद्दा महत्वाचा आहे त्यानुसार सरकारने कंपन्यांच्या मालमत्तेची फेररचना व नियंत्रण यात लक्ष घालणे गरजेचे आहे. नॅशनल मॅनेजमेंट कंपनी स्थापन करून अनुत्पादित मालमत्ता योग्यवेळी योग्यदरात निकाली काढणे आवश्यक आहे. सरकार व रिझर्व बँक यांनी ज्ञान संगम या बँक, अर्थखाते व रिझर्व बँक यांच्या अधिकाऱ्यांच्या वार्षिक बैठकीत बँकांच्या प्रश्नांवर चर्चा करणे गरजेचे आहे. ज्ञान संगमची बैठक अर्थसंकल्पानंतर झाली. त्यात यावर चर्चा करून काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या बँकांच्या सुधारणेसाठी आवश्यक आहेत, कर्ज वसुली कायदे सुधारणे गरजेचे आहे.

अर्थसंकल्पात काही थेट उपाय करण्यात आले असून त्यात सरकारने स्पष्टता दाखवली आहे. त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक असून त्यामुळे अनुत्पादक मालमत्तेची समस्या सुटू शकेल. गुंतवणूक चक्र पुन्हा रूळावर आणण्यासाठी बँकांचा ताळेबंद सुधारण्याची गरज आहे.

■■■

*लेखक नवी दिल्ली येथील नॅशनल इनस्टिटूट ऑफ पब्लिक फायनान्स अंड पॉलीसिमध्ये कार्यरत आहेत.*
email: nrbmurthy@gmail.com; manishprasad2@yahoo.com




विकास समर्पित
मासिक
योजना
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

प्रकाशन विभागाची
नवी पुस्तके

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

अन्य काही पुस्तके

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-
२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# जेंडर बजेट तरतुदी

डॉ. शाहीन राझी



***केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये नियोजन, अंदाजपत्रक आणि हिशेब तपासणी (ऑडिटींग) याद्वारे सर्वांना (स्त्री-पुरुष) समप्रमाणात न्याय मिळेल यावरही भर दिला आहे. लैंगिक विषमता ही भारताच्या विकासातील महत्वाचा अडथळा आहे. जागतिक लैंगिक अंतर निर्देशांक (ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स) २०१४ नूसार १४२ देशांच्या यादीत भारताचे स्थान ११४ होते.***

महिलेला कमकुवत समजणे म्हणजे बेअब्रू करणे होय, हा पुरुषाचा महिलेशी अन्याय होय. जर शक्ती-सामर्थ्य म्हणजे दुष्टपणा असेल तर, नक्कीच महिला ही पुरुषापेक्षा कमी दुष्ट आहे. जर शक्ती-सामर्थ्य म्हणजे मानसिक बळ असेल, तर महिला ही पुरुषापेक्षा वरचढ आहे. ती महान अशी अंतर्ज्ञानी नाही का, ती त्यागी नाही का, ती सहनशिलतेची परिसिमा नाही का, तिचे धैर्य महान नाही का? तिच्याशिवाय पुरुषाचे अस्तित्व काहीच नाही. जर अहिंसा आपला कायदा असेल तर, भविष्यकाळ महिला आहे. -महात्मा गांधी

केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ चे सादरीकरण म्हणजे, पंतप्रधानांचे व्यापक समावेशनाचे कार्यक्रम आणि शेतकरी, गरीब, महिला आणि मध्यमवर्गाला आवाहन होय, यात लघु व मध्यम उद्योजकांचाही समावेश आहे. नऊ खांब या संकल्पनेवर आधारीत अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट आर्थिक विकासाला चालना देण्यासह भारतीय अर्थव्यवस्थेचा समावेशक विकास होय.

अर्थमंत्र्यांनी अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राला समान महत्त्व दिले आहे. पायाभूत गुंतवणकीसह सामाजिक आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये गुंतवणूक, आरोग्यविमा, शेतकरी उत्पन्न योजना, शिक्षण आणि कौशल्य विकास. तसेच अर्थमंत्र्यांनी अतिशय गरज असलेल्या आर्थिक आणि नियामक उपायांकडे लक्ष दिले आहे, जसे आर्थिक सुधारणा, उद्योग सुलभीकरणासाठी निर्णयप्रक्रियेत बदल, आर्थिक शिस्त आणि करसुधारणा.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये नियोजन, अंदाजपत्रक आणि हिशेब तपासणी (ऑडिटींग) याद्वारे सर्वांना (स्त्री-पुरुष) समप्रमाणात न्याय मिळेल यावरही भर दिला आहे.

लैंगिक विषमता ही भारताच्या विकासातील महत्वाचा अडथळा आहे. जागतिक लैंगिक अंतर निर्देशांक (ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स) २०१४ नूसार १४२ देशांच्या यादीत भारताचे स्थान ११४ होते. आर्थिक सहभाग आणि संधी, शिक्षण, राजकीय सबलीकरण, आरोग्य, खासगी तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांवरील हिंसेचे प्रमाण या निकषांवर आधारित हा निर्देशांक काढला जातो.

या आव्हानांना उत्तर म्हणून, भारताने २००५ पासून लिंग प्रतिसाद अर्थसंकल्प (जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेटींग) ही पद्धत सुरू केली. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे ही नियोजन, कार्यक्रम आणि अर्थसंकल्पाची अशी पद्धती आहे की, यामुळे महिलांचे

हक्क आणि लिंग समानता (जेंडर इक्वॅलिटी) राखली जाते. तसेच याद्वारे सरकार आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी किती वचनबद्ध आहे हे यातून दिसून येते. आतापर्यंत केंद्र शासनाच्या ५७ मंत्रालय व विभागांनी जेंडर बजेटींग कक्ष उभारले आहेत. करोडो महिलांच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणणारी ही बाब होय.

महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व लाभ मिळतात का हे पाहण्यासाठी जेंडर बजेटींग हे सामर्थ्यवान साधन आहे. जेंडर बजेटच्या सादरीकरणामागे तर्क असा आहे की, राष्ट्रीय खर्चाचे अंदाजपत्रक याचा परिणाम साधनांच्या वाटपाच्या माध्यमातून महिला आणि पुरुषांवर कसा होतो हे पाहता येते. भारताच्या लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ४८ टक्के आहे. पण अनेक सामाजिक क्षेत्र जसे आरोग्य, शिक्षण, आर्थिक संधी यात महिला पिछाडीवर असल्याचे दिसून येते. म्हणून महिलांना साधनांपर्यंत पोहचण्याची शाश्वती जेंडर बजेटच्या माध्यमातून दिली जाते. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून साधनांचे योग्य वाटप करुन ही लिंग विषमता दूर करता येते. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जेंडर बजेटचा वापर केला जातो.

भारत परिवर्तन (ट्रान्सफॉर्म इंडिया) हा केंद्रीय मंत्र्यांचा अजेंडा राबवण्यासाठी लिंग विषमता दूर करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महिला मंत्रालयाची निर्मिती आणि जेंडर बजेट स्टेटमेंट याच्या माध्यमातून लिंग प्रतिसादाचे (जेंडर सिस्पॉनसिव्ह) मूल्यमापन केले जाऊ शकते.

महिला सबलीकरणाची राष्ट्रीय मोहीम (नॅशनल मिशन फॉर एम्पावरमेन्ट ऑफ वुमेन) यासाठी सरकारने दुप्पट म्हणजे ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महिला आणि बालकल्याण मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोग यांच्यासाठीही तरतूद वाढवण्यात आली आहे.

महिलांवरील हिंसा याचेही प्रतिबिंब अर्थसंकल्पात उमटणे आवश्यक आहे. तस्करीला आळा आणि किशोरवयीन युवतींचे सबलीकरण यासाठी असलेल्या योजनांमध्ये वाढ करण्यात आली आहे.

श्रम बाजारपेठेत महिलांचे घटते प्रमाण ही चिंतेची बाब होय. सामाजिक क्षेत्रातील खर्चाची अप्रमाणबद्धता ही महिलांसाठी काळजीची बाब आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा आणि इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना या योजनांना अर्थसंकल्पात महत्त्व देण्यात आले आहे.

***महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा हा महिलांना रोजगार पुरवणारा मोठा नियोक्ता ठरला आहे. ५५ टक्के कामगार या महिला आहेत. यासाठी ३८, ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.ग्रामीण भागात रोजगार पुरवणारी ही योजना गेल्या तिमाहीत काही राज्यांनी गुंडाळण्याचा निर्णय घेतला होता. आता या योजनेसाठी सरकारने २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ११ टक्के वाढीव तरतूद केली आहे.***

इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये ४,००० रुपयांवरुन वाढ करुन ती ६,००० रुपये करण्यात आली. ही वाढ राष्ट्रीय खाद्य सुरक्षा कायद्याशी सुसंगत अशी आहे. सध्या यासाठी ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच ही योजना सध्या पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून २०० जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येणार आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा हा महिलांना रोजगार पुरवणारा मोठा नियोक्ता ठरला आहे. ५५ टक्के कामगार या महिला आहेत. यासाठी ३८, ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात रोजगार पुरवणारी ही योजना गेल्या तिमाहीत काही राज्यांनी गुंडाळण्याचा निर्णय घेतला होता. आता या योजनेसाठी सरकारने २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ११ टक्के वाढीव तरतूद केली आहे.

२०१६-१७ मध्ये मनरेगासाठी ३८,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही आतापर्यंत मनरेगावर खर्च केली जाणारी सर्वात मोठी रक्कम असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे.

सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हक्क कायद्यासाठी ३,९०० कोटी रुपयांनी वाढ केली आहे, जी २०१५-१६ मध्ये ३४,६००० कोटी रुपये होती. सध्याच्या सरकारने पहिल्याच वर्षी २०१४-१५ मध्ये मनरेगासाठी ३४,००० कोटी रुपयांची तरतूद केली होती.

महिलांसाठी एलपीजी जोडणी पुरवण्याच्या घोषणेवरुनही या अर्थसंकल्पाचा कल लक्षात येतो. गरीब कुटुंबातील महिलेला एलपीजी जोडणी दिली जाणार आहे.

२०१६-१७ मध्ये एलपीजी जोडणीसाठी २, ००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून सरकार दोन कळीच्या मुद्यांना हात घालत आहे. एक म्हणजे, महिलांचे आरोग्य, विशेषत:

ग्रामीण महिलांचे आरोग्य ज्या पारंपरिक पद्धतीने लाकूड, शेण व इतर कृषी साधनांच्या सहाय्याने स्वयंपाक करतात, त्यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होते. या उपायामुळे महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. महिलांचे श्रम आणि वेळ दोन्ही वाचेल. तसेच ग्रामीण भागातील युवकांना स्वयंपाकाचा गॅस पुरवठा करण्याच्या निमित्ताने रोजगारही मिळेल.

विविध संस्था आणि सरकारने केलेल्या अभ्यासाअंती असे दिसून आले आहे की, घरगुती प्रदुषणामुळे भारतात दरवर्षी पाच लाख महिला मृत्यूमुखी पडतात.

टेरी (दी एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिटूयट) चे प्राध्यापक डॉ. अरिंदम दत्ता यांच्यानूसार, केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये गरीब कुटुंबांना एलपीजी जोडणी देण्याच्या मुद्यावर जोर देऊन घरगुती प्रदुषणाच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

या मोहिमेचा दीड कोटी कुटुंबांना लाभ होईल, असा सरकारचा अंदाज आहे. ही योजना आणखी दोन वर्षे चालू राहणार आहे. ज्यामुळे दारिद्र्यरेषेखालील पाच लाख कुटुंबांना एलपीजी जोडणी मिळेल.

यामुळे स्वयंपाकाचा गॅस हा सर्वांना उपलब्ध होईल. आतापर्यंत अशी धारणा होती की, स्वयंपाकाचा गॅस हा उच्च मध्यमवर्गासाठीच आहे. याचा लाभ मध्यमवर्गाला मिळत आहे, पण गरीब यापासून अद्याप वंचित असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. तथापी, आता दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाना शासकीय सवलतीने स्वयंपाकाचा गॅस पुरवला जाणार आहे.

२०१६-१७ मध्ये दारिद्र्यरेषे खालील दीड कोटी कुटुंबातील महिलांना एलपीजी जोडणी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद असलेल्या 'उज्ज्वला' योजनेच्या माध्यमातून पुरवली जाणार आहे. यामुळे महिलांचे विशेषत: ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य सुधारेल, पर्यावरणसंरक्षण होण्यास मदत होईल.

गरीबांना एलपीजी पुरवठा करण्यासाठी प्रथमच अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक जोडणीसाठी सरकार १,६०० रुपये खर्च करणार आहे. ही जोडणी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील महिलेच्या नावावर असेल.

आतापर्यंत हे काम कॉर्पोरेट-सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून केले जात होते. २०१८-१९ पर्यंत पाच कोटी बीपीएल कुटुंबांना या योजनेचा लाभ होईल. पूर्व भारतात, जी गरीब राज्ये आहेत त्याठिकाणी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येईल. पहल- ग्राहकांच्या खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण या योजनेची नोंद गिनीज बुकात झाली आहे. सध्याच्या लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकांसाठी सरकार एलपीजी जोडणी देण्याचा प्रयत्न करणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनूसार, देशात पाच लाख महिलांचा मृत्यू स्वयंपाकासाठीच्या सदोष इंधनामुळे होतो.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे उद्यमशीलतेच्या माध्यमातून सबलीकरण करण्यात येणार आहे. यासाठी २०१६-१७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात स्टँड अप इंडिया योजनेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय केंद्र (नॅशनल हब) निर्माण करण्याचा प्रस्तावर आहे.

''अनुसूचित जाती आणि जमातीच्या उद्योजकांनी उद्योग सुरू करण्यासाठी आणि यशस्वीरित्या चालवण्यासाठी कमालीचे धैर्य दाखवले आहे.'' असे अर्थमंत्री म्हणाले.

याचा अडीच लाख उद्योजकांना लाभ होईल. यात महिला उद्योजकांनाही लाभ होणार आहे. यासाठी बँकांच्या प्रत्येक शाखांना किमान दोन प्रकल्प हाती घेण्यास सांगितले आहे. उद्योगजगताच्या सहकार्याने प्रस्तावित केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सरकारच्या २०१२ च्या धोरणानूसार अनुसूचित जाती, जमाती उद्योजकांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करत आहोत. यामुळे अनुसूचित जाती, जमाती आणि महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचे हे वर्ष आहे.

अर्थसंकल्पाचा सार म्हणजे, वेळेत सुरू केलेला अभ्यासक्रम होय. प्रमुख संस्थांना बळकटी देणे, लिंग विषमतेसारख्या चिंताजनक योजनांसाठी पुरेशी तरतूद आणि प्रभावी अंमलबजावणी असा सांगता येईल.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ चे प्रमुख ध्येय जागतिक आर्थिक मंदीच्या काळात तेजस्वी स्थान टिकवून ठेवणे आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण आणि लिंग समानता याव्यतिरिक्त दुसरे महत्त्वाचे साधन असू शकत नाही.

■■■

*लेखिका अर्थतज्ज्ञ आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्या आहेत.*
*email: shahin.razi@gmail.com*

# अर्थसंकल्प आणि करप्रणालीची गणिते

जयंत रॉय चौधरी



***अर्थसंकल्प लहान करदात्यांना अल्पसा दिलासा देते. ज्यामध्ये भाडेतत्वावर राहणाऱ्या करदात्यांचा अंतर्भाव असेल. वार्षिक उत्पन्न रु. ५ लाखाहून कमी आहे आणि दरमाह घरभाडे रु. २००० ते ५००० असून भाडे भत्ता मिळत नाही, अशा करदात्यांना यामध्ये करसवलत देण्यात येईल. पहिलं नवीन घर विकत घेणाऱ्यांसाठी, यावर्षीच्या २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात, गृहकर्जावर पहिल्यांदाच रु. ५०००० इतकी अतिरिक्त व्याज कपात सुरु करण्यात आली आहे.***

केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ चे वर्णन आपल्याला 'गमावलेली संधी वा निष्फळ संधी' असे करता येईल. ही संधी होती कर आकारणीचे धाडसी निर्णय घेण्याची, अनुदानाच्या ओझ्याने कधी नव्हे इतक्या अल्पदरात उपलब्ध असलेल्या खनिज तेलांच्या किमतींचा फायदा घेण्याची, अर्थव्यवस्थेला उत्तेजन देण्याच्या गरजेची पूर्तता करण्याची, ज्यामुळे जागतिक मंदीला तोंड देता येईल अशी विकासाच्या आधारावर उभारलेली अर्थव्यवस्था घडवण्याची.

कॉर्पोरेट आणि व्यक्तिगत करांवरील ओझे घटवणे - कराच्या प्रलोभाने आयकर स्लॅबमध्ये वाढ करणे - चलनफुगवट्याचा वेग वाढवणे - या गोष्टींना भारत गेल्या काही वर्षांत सामोरे जात आहे. या गोष्टींनी फक्त जनतेच्या आणि तज्ज्ञांच्या टाळ्या मिळवता येतात इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष करमहसूलाच्या बढतीमुळे कर दर माफक असल्याने 'लाफर' आलेखाचा परिणामही साध्य होतो.

तरीही, उपरोक्त २०१६-१७ अर्थसंकल्प हा एक उत्कृष्ट अभ्यास आहे. ज्यामध्ये येत्या काळात करप्रणालीचे सुसूत्रीकरण होणार असल्याचे संकेत आहेत. येणाऱ्या वर्षांत सवलती रद्द होत करओझे घटण्याची शक्यता दर्शवणारी वचने आहेत.

**व्यक्तिगत करदात्यांना दिलासा**

अर्थसंकल्प लहान करदात्यांना अल्पसा दिलासा देते. ज्यामध्ये भाडेतत्वावर राहणा-या करदात्यांचा अंतर्भाव असेल. वार्षिक उत्पन्न रु. ५ लाखाहून कमी आहे आणि दरमाह घरभाडे रु. २००० ते ५००० असून भाडे भत्ता मिळत नाही, अशा करदात्यांना यामध्ये करसवलत देण्यात येईल.

पहिलं नवीन घर विकत घेणाऱ्यांसाठी, यावर्षीच्या २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात, गृहकर्जावर पहिल्यांदाच रु. ५०,००० इतकी अतिरिक्त व्याज कपात सुरु करण्यात आली आहे. नवीन घर खरेदी करणाऱ्यांसाठी आणि रिअल इस्टेट (स्थावर मालमत्ता) एजंट्स साठी ही आनंदाची बाब होय. फक्त यासाठी आवश्यक अटी इतक्याच की त्या मालमत्तेची (घराची) किंमत रु. ५० लाख इतकी कमाल असणे गरजेचे आहे. शिवाय कर्जाची मर्यादा रु. ३५ लाखांहून अधिक असता कामा नये.

बांधकाम पूर्तीसाठी लागणारा वेळ आणि मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी लागणारा वेळ ३ पासून ५ वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे.

**अतिश्रीमंतावरील कर**

या वर्षीच्या अर्थसंकल्पाने रु. १ कोटी व जास्त उत्पन्न असणाऱ्या करदात्यांच्या उत्पन्नावरील अधिभार १२% पासून १५% पर्यंत वाढवला आहे. या कराला 'सुपररिच टॅक्स' असेच जगभरात संबोधले जाते. ज्यामध्ये जास्त उत्पन्न असणाऱ्या लोकांना लक्ष्य केले जाते. कारण एक बाब सरकारच्या लक्षात येऊ लागली आहे की, हे करदाते करसवलतींचा अतिशयोक्तीने अयोग्य वापर करतात ज्यामुळे कराचे ओझे करदात्या मध्यमवर्गावर पडते. जागतिक मंदी चालू असल्याने अशावेळी सरकारला कर वसुलीसाठी नवी दारे उघडण्याची धडपड करण्याची गरज भासू लागते.

दुसरीकडे सरकारने नवे पाऊल उचलले असून ज्यास श्रीमंतविरोधी म्हणावे की गरिबी पूरक म्हणावे हाच प्रश्न आहे. यानुसार १० लाखांहून अधिक लाभांश (डिविडंड) मिळवणाऱ्या अविभक्त हिंदू कुटुंबांना (हिंदू अनडिवायडेड फॅमिलीज) लाभांशाच्या १०% कर भरावा लागणार आहे.

सामान्यत भारतीय जनसामान्यांत कार घेण्याची अभिलाषा दिसून येते, त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी यावर्षी करप्रणालीत काही इष्ट बदल करण्यात आलेले आहेत. रु. १० ते १५ लाखांहून अधिक किमतीच्या गाड्यांवर व रु. २ लाखांहून अधिक किमतीच्या रोखीने मिळणा-या चैनीच्या वस्तूंवर व सेवांवर मूलस्त्रोती १% कर लावण्यात आला आहे. बरेच करतज्ञ येथे निर्देश करतात की, बाजारभावांचे अवलोकन केल्यास हे लक्षात येणारी बाब हीच की, केवळ ब्रँडेड गाड्याच १० ते १५ लाखांमध्ये उपलब्ध नसून या तऱ्हेच्या सर्वच विलासी वस्तूच्या किंमती आभाळास टेकल्या आहेत. मात्र एकीकडे देशात बहुतांश समाजास दोन वेळच्या अन्नाची वानवा आहे. तर दुसरीकडे लोक १०-१५ लाखांच्या गाड्या आणि लाख दोन लाखाच्या वस्तूंचा विलासोपभोग घेत आहेत, याकडे लक्ष द्यावयास हवे.

**काळ्या पैशावरील कर**

अर्थव्यवस्थेतील काळा पैसा कमी करण्यासाठी, रोखण्यासाठी दिलेली राजकीय आश्वासने पाळण्याकरिता, यावर्षी सरकारने 'उत्पन्न जाहीरनामा योजना २०१६' घोषित केली आहे. ज्यामध्ये करदात्यांना एक संधी दिली जाणार असून त्या अंतर्गत त्यांना आपले अघोषित उत्पन्न जाहिर करता येणार आहे. यावर ३०% करही भरावा लागणार आहे. शिवाय ७.५ % अधिभार आणि ७.५% दंड म्हणजे एकूण या अघोषित उत्पन्नाच्या ४५% रक्कम सरकारजमा करावी लागणार आहे.

**कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी वरील कर**

१ एप्रिल २०१६ नंतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधीतील रक्कम काढून घेणारी प्रत्येक गुंतवणूकदार व्यक्ती करपात्र असेल. या अर्थसंकल्पात अशी घोषणा करण्यात आली की, ईपीएफओ म्हणजे कर्मचारी भविष्यनिर्वाणह निधी मधील गुंतवणूक ही यापुढे ६०% करपात्र असेल, ज्यावेळेस निधी परत घेण्याकरिता गुंतवणूकदार पाऊले उचलतील. मात्र एक अट अशी असेल की, हीच रक्कम जर राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत पुन्हा गुंतवली गेली असेल तर ती करमुक्त गणली जाईल. १ एप्रिल २०१६ च्या अगोदर यानिधी मध्ये केलेले कोणत्याही प्रकारचे योगदान हे या घोषणेस गैरलागू असेल.

पश्चात अर्थमंत्रालयाकडून असे स्पष्ट करण्यात आले की, या निधीत गुंतवलेली मूळ भांडवली रक्कम करमुक्त गणली जाईल, मात्र त्यावरचे व्याज करपात्र असेल. हा लेख लिहीपर्यंत अर्थमंत्रालयामध्ये याबाबत पुनर्विचाराचे वारे सुरू होते.

'कर' आकारणीला महत्व प्राप्त व्हावे यासाठी अशा योजना जन्माला येत आहेत. निरनिराळ्या वेतन निधींना योगदान मिळावे आणि जनमानसात गुंतवणुकीची संकल्पना अधिक खोलवर रुजावी यासाठी अशा गोष्टी शासन राबवत आहे.

तरीही, सरकारने हे स्पष्ट केले आहे की, ईपीएफ अंतर्गत जास्तीत जास्त गुंतवणूकदार असलेले लोक, त्यांचे दरमाह उत्पन्न रु. १५००० व कमी आहे, अशा करदात्यांना त्यांचा भविष्यनिर्वाह निधी काढून घेताना कर लागू होणार नाही. एकूण ईपीएफओ धारकांचे प्रमाण ३.७ कोटी आहे आणि त्यांपैकी जवळपास ३ कोटी लोक याच वर्गात येतात. यासाठी नोकरदार वर्गाला कोणताही नवा भत्ता देण्यात येणार नाही.

**कॉर्पोरेट टॅक्सचे गणित**

उद्योगजगतासाठी कराचे दर सुलभ करावे याकरिता जागतिक प्रमाणकांबरोबर २०१६-१७ अर्थसंकल्पामध्ये बदलांना सुरुवात झाली आहे. ज्यामध्ये छोट्या कंपन्यांसाठी हेडलाईन टॅक्स घटवला गेला आहे.

सन २०१४-१५ मध्ये ज्या कंपन्यांची आर्थिक उलाढाल रु. ५ कोटी व कमी होती अशांसाठी २९% हेडलाईन टॅक्स सुचवला होता. तर नवोदित कंपन्यांसाठी (स्टार्टअप्स) २५% इतकी करनिश्चिती करण्यात आली आहे.

शिवाय तीन वर्षांसाठी स्टार्टअप्सना, अर्थात २०१६ ते २०१९ पर्यंत करमुभा देण्यात आली आहे. ज्यामुळे या काळात त्यांना कोणताही कर लागू नसेल.

हा प्रस्ताव मुख्यत व्यक्तिगत करदाते व अविभक्त हिंदू कुटुंबे यांनी स्टार्टअप

नवोदित कंपन्या सुरु करण्यासाठी प्रोत्साहित व्हावे यासाठी केला गेला आहे. हा प्रस्ताव पुढे असेही सुचवतो की, राहत्या घराच्या मालमत्तेच्या हस्तांतरणामध्ये झालेला दीर्घकालीन भांडवली लाभ (कॅपिटल गेन) नवोदित कंपन्यांमध्ये गुंतवलेला असल्यास करमुक्त मानावा. त्यामध्ये मात्र करदाते किंवा अविभक्त हिंदू कुटुंबे यांनी ५० टक्के भागभांडवल उचलले पाहिजे. शिवाय यांमध्ये गुंतवलेले पैसे नवोदित कंपनी नवी मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरु शकते.

**सवलतींचे निराकरण**

करसवलतींचे हद्दपार होणे आणि करांचे सुसूत्रीकरण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होतील हे सरकारने अगोदरच बजावले होते. या आधी आयकर हे नवशिक्यांसाठी एक दु:स्वप्नच आणि हिशेब तपासनीसांसाठी आनंदाची पर्वणीच. त्यामुळे आपल्या अशीलासाठी ते करचुकवेगिरीच्या नवनव्या कल्पना शोधून काढण्याची संधी चुकवत नसत. या गोष्टीला आळा घालण्यासाठी या अर्थसंकल्पात एक उत्तम आराखडा जाहीर झाला आहे.

अलिकडेच भारत सरकारने क्षेत्र आणि गुंतवणूक या वर आधारित 'टॅक्स हॉलिडे' जाहीर केला आहे. ज्यामध्ये, विविध क्षेत्रे अंतर्भूत आहेत. जसे की विद्युत निर्मिती, वितरण आणि पारेषण तथा विशेष आर्थिक क्षेत्र, संपर्क दळणवळण या गोष्टींमध्ये विकासोन्मुख प्रदेशात अर्थात ईशान्य भारत, जम्मू आणि काश्मिर, हिमाचल प्रदेश या राज्यांत विकासप्रकल्प उभारावेत यासाठी गुंतवणूक केली असता करमाफ असेल.

यामागील दोन प्रमुख हेतू म्हणजे या क्षेत्रातील निगडीत वादाविवादांचे निराकरण व्हावे आणि करप्रणालीमध्ये सुसूत्रता यावी. आजमितीला या सवलतींपोटी कराचा दर प्रत्यक्षात ३०% ते ३३% असला तरी केवळ २३% इतकाच प्रत्यक्षात कार्यरत आहे. त्यामुळे होणारे नुकसान जवळपास रु.६२००० कोटीपेक्षा अधिक आहे.

**मॅट**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अनुषंगाने मिनीअम अल्टरनेटीव्ह टॅक्स च्या बाबतीत सांगायचे झाले तर हा एक नेहमीच विवादाचा मुद्दा बनला होता. कारण भारतामध्ये काहीच अस्तित्व नसलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या (विदेशी गुंतवणूकदार संस्था वगळता), भांडवली नफा (कॅपिअल गेन) मिळवत होत्या. दुहेरी करप्रणालीचा गैरफायदा घेत होत्या, आता अशा प्रघातांना विराम देण्यात आला आहे.

२०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये असा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे की, बहुराष्ट्रीय कंपन्यांना मॅट साठी लागू असलेल्या अटी १ एप्रिल २०१६ पासून पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू असतील. त्या करिता आवश्यक दोन अटी अशा की, या कंपन्यांचे स्थान असलेल्या देशाबरोबर भारताचा द्विराष्ट्रीय करार झालेला असता कामा नये तसेच भारतीय कायद्यानुसार या खाजगी गुंतवणूकदार कंपन्या नसाव्यात.

**गुगल कर**

या अर्थसंकल्पातील आश्चर्यचकित करणारी बाब म्हणजे 'इक्विलायझेशन लेवी'-म्हणजेच समान आकारणी. ही आकारणी अमेरिकेने सर्वप्रथम लागू केलेले गुगल टॅक्सशी मिळतीजुळती आहे. ज्यामध्ये परदेशी कंपन्यांशी ऑनलाईन खरेदी विक्री करत असता भारतीयांना ६% भुगतान करावे लागेल . ज्यात ई-कॉमर्स सारख्या मंचावरुन सादर होणा-या जाहिरताही समाविष्ट असतील.

**दंड**

नव्या अर्थसंकल्पात एक एप्रिल २०१६ पासून उत्पन्नाचा अहवाल सादर करणे अनिवार्य असेल अन्यथा उत्पन्नाच्या ५०% रक्कम ही दंड म्हणून आकारली जाईल.चुकीचा अहवाल सादर केल्यास २००% दंड लावला जाईल. सध्यातरी दंडाधिकार पूर्णत आयकर अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येतात, त्यामुळे अहवाल सादर न करणे वा चुकीचा अहवाल सादर केल्याने कधी १००% ते ३००% इतका दंड होताना आढळतो.

**राज्यमहसूल**

राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेला प्रोत्साहन देण्यासाठी २०१६-१७ च्या अर्थासंकल्पामध्ये राज्य सरकारांना केंद्राकडून वाटप करण्यात येणाऱ्या निधीमध्ये घसघशीत अशी अर्थात १२ % इतकी वाढ करण्यात आली आहे. ही वाढ २०१५ च्या सुधारित अंदाजपत्रकान्वये केली गेली आहे.

असे असताना सुध्दा महसूलावर अधिभार लावण्याचा वाढता प्रघात एकूण महसूल घटवत आहे. पध्दती आणि राज्यांबरोबर ज्यांचे वाटप केलें जात नाही.

नव्याने दाखल झालेल्या कृषी कल्याण अधिभार एकटाच केंद्र सरकारला रु. ५००० कोटी मिळवून देणार आहे. शिवाय चारचाकी वाहनांवरचा पायाभूत सुविधा अधिभार हा रु. ३००० कोटी मिळवून देईल. २०१६-१७ मध्ये हे सर्व भार एकूण अंदाजपत्रकात दाखल होत, १.९ लाख कोटी इतकी भर घालतील. म्हणजेच केंद्रसरकारने संपादित केलेल्या एकूण करमूल्यांपैकी १२ % आणि केंद्राच्या स्वसंपादित रकमेचा एकपंचमांश हिस्सा ह्या उपरोक्त कराने जमवलेली रक्कम असेल.

■■■

*लेखक द टेलिग्राफ या दैनिकाचे वरिष्ठ पत्रकार आहेत.*

email: jrchowdhury@yahoo.com

# स्टार्टअप: मेक इन इंडियासाठी पूरक

नीरज बाजपेयी



***२०१५-१६ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री अरूण जेटली यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितीचा गोषवाराही मांडला आहे. त्यांच्या मते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार हे स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया, कौशल्य विकास , रोजगार निर्मिती कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीस सज्ज आहे. जागतिक पातळीवर आर्थिक पातळीवर मळभ असले तरी भारत सरकार या योजना वेळेत राबवणार आहे.***

रोम एक दिवसात बांधले गेले नाही हे एक प्रसिद्ध वाक्य सर्वांनाच माहिति आहे, त्याचा अर्थ आपण 'स्टार्ट अप'साठी लागणाने भक्कम पूरंक परिसंस्था उभी करण्याशी लावू शकतो. 'स्टार्टअप' उद्योग हे उभारले जातील पण त्याला थोडा वेळ तर द्यावा लागेल असे येथे सांगावेसे वाटते. औद्योगिक संस्था, व्यावसायिक संस्था यामुळे रोजगार वाढणार आहे, हे खरे पण ते अगदी लगेच घडून येणार नाही. त्याला थोडा वेळ द्यावा लागणार हे नक्की आहे.

अर्थमंत्री अरूण जेटली यांनी आताच्या अर्थसंकल्पात असे म्हटले आहे की, सरकारला वास्तव परिस्थितीची जाणीव आहे व भारताला जर आर्थिक वाढीत मोठी झेप घ्यायची असेल तर काय करायला पाहिजे त्यासाठीच्या मूलभूत गरजा माहिती आहेत.

हे काम जटील आहे यात शंका नाही. जेव्हा जागतिक अर्थव्यवस्था गंभीर संकटातून जात होती तेव्हा अनेक आर्थिक बाजारपेठांना परदेशात हादरे बसले जागतिक व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला. जगातील आर्थिक व्यवस्था डळमळीत होत असताना भारताला मात्र त्याचा फार परिणाम जाणवला नाही त्यामुळेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत भारताला जगातील आर्थिक परिस्थिती बघता एक चमकदार ठिपका म्हटले आहे. त्याचा अर्थ जगात अर्थव्यवस्थांना हादरे बसत असले तरी भारताची अर्थव्यवस्था मात्र विकासाकडे वाटचाल करणार आहे त्यामुळे भारताकडे आशेने पाहायला हरकत नाही.

२०१५-१६ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री अरूण जेटली यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितीचा गोषवाराही मांडला आहे. त्यांच्या मते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार हे 'स्टार्टअप' इंडिया, मेक इन इंडिया, कौशल्य विकास, रोजगार निर्मिती कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीस सज्ज आहे. जागतिक पातळीवर आर्थिक पातळीवर मळभ असले तरी भारत सरकार या योजना वेळेत राबवणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी 'स्टार्टअप' 'स्टँड अप' इंडियाची घोषणाच केली आहे. त्यामुळे स्टार्टअप साठी अनुकूल पूरक

यंत्रणा म्हणजे इको सिस्टीम उभारली जाईल, असे आश्वासन अर्थसंकल्पात दिले आहे. त्यासाठी या उद्योगांना अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष करसवलती घोषित केल्या आहेत. दलित व आदिवासी युवकांना आता उद्योजक बनण्याची संधी आहे. नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे त्या दिशेने अर्थसंकल्पात पावले टाकण्यात आली आहेत. आदिवासी व दलित युवकांनी आता पुढे आले पाहिजे त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी उद्योजकता केंद्रेच उभी केली जाणार आहेत असे पंतप्रधान मोदी यांनी आगामी धोरणावर प्रकाश टाकताना म्हटले आहे. सरकार 'मेक इन इंडिया' कार्यक्रमावर भर देत आहे. आता त्यात रोजगार निर्मिती हा महत्वाचा उद्देश आहे त्यासाठी देशांतर्गत उत्पादकांना अनेक प्रोत्साहक करसवलती देण्यात आल्या आहेत. इतरही अनेक कर फायदे दिले आहेत. उद्योग सुरू करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार केले जात आहे त्यात दिवसेंदिवस चांगले परिणाम दिसत आहेत. लघु उद्योगांना खूपच फायदे देण्यात आले असून त्यामुळे आता कोर्टकचेऱ्या कमी करून त्यांचे कामकाज मार्गी लागेल. जर अपयश आले तर उद्योग बंद करण्याची प्रक्रियाही सोपी करण्यात आली आहेत. सुधारित अबकारी व सीमा शुल्क दर हे 'मेक इन इंडिया' योजनेत एकूण परिस्थिती लक्षात घेऊन सुधारले आहेत. आयटी हार्डवेअर, भांडवली वस्तू, कापड उद्योग, संरक्षण उत्पादने, इतर वस्तू यांचा समावेश मेक इन इंडियात राहणार आहे. उदाहरणार्थ दूरसंचार क्षेत्रात सरकारने मोबाईल हँडसेटची आयात कमी होईल यासाठी प्रयत्न केले आहेत. आता जास्तीत जास्त व कमी दरातील मोबाईल हँडसेट भारतातच तयार होणार आहेत. मोबाईलच्या सुट्या भागांवर सीमा शुल्क व अबकारी करात सूट दिली आहे, त्यामुळे मोबाईल हँडसेट उद्योगास चालना मिळेल. स्थानिक पातळीवर मोबाईल निर्मितीने अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. शिवाय कमी किंमतीत स्मार्टफोन उपलब्ध होतील.

केंद्र व राज्य सरकारे आता गुंतवणुकीस अनुकूल वातावरण तयार करीत आहेत त्यामुळे देशांतर्गत उद्योगांना चालना मिळणार आहे. स्टार्ट अप व मेक इन इंडिया योजनेमुळे रोजगारात वाढ नक्की होणार आहे फक्त त्यासाठी थोडा वेळ द्यावा लागेल. अर्थसंकल्पात देशांतर्गत उद्योगांना सवलती दिल्या आहेत त्याचा परिणाम आर्थिक व सामाजिक प्रगतीत दिसून येईल.

देशात व देशाबाहेर गुंतवणूकदारांचे मेळावे घेण्यात आले. असाच एक मेळावा हरयाणातही झाला. अर्थमंत्री जेटली यांनी या मेळाव्यात राज्यांना आर्थिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सुधारणा राबवण्याचा उद्योगांना अनुकूल स्थिती निर्माण करण्याचा सल्ला दिला आहे. धोरण लकव्यामुळे काय होते ते आपण पूर्वीच्या सरकारच्या काळात पाहिले आहे. त्यामुळे राज्यांनी आता धोरणे बदलली पाहिजेत, चांगले राजकीय व उद्योगानुकूल वातावरण असेल तरच संबंधित राज्यांमध्ये गुंतवणूक होऊ शकते. त्यामुळे आता पुढची जबाबदारी राज्यांनीही पार पाडणे गरजेचे आहे, असे जेटली यांनी सांगितले. सहकार संघराज्यवादाशिवाय स्पर्धात्मक संघराज्यवाद महत्वाचा आहे, पुढचा काळ स्पर्धात्मक संघराज्यवादाचा आहे, थोडक्यात गुंतवणूक व उद्योगांना आकर्षित करण्यासाठी राज्यांमध्ये स्पर्धा असणार आहे. यात केंद्र-राज्य संबंधांचा भाग येत नाही राज्य-राज्य पातळीवर स्पर्धा होईल. जी राज्ये सुधारणा करणार नाहीत त्याचा फटका तेथील लोकांना बसेल जी राज्ये अर्थ विकास, उद्योग व राजकीय क्षेत्रात अनुकूल वातावरण ठेवतील ती प्रगती करतील व त्याचे फायदे त्या राज्यातील लोकांना मिळतील, असे जेटली यांनी या मेळाव्यात सांगितले. आर्थिक, राजकीय सुधारणा करा, अन्यथा आर्थिक धोक्यांना सामोरे जा, असा धोक्याचा इशारा त्यांनी राज्यांना दिला आहे. लोकसभेत अर्थसंकल्प मांडताना जेटली यांनी स्टार्टअप उद्योगांवर भर दिला व नवकल्पनांतून रोजगार निर्मिती होईल असे सांगितले, त्यासाठी मेक इन इंडिया कार्यक्रमात उद्योजकांनी नव्या कल्पना घेऊन सामील व्हावे असा सल्ला त्यांनी दिला आहे. स्टार्टअप उद्योगांना एप्रिल २०१६ पासून पाच पैकी पहिली तीन वर्षे नफ्यावर शंभर टक्के करसूट देण्याचे जाहीर केले म्हणजे ही करसवलत नवोद्योगांना मार्च २०१९ पर्यंत मिळणार आहे. मॅट त्यांना लागू राहणार आहे पण भांडवली नफ्यावर कर द्यावा लागणार नाही. जर त्यांनी अधिसूचित नवोद्योगात भांडवली व निधी गुंतवणूक केली व त्यात उद्योजकांचा मोठा वाटा म्हणजे शेअर्स असतील तर त्यांना ही सवलत मिळणार

आहे. त्यांनी प्राप्तीच्या दहा टक्के कर आकारून नवी पेटंट व्यवस्था प्रस्तावित केली आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर पेटंटसाठी जो भरमसाठ खर्च करावा लागतो तो करावा लागणार नाही. ही पेटंट भारतात नोंदली जातील. सीमा शुल्क व अबकारी कराचा मोठा वाटा हा मेक इन इंडियात असणार आहे. त्यांच्या रचनेतील फरकाने उद्योजकांना फायदा होणार आहे. काही कच्च्या मालावरील अबकारी व सीमा शुल्कात बदल केले आहेत. काही सुट्या भागांना व वस्तूंना आता जटील प्रक्रियेतून जावे लागणार नाही. त्यामुळे त्यांची खरेदी सोपी होईल. स्पर्धात्मकता वाढेल. माहिती तंत्रज्ञान, हार्डवेअर, भांडवली वस्तू व संरक्षण उत्पादने, कापडउद्योग, खनिज इंधने, खनिज तेले, रसायने, पेट्रोरसायने, कागद, वृत्तपत्र कागद, निगा व दुरूस्ती, विमाने व जहाजांची दुरूस्ती यात स्पर्धात्मकता वाढणार आहे. यात कौशल्य असलेले कामगारही लागणार आहेत. त्यामुळे रोजगारनिर्मिती होऊन संधी वाढतील. कौशल्यांचेही शिक्षण देण्याची व्यवस्था केली जात आहे सरकारने १५०० बहुकौशल्य प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी १७०० कोटींची तरतूद केली आहे. उद्योजकता प्रत्यक्ष युवकांच्या जवळ आणली जाणार आहे. त्यासाठी प्रधानमंत्री कौशल विकास योजना राबवली जाणार आहे. कौशल्यपूर्ण भारत देशातील मोठ्या लोकसंख्येचा फायदा करून घेण्यास सज्ज आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम तयार करण्यात आला असून त्यात ७६ लाख युवकांना कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. सरकारने राष्ट्रीय कौशल्य प्रमाणन मंडळ स्थापन केले असून त्यात प्रधान मंत्री कौशल विकास योजनेमुळे भर पडली आहे. परिणामी तीन वर्षात एक कोटी युवकांना प्रशिक्षण दिले जाईल.

तज्ञांच्या मते एक कोटी युवकांना तीन वर्षात कौशल्य शिक्षण मिळाले तर त्यामुळे रोजगार संधीची एक नवी पहाट उगवेल व उत्पादकताही बऱ्याच प्रमाणात वाढेल. योजनेनुसार उद्योजकता, शिक्षण व प्रशिक्षण ही उद्दिष्टे २२०० महाविद्यालये, ३०० शाळा , ५०० सरकारी आयटीआय, पन्नास व्यवसाय शिक्षण संस्था यातून साधली जाणार आहेत. मोठ्या प्रमाणात ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. विशेष करून दूरस्थ भागातील उद्योजकांना त्यांच्या मार्गदर्शकांशी व पत बाजारपेठांशी जोडले जाणार आहे. रोजगार कार्यक्रम राबवताना सरकारने संघटित क्षेत्रात रोजगार निर्मितीवर भर देण्याचे ठरवले आहे. जे नवीन कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे सदस्य होतील त्यांच्यासाठी नियोक्त्यांना पहिली तीन वर्षे पीएफमध्ये पैसे भरावे लागणार नाहीत. तो ८.३३ टक्के वाटा सरकारच भरणार आहे अर्थात ही अट पंधरा हजार रूपये वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील व त्यासाठी अर्थसंकल्पात १ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. २०१६ च्या अर्थविधेयकात रोजगार निर्मितीवर भर देताना प्राप्तीकर कायदा कलम ८० जेएए मध्ये काही प्रोत्साहनपर सवलती दिल्या आहेत. सरकार रोजगार निर्मितीवर भर देणार असल्याचे सांगून अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे की, राष्ट्रीय करियर सेवा जुलै २०१५ मध्ये सुरू करण्यात आली आहे. आधीच ३५ दशलक्ष रोजगार इच्छुकांनी त्यात नावे नोंदली आहेत. नवीन अर्थसंकल्पानुसार २०१६-१७ मध्ये १०० आदर्श करियर केंद्रे सुरू केली जाणार आहेत.

राज्य रोजगार विनिमय केंद्रे एकमेकांशी जोडली जाणार असून त्यांचे मुख्य केंद्र नॅशनल करियर सर्व्हिस सेंटर हे राहणार आहे. सर्व केंद्रे त्याच्याशी जोडली जातील. याबाबत एक विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले जाणार अन त्यात कंपनी कायदा २०१३ मध्ये काही सुधारणा करण्यात येणार आहेत. उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यातील अडथळे दूर करण्यात येतील.

या विधेयकात स्टार्ट अप उद्योगांसाठी अनुकूलता तयार करण्यासाठी सुधारणा केल्या जातील. कंपन्यांची नोंदणी एका दिवसात होईल. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, रोजगार निर्मिती वाढवण्याला महत्व दिले आहे. त्यासाठी आर्थिक प्रगती व विकास महत्वाचा आहे तो या प्रस्तावांमागचा मूळ हेतू आहे.

इतर उद्दिष्टेही यात आहेत. एकतर मेक इन इंडिया योजना राबवली जात आहे. दुसरीकडे पेन्शनवर अवलंबून असलेल्या समाजाला फायदा देण्याचा विचार आहे. तर तिसरा उद्देश हा परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचा आहे. या तरतुदी या आर्थिक वाढीसाठी महत्वाच्या आहेत. काही अटींच्या अधीन राहून एप्रिल २०१६ ते मार्च २०१९ या काळात नवोद्योगातील नियोक्त्यांना पहिल्या पाच

वर्षांपैकी तीन वर्षे नफ्यावरील करातून सूट दिली आहे.नवप्रवर्तनशील उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी पेटंट व्यवस्था केली असून प्राप्तीकरातील १० टक्के दराच्या रकमेतून ती सुरू केली जाईल. बँकेतर आर्थिक कंपन्यांना प्राप्तीवर ५ टक्के सूट मिळणार असून त्यात अनुत्पादक कर्जांचाही समावेश आहे. कंपनी प्राप्ती कर हा पुढील आर्थिक वर्षांसाठी तुलनेने लहान कंपन्यांकरिता म्हणजे ज्यांची उलाढाल ५ कोटीपेक्षा जास्त नाही (मार्च २०१५ अखेर) अशा कंपन्यांकरिता २९ टक्के इतका खाली आणला आहे. पण त्यावर अधिभार व उपकर लागणार आहे. नवीन उत्पादक कंपन्या या १ मार्च किंवा त्यानंतर नोंदणीकृत असतील तर त्यांना २५ टक्के कर लागेल व त्यावर अधिभार व उपकर वेगळा असणार आहे फक्त त्यांनी घसारा, गुंतवणूक भत्ता किंवा नफ्याशी निगडित वजावटींवर दावा केला नाही तर त्यांना हा फायदा मिळणार आहे. सेवा कर हा सेवांवर लागतो. दीनदयाळ उध्याय ग्रामीण कौशल्य योजना व कौशल्य विकास मंत्रालयाशी निगडित संस्थांना सेवा कर लागणार नाही.

किरकोळ विक्री क्षेत्रात रोजगार संधी मोठ्या प्रमाणात आहेत, सरकारने असे म्हटले आहे या क्षेत्रात निर्माण होणारे रोजगार हे जास्त असतील पण त्यासाठी काही निर्बंध शिथिल करणे गरजेचे आहे. अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे की, जर शॉ पिंग मॉल हे सातही दिवस सुटी न घेता उघडे ठेवले जातात तर लघु व मध्यम दुकाने तसे का करीत नाहीत. त्यांनीही सातही दिवस दुकाने खुली ठेवावीत. त्यांना सातही दिवस दुकाने खुली ठेवण्याची परवानगी दिली जात आहे, पण ही एच्छिक अट आहे. सातही दिवस दुकाने खुली ठेवायची की नाही हे त्यांनी ठरवावे, यात कामगारांना साप्ताहिक सुटी देणे मात्र अनिवार्य आहे. शिवाय दिवसाचे कामाचे तासही नियमानुसारच असावेत. सरकारने असा प्रस्ताव मांडला आहे की, आदर्श दुकाने व आस्थापने विधेयक राज्यांना पाठवले जाईल ते त्यांनी ऐच्छिक पातळीवर स्वीकारावे त्याची आम्ही सक्ती करू शकत नाही. भारतात ६५ टक्के लोक पस्तीस वर्षाखालील आहेत व सरकार त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती करण्याच्या प्रयत्नात आहे त्यासाठी सर्व मार्ग अवलंबले जात आहेत, पूरक घटकांची व्यवस्था केली जात आहे. बेरोजगारी हे देशापुढचे मोठे आव्हान असून ते कमीत कमी काळात पेलायचे आहे. अर्थसंकल्पात कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर कर लावण्यात आला होता. त्याबाबत साशंकता होती. निवृत्तीनंतर या निधीतील रक्कम काढल्यास साठ टक्के रकमेवर कर लागणार होता तर ४० टक्के रक्कम करमुक्त राहणार होती पण नंतर संसदेत अर्थमंत्री जेटली यांनी हा करप्रस्ताव मागे घेतला आहे. ही चांगली बाब आहे. त्यामुळे उद्योगाचा कणा असलेल्या कामगारांना आता कर लागणार नाही. अर्थमंत्री जेटली यांनी सांगितले की, पीएफवर कर लादण्याचा प्रस्ताव हा लोकांना सामाजिक आर्थिक सुरक्षा देण्यासाठी होता त्यांनी साठ टक्के रक्कम पेन्शनमध्ये गुंतवली असती तर हा कर लागणार नव्हता त्यामुळे त्यांचे निवृत्त जीवन सुखाचे होणार होते पण अनेक खासदार व कामगार संघटनांनी या करप्रस्तावाला विरोध केला होता. त्यामुळे जेटली यांनी तो मागे घेतला. नॅशनल पेन्शन स्कीममधील कर प्रस्ताव कायम राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अर्थसंकल्पानुसार १ एप्रिलपासून पीएफच्या ६० टक्के रकमेवर लागणारा कर आता लागणार नाही. उर्वरित चाळीस टक्के रक्कम आधीच्या प्रस्तावानुसार करमुक्तच राहील. सरकारने भारताचे स्थित्यंतर घडवण्याचे ठरवले आहे त्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न ५ वर्षात दुप्पट करण्याचा इरादा व्यक्त केला आहे, ग्रामीण रोजगार व पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, कौशल्ये, रोजगार निर्मिती, पायाभूत, आर्थिक, प्रशासनिक सुधारणा राबवल्या जाणार आहेत उद्योग सुरू करण्यास अनुकूल वातावरण तयार केले जात आहे. त्याच्या जोडीला आर्थिक शिस्त व करसुधारणा केल्या जात असून गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जात आहे.

■■■

*लेखक वरिष्ठ पत्रकार असून प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य आहेत.*

email: neerajb57@gmail.com

# शाश्वत विकासात शेती, शेतकऱ्यांचे स्थान व अर्थसंकल्प

प्रा.डॉ.बालासाहेब किलचे



***एनडीए प्रणित सरकार शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पाऊले उचलताना दिसते. अर्थमंत्र्यांनी जागतिक मंदीचा संदर्भ देऊन भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम असल्याचे सांगितले त्याच सोबत ग्रामीण विकास, गरीबी कमी करणे, व शेती ह्या क्षेत्रात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्याचा संकल्प केल्याचे दिसते. त्यामुळे देशातील शेती क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी प्रामाणिकरित्या झाली तर शेती व शेतकऱ्यांसाठी अच्छे दिन येतील यात शंका नाही.***

संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे पाहता त्यात दारिद्र्य निर्मूलन, अन्नसुरक्षा, पोषण आहार आणि शाश्वत कृषी, पर्यावरण, वातावरणातील बदल, राष्ट्रीय शाश्वत विकास इत्यादीवर भर दिलेला आहे. त्यामुळे शाश्वत अन्न धान्य उत्पादन व्यवस्था निर्माण केली पाहिजे व त्यातून कृषी उत्पादकता व उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी बियाणे, पिकांच्या जाती ह्यांचे संवर्धन व जतन करणे, कृषी संशोधन ह्या क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे ह्यासाठी प्रयत्न देशांना करावे लागणार आहेत. त्या दृष्टीने एनडीए प्रणित सरकार शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पाऊले उचलताना दिसते.

अर्थमंत्र्यांनी जागतिक मंदीचा संदर्भ देऊन भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम असल्याचे सांगितले त्याच सोबत ग्रामीण विकास, गरीबी कमी करणे, व शेती ह्या क्षेत्रात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्याचा संकल्प केल्याचे दिसते. त्यामुळे देशातील शेती क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी प्रामाणिकरित्या झाली तर शेती व शेतकऱ्यांसाठी अच्छे दिन येतील यात शंका नाही. पण त्यासाठी समाजातील सर्व घटकांनी, नौकरदारवर्गांनी, राज्यकर्त्यांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.

**शेती, शेतकरी, शाश्वत विकास**

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता शेती व शेतकरी हा विकासाच्या केंद्रस्थानी असलेला विषय आहे. त्यामुळे भारताच्या विकासाचा कणा हा शेती व शेतकरी आहे. त्यामुळे शेतीच्या माध्यमातून गरीबी दूर करणे व ग्रामीण विकास साधून शेतीची उत्पादन क्षमता वाढविणे आणि आर्थिकदृष्ट्या अर्थव्यवस्था सक्षम करणे आवश्यक ठरते. म्हणून शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची जी गुंफण करण्यात आलेली आहे ती विकासाचा नवा मार्ग दाखविते. पण आज भारतीय शेतीच्या प्रश्नांवरुन समाजात व शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात दरी निर्माण झालेली आहे. भारतीय शेतीचे कोरडवाहु स्वरुप व सिंचीत शेतीचे स्वरुप पाहता कोरडवाहु शेतीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे भारतीय शेतीच्या प्रश्नाने उग्र रुप धारण केल्याचे दिसून येते. भारतीय शेती प्रामुख्याने निसर्गावर

आधारीत आहे. त्यामुळे पर्यावरणीय आणि आर्थिक संकटाने शेती व्यवसाय धोक्यात आलेला आहे. ह्या धोक्याचा परिणाम शेती उत्पादनावर झाला असून भारतीय शेतीची उत्पादकता मोठ्या प्रमाणात कमी होत असल्याचे दिसून येते. आज शेती व उत्पादन व त्या उत्पादनाचा खर्च ह्याचा मेळ शेतकऱ्यांना साधता न आल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या दिवसेंदिवस वाढत आहेत. देशातील काही भागात व महाराष्ट्रातील शेती गेली दोन तीन वर्ष तोट्यात गेली असुन हे दोन तीन वर्ष शेती व शेतकऱ्यांसाठी कसोटीची ठरलेली आहेत. ह्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्त्रोतावर झालेला आहे. शेतीची झालेली नापीकी, त्यातून वाढलेला कर्जाचा बोजा, सावकाराचा तगादा आणि त्यातून शेतकऱ्यांना आलेले नैराश्य यातून राज्यातील शेतकरी आत्महत्येकडे वळतो आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षा पासून सरकारला शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतकरी आत्महत्या यावरुन वारंवार टिकेला तोंड द्यावे लागते. आज महासत्तेच्या दिशेने होत असलेली वाटचाल करणाऱ्या देशास जागतिक पातळीवर शेतकरी आत्महत्येच्या प्रश्नावरुन मान खाली घालण्याची वेळ आज आल्याचे दिसून येते. त्यामुळे उदयोन्मूख अर्थव्यवस्थेत होत असलेल्या देशाच्या विकासावर प्रश्न चिन्ह उभे राहते. कारण भारताप्रमाणेच उत्पन्नाचा स्तर आणि विकासाचे टप्पे असलेल्या अन्य देशाशी भारताची तुलना केली असता असे दिसते की, शेती प्रश्नांच्या बाबत व परिणामाच्या बाबत आपली प्रगती कमी आहे. त्यामुळे शेती विषयक धोरणात मुलभूत स्वरुपाचे बदल करणे ही काळाची गरज ठरते. त्या दृष्टीने सध्याच्या परिस्थितीत शेती व्यवस्थेला बळकट करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शासन आपल्यापरीने प्रयत्न करीत असले तरी त्या दृष्टीने अद्यापही शासनास ह्या प्रश्नाच्या संदर्भात संपूर्णपणे यश मिळालेले नाही. त्यामुळे केंद्रातील भाजपच्या सरकारने आपला तिसरा अर्थसंकल्प सादर करतांना शेतीचा विकास, त्यातुन ग्रामीण विकास व गरीबी निर्मूलन ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन सरकारवरील भांडवलदाराचे सरकार हा आरोप काही प्रमाणात पुसण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पाद्वारे केला गेल्याचे दिसून येते. त्यामुळे ह्या अर्थसंकल्पातील शेतीच्या संदर्भातील तरतुदीची अंमलबजावणी कशी व कोणत्या पध्दतीने होते ह्यावरच शाश्वत विकासाचे यश अपयश अवलंबून आहे.

### शेती व शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पातील तरतुदी

कृषी आणि शेतकरी विकासासाठी ३५९८४ कोटीची तरतुद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना लागू करुन त्याअंतर्गत २८.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचीताखाली आणने, अपूर्ण असलेल्या ८९ सिंचन योजना त्वरीत कार्यान्वीत करणे, नाबार्ड अंतर्गत २० हजार करोड रुपयांचा प्रारंभिक निधी देऊन त्या निधीचा सिंचीत निधी म्हणून वापर केला जाणार, मनरेगा अंतर्गत ५ लाख शेततळे, विहीरींची निर्मीती, सेंद्रीय शेतीला प्राधान्य, १४ कोटी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड, मृदा बीज परिक्षण सुविधा, ई बाजारासाठी कृषि विपनन ई प्लॅटफॉर्म, शेतकऱ्यांना कृषी कर्जावरील व्याज सवलतीसाठी १५ हजार कोटीची तरतूद, पंतप्रधान विमा योजना ह्या साठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद, पशुधन संजिवनी, नकुल स्वास्थपत्र, ई पशुधन हाट, आणि राष्ट्रीय देशी जेनोमीक केंद्रासाठी ८५० कोटी रुपये देऊन ४ डेअरी योजना कार्यान्वीत केल्या जातील, खताची सबसिडी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे, तसेच ९ लाख कोटी कृषी कर्जाचे ध्येय, दाळ उत्पादनाला प्रोत्साहन, २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्यासाठी प्रयत्न, सेवा कराच्या रुपाने या अर्थसंकल्पात अर्धा टक्का कृषी भार लावलेला आहे.

अर्थसंकल्पातील शेती व शेतकऱ्यांच्या संदर्भातील तरतुदी पाहता अर्थसंकल्पातील एकूण तरतुदीच्या ५० टक्के रक्कम ही प्रामुख्याने ग्रामीण विकास, कृषी, कृषी विमा, पंचायतराज यांच्याशी निगडीत असल्याचे दिसून येते. आज रासायनिक खताच्या वापरामुळे जमिनी नापीक होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सरकारने ह्या अर्थसंकल्पात शेती संदर्भात केलेल्या घोषणा या स्वागताहार्य असल्या तरी त्यातून शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील का असा प्रश्न शेतकऱ्यांना पडलेला आहे. कारण आज शेतीची झालेली दुरावस्था, शेतकऱ्यांचे झालेले कर्जबाजारीपण, शेतकरी आत्महत्या या प्रश्नास समाजातून वाचा फोडण्याचे प्रयत्न पाहता सरकारकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर दिलेले पॅकेज उपयुक्त पडू शकलेले नाही. तसेच सरकारकडून शेतकऱ्यांना वेगवेगळ्या स्वरुपात जे अनुदान दिले जाते त्यातही कपात

करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना शेतीतून उत्पादन खर्चाची रक्कमही वसूली होत नाही हे वास्तव आहे. त्यामुळे शेतीची नापीकी, कर्ज अशा अनेक कारणांमुळे शेतकरी आत्महत्येकडे वळतो आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे ही काळाची गरज ठरते. शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य प्रमाणात भाव मिळत नाही, शेतकऱ्याचे उत्पन्न वाढत नाही अशा परिस्थितीत शासनाकडून कृषी अर्थव्यवस्थेला सरकारच्या धोरणाचा केंद्रबिंदू ठरविणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीकोणातून शेती, शेतकऱ्या संदर्भात असलेले काही जाचक कायदे कालबाह्य ठरविणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीकोणातून ह्या अर्थसंकल्पात शेती, शेतकरी ह्यांच्या शाश्वत विकासाची पाऊले उचलली गेलेली असली तरी शासनास ह्या प्रश्ना संदर्भात आपली भूमिका अतिशय सखोलपूर्वक व विचारपूर्वक नियोजीत करणे आवश्यक ठरते.

**समारोप**

शेती क्षेत्रावर व शेतकऱ्यांवर अर्थसंकल्पातील घोषणामुळे होणारे परिणाम पाहता शेती माल प्रक्रिया क्षेत्रात १०० टक्के थेट परकीय गुंतणूकीमुळे शेती आधारीत उद्योग धंद्याची संख्या मोठ्या प्रमाणात वाढू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेला व ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी येऊ शकते. तसेच कर्ज बाजारी शेतकऱ्यांना काही प्रमाणात अर्थसंकल्पातून दिलासा मिळू शकतो. मातीचे परिक्षण केल्यामुळे मातीचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने वाटचाल होऊ शकेल. अपूर्ण प्रकल्प पूर्ण केल्यामुळे सिंचन क्षमता वाढण्यास हातभार निश्चित लागू शकेल. पिक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई होण्यास हातभार लागू शकेल या सकारात्मक बाबी अर्थसंकल्पातून दिसत असल्या तरी अर्थसंकल्पात शेती आणि शेतकऱ्याच्या संदर्भात काही उणीवा असल्याचेही दिसून येते. त्यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न पाच वर्षात दुप्पट केले जाईल याचे आश्वासन दिले आहे. पण त्या संदर्भात ते दुप्पट कसे केले जाईल ह्यासाठी कोणताही ठोस कृती कार्यक्रम दिलेला नाही. पाच लाख शेततळ्यांच्या संदर्भात केलेली घोषणा पाहता ऐवढे शेततळे संपूर्ण देशासाठी कमी पडतात. एकट्या महाराष्ट्रात ५ लाख तळे आज हवी आहेत. महाराष्ट्र शासनाने मागेल त्याला शेततळे ही योजना राबविली आहे. कोरडवाहू क्षेत्रासाठी सिंचन व्यवस्थेत बदल करणे आवश्यक असतांना त्या बाबत कोणताही ठोस कार्यक्रम दिसत नाही. शेतीचे यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण या संदर्भात ठोस आश्वासन दिलेले नाही. सिंचन प्रकल्पांसाठी केलेली तरतूद कमी असल्यामुळे विविध राज्यांना यात न्याय मिळेल का याबाबत शंका आहे. शेत मालास उत्पादन खर्चाच्या दिड पट भाव देण्याच्या स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी संदर्भात अर्थसंकल्पात उल्लेख नाही. देशातील दुष्काळाच्या संदर्भात, दुष्काळ निवारणासाठी कोणताही ठोस उपक्रम अर्थसंकल्पात नाही. शेतकरी आत्महत्येसंदर्भात अर्थमंत्र्यांनी मौन बाळगले आहे. उणीवा ह्या अर्थसंकल्पात असल्या तरी एक मात्र निश्चित झाले आहे की सरकारने शाश्वत विकासाच्या दृष्टीकोनातून शेती व शेतकऱ्यां विषयीची भूमिका बदलली आहे. त्यामुळे ह्या क्षेत्रात काही प्रमाणात बदल घडविण्यास हा अर्थसंकल्प हातभार लावेल ह्यात शंका नाही.

भारताने शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांवर सप्टेंबर २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रात स्वाक्षरी केल्यामुळे शाश्वत उद्दिष्टांची अंमलबजावणी करणे ही सरकारची जबाबदारी ठरते. देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावण्याचे काम शेती क्षेत्र व शेतकरी करतात त्यामुळे शेतीत गुंतवणूक करणे हे अर्थव्यवस्थेला हातभार लावण्यासारखे आहे. अर्थसंकल्प हा शासनाचा धोरणात्मक दस्ताऐवज असल्यामुळे शासनाने शेती, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम अर्थसंकल्पात दिले असले तरी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या संदर्भातील तरतुदी अपुऱ्या आहेत. त्यामुळे ह्या अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या योजना अपेक्षापुर्तीस जो पर्यंत उतरत नाहीत तो पर्यंत शेती, शेतकऱ्यांचा शाश्वत विकास होणार नाही. त्यामुळे शासनाने केवळ घोषणांचा विचार राजकीय दृष्टीने न करता सामाजिक दृष्टीने करणे क्रमप्राप्त ठरते, त्यानंतरच शेती व शेतकऱ्यांचा शाश्वत विकास होईल यात शंका नाही.

■■■

*लेखक श्री नाथ शिक्षणशास्त्र महाविद्यालय पैठण येथे सहय्यक अधिव्याख्याता*

# ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकास पंखांना बळ

प्रा.डॉ.शिवाजी भ.यादव



***ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या विकासाचा प्रश्न अरूण जेटलीसमोर होता. म्हणून अरूण जेटली यांनी २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला बळ देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ग्रामीण विकासाच्या रक्त वाहिन्या म्हणून ग्रामविकासाच्या योजना व पायाभूत सोयीसुविधा याकडे पाहिजे जाते. 'इंडिया'ने भारताकडे प्रवास करावा या उद्देशाने शेतीक्षेत्राच्या विकासावर भर दिलेला आहे***

जगातील कोणत्याही देशांना विकासाची दिशा निश्चित ठेवण्यासाठी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प मांडवा लागतो. अर्थसंकल्प हा केवळ जमा-खर्चाचे अंदाजपत्रक नसुन शसनाच्या विचारांचे प्रतिबिंब असते. देशापुढे आर्थिक विकासदरात स्थिरता आणणे, चालू खात्यातील तूट कमी करणे, कृषी विकासदर वाढविणे, महागाईचा दर नियंत्रणात ठेवणे, डिजीटल साक्षरतेत वाढ करणे, आर्थिक विषमता कमी करणे, जलसिंचनात वाढ करणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविणे, स्वयंसहायता बचत गटांना उभारी देणे, ग्रामीण भागापर्यंत बँकाचा विस्तार करणे व तरूणांना कौशल्याचे शिक्षण देणे ही आव्हाने आहेत. ही आव्हाने पेलण्याचा प्रयत्न केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात केलेला आहे. सत्ता कोणत्या पक्षाची आहे, यापेक्षा देशाची अर्थव्यवस्था कशी आहे हे अधिक महत्वाचे असते. सद्य:स्थिती आणि पुढील वर्षभरात राबवयाच्या योजना यांचा अर्थसंकल्पात समावेश असतो. जनतेच्या सरकारकडून असणाऱ्या अपेक्षा आणि सरकारला जनतेसाठी करावयाच्या योजना यांचा ताळमेळ बसला तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होत असते. अर्थसंकल्पाकडे देशाच्या अर्थव्यवस्था विकासाचे पंख यादृष्टीकोनातून पाहिले जाते. देशाच्या १२१ कोटी लोकसंख्येपैकी ८३ कोटी (६८.८४ टक्के) लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या विकासाचा प्रश्न अरूण जेटलीसमोर होता. म्हणून अरूण जेटली यांनी २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला बळ देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ग्रामीण विकासाच्या रक्त वाहिन्या म्हणून ग्रामविकासाच्या योजना व पायाभूत सोयीसुविधा याकडे पाहिजे जाते. 'इंडिया'ने भारताकडे प्रवास करावा याउददेशाने शेतीक्षेत्राच्या विकासावर भर दिलेला आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती क्षेत्र असल्याने शेती क्षेत्राच्या विकासाशिवाय देशाला आर्थिक विकासाचे उद्दिष्ट ७.५ टक्क्यांपेक्षा जास्त पूर्ण करता येणार नाही. हे त्यांनी संसदेत मांडलेल्या अर्थसंकल्पावरून दिसते.

देशाला आर्थिक महासत्तापदाकडे नेण्यासाठी ग्रामीण भागात पायाभूत

सोयीसुविधतेतील रस्ते, उर्जा, पाणी, शिक्षण यांचा गतीने विकास करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांचा विकास व्हावा म्हणून थांबलेले ८५ प्रकल्प पुन्हा सुरू करण्यावर जोर दिलेला आहे. ग्रामीण भागात रस्त्यांची निर्मिती मोठया प्रमाणात करण्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसाठी १९ हजार कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. २०१८ पर्यंत देशातील सर्व खेड्यांमध्ये १०० टक्के वीज पोहोचविण्याचा मानस सरकारचा आहे. येत्या तीन वर्षात देशातील सर्व पोस्ट ऑफिस कार्यालयात 'एटीएम' मशिन बसविण्याचा संकल्प आहे. ग्रामीण भागाच्या डिजीटल साक्षरतेवर विशेष भर दिला आहे. अशा मार्गाने ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न सरकारचा आहे. २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ग्रामीण विकासासाठी काही ठळक गोष्टी पुढील प्रमाणे आहेत.

**शेतीक्षेत्र व ग्रामीण विकास :**

अर्थसंकल्पातील मुद्यांचा क्रम पाहिला तर ग्रामीण आणि शेतीविकासावर अधिक लक्ष केंद्रित करायचे आहे, हे स्पष्ट दिसते. देशात नेहमी पडणाऱ्या दुष्काळाने शेतीक्षेत्रावर अवलंबून असलेला शेतकरी वर्ग हलाखीचे जीवन जगत आहे. शेतकऱ्यांच्या नापिकी व कर्जाला कंटाळून आत्महत्याचे सत्र थांबण्यास तयार नाही. शेतीचा शाश्वत विकास झाल्याशिवाय शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाही. हे अरूण जेटलींना माहित असल्याने शेतीच्या विकासासाठी ३५ हजार ९८४ कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. शेती व्यवसाय बँकाच्या कर्जावर शेतकरी करतो. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जासह एकूण तरतुद ४४ हजार ४८५ कोटी रूपये इतकी असून मागील वर्षीच्या तरतुदीपेक्षा ती दुप्पट आहे. देशात केवळ ४६ टक्के जमीन सिंचनाखाली आहे. देशातील उत्तरप्रदेश, पंजाब, बिहार, हरियाणा या राज्यात पाण्याच्या उपलब्धतेमूळे सिंचनाचे प्रमाण महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, झारखंड, गुजरात, मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यापेक्षा तूलनेने जास्त आहे. दरवर्षी पाऊस कमी होत असल्याने पाण्याचा गंभीर प्रश्न देशापुढे उभा राहणार आहे. झारखंड व महाराष्ट्र या राज्यात जलसिंचनाचे प्रमाण अनुक्रमे ५.६ टक्के व १८.८ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचनात वाढ करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविता येतील. सिंचन प्रकल्पासाठी चालू वर्षी २० हजार कोटी आणि पुढच्या वर्षी ८९ हजार कोटी रूपयांच्या निधीची तरतुद केलेली आहे.

***महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचनात वाढ करून शेतक-यांच्या आत्महत्या थांबविता येतील. सिंचन प्रकल्पासाठी चालू वर्षी २० हजार कोटी आणि पुढच्या वर्षी ८९ हजार कोटी रूपयांच्या निधीची तरतुद केलेली आहे. ग्रामीण भागात काम करणाऱ्या संस्थापैकी महत्वाच्या संस्था ग्रामपंचायती व नगरपालिका आहेत. ग्रामपंचायती व नगरपालिका संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा विकास साध्य करता येवू शकतो.***

ग्रामीण भागात काम करणाऱ्या संस्थापैकी महत्वाच्या संस्था ग्रामपंचायती व नगरपालिका आहेत. ग्रामपंचायती व नगरपालिका संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा विकास साध्य करता येवू शकतो.

या उद्देशाने अर्थसंकल्पात २.८७ लाख कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटांनी देशातील शेतकरी वर्ग आज प्रचंड अडचणीत सापडला आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या वर्गात शेतकरी, शेतमजूरांची संख्या फार मोठी आहे. शेतकऱ्यांचे पाच वर्षात दुप्पट उत्पन्न कसे वाढविता येईल यावर जोर दिलेला आहे. भूजल संशोधनासाठी सहा हजार कोटी रूपये दिले आहेत. येत्या तीन वर्षात देशातील पाच लाख एकर जमीन जैविक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जमिनीचा पोत, माती परिक्षण, सेंद्रिय शेती, सिंचित २८.५ लाख हेक्टर जमिनीत वाढ, पाच लाख विहिरी आणि तलावांची निर्मिती, डाळीच्या किंमतीवर नियंत्रण, भूजल संशोधन, सुधारित पिक विमा यासंबंधीच्या तरतूदी ग्रामीण भागाच्या विकासासाठी केल्या आहेत.

**पायाभुत सोयी व ग्रामीण विकास**

कोणत्याही देशाचा विकास पायाभूत सोयी सुविधांच्या निर्मितीवर अवलंबून असते. देशाच्या विकासातून पायाभूत सोयी-सुविधांचा विकास होतो असे नव्हे तर पायाभूत सोयी सुविधांच्या विकासातून देशाचा विकास होतो. पायाभूत सोयींमध्ये रस्ते, विज, पाणी, दळणवळण, बँका यांचा समावेश होतो. स्वातंत्र्य पूर्वकाळ

देशात रस्त्यांची संख्या फारच कमी होती. खऱ्या अर्थाने रस्त्यांचा विकास स्वातंत्र्यानंतर झालेला आहे. भाजपाचे सरकार सत्तेत आल्यापासून रस्त्यांच्या निर्मितीची गती वाढली आहे. देशाला आर्थिक महासत्तेकडे नेण्यासाठी ग्रामीण भागापर्यंत रस्त्याची निर्मिती होणे गरजेचे आहे. रस्त्यांमुळे देशातील कोणतेही गाव, वाडयांच्या विकासाला सुरूवात होते. देशातील काही भागात पक्क्या रस्त्यांची निर्मिती आजही झालेली नाही. देशात १९५१ मध्ये रस्त्याची लांबी ४ लाख किलोमीटर होती. ती २०१४ मध्ये ४८ लाख किमी पर्यंत झालेली आहे. देशाचा विकास रस्त्याशिवाय होणे शक्य नाही. अरूण जेटली यांनी देशाच्या ग्रामीण भागात रस्ते बांधण्यासाठी अर्थसंकल्पात रस्ते उभारणीला विशेष महत्व दिलेले आहे. देशातील सर्वच राज्यांना राष्ट्रीय महामार्गाने जोडण्यासाठी ५५ हजार कोटी रूपयांची तरतूद केली आहे. ग्रामसडक योजनेवर ९७ हजार कोटी रूपयांचा खर्च केला जाणार आहे. रस्ते व रेल्वे विकासासाठी १८ हजार कोटी रूपयांची तरतुद केलेली आहे. पायाभूत सोयीसाठी १५ हजार कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. वर्षभरात देशामध्ये १० हजार किमी रस्ते निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत रस्ते निर्मितीवरील खर्च २८ टक्क्यांनी वाढविण्यात आला आहे.

**ग्रामसुधारणा :**

भारतात शहरी भागाच्या तूलनेत ग्रामीण भागाचे प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब, मागासलेल्या लोकांना विकासाच्या प्रवाहात आणणे महत्वाचे आहे. ग्रामीण भागात बेरोजगारांची संख्या मोठी आहे. बेरोजगारांची वाढती संख्या देशामध्ये स्थिरता निर्माण करण्यात नेहमीच अडथळा असते. म्हणून 'मनरेगा'वर ३८ हजार ५०० कोटी रूपये खर्च केले जाणार आहेत. ग्रामीण भागाचा विकास ग्रामपंचायती व नगरपालिका या संस्थेशिवाय होवू शकत नाही. तेंव्हा ग्रामपंचायती व नगरपालिका यांच्या निधीत मोठया प्रमाणात वाढ केलेली आहे. 'स्मार्ट सिटी अमृत'साठी ७२९० कोटी, 'स्वच्छत भारत मोहिमे'साठी ९ हजार कोटी, ईशान्य भारताच्या विकासासाठी ३३,०९७ कोटी रूपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

***शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी झाला आहे. पण शेतीक्षेत्र आजही इतर क्षेत्राच्या तूलनेत जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेतीक्षेत्र असल्याने अरूण जेटली यांनी शेतीच्या विकासासाठी ३५ हजार ९८४ कोटीची तरतूद केली आहे. शेतीच्या सिंचनाचे प्रमाण वाढावे म्हणून देशात पाच लाख विहिरी व तलावाची निर्मिती करण्यात येणार आहे. सरकारने भूजल सर्वेक्षणावर विशेष भर दिला आहे.***

**शिक्षण व रोजगार**

देशातील लोकांचा सर्वात महत्वाचा कोणता प्रश्न असेल तर तो रोजगारांचा आहे. ग्रामीण भागात केवळ शिक्षणाचा प्रसार महत्वाचा नाही तर शिक्षण घेतलेल्या तरूणांना रोजगार मिळणे महत्वाचे आहे. देशात स्टँडअप योजनेवर ५०० कोटींची तरतुद केलेली आहे. स्टँडअप च्या परवानगीसाठी लागणारा वेळ कमी करून एक दिवसावर आणलेला आहे. देशात मनुष्यबळाची कमतरता वाटत नाही. पण मनूष्यबळ पर्याप्त कुशल नसल्याने रोजगाराच्या संधीचा फायदा घेता येत नाही. देशातील मनूष्यबळाला अधिक प्रवाहात आणण्यासाठी कौशल्य शिक्षणाची गरज आहे. यासाठी कौशल्य केंद्राची संख्या १५०० पर्यंत वाढविण्यात येणार आहे. यावर १७०० कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागात राहणाऱ्या तळागाळातील मुला-मुलींना व्हावा या उद्देशाने देशात नवीन ६२ नवोदय विद्यालय सुरू होणार आहेत. देशातील एक कोटी तरूणांना तीन वर्षात कौशल्य प्रशिक्षण द्यावयाचे हे ध्येय सरकारचे आहे.

**स्वस्त व महाग वस्तू**

केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे स्वप्न डोळयासमोर ठेवून लोककलावंताचे कार्यक्रम, पेन्शन योजना, मायक्रावेव्ह योजना, सॅनिटर पॅड, चौरस फूट कारपेट एरियापेक्षा कमी घरे, निर्जंतूकीकरण केलेले डायलायझर, चप्पल, बूट, सौरदिवे, अपंगाचे साहित्य, इंटरनेटचे राऊटर, मोडेम, सेटटॉप बॉक्स, इलेक्ट्रीक वाहने, फ्रीज, डिजीटल कॅमेरे, सीसी टिव्ही कॅमेरे या वस्तू स्वस्त केलेल्या आहेत.

सोने-चांदी दागिने, सोन्याची बिस्कीटे, हिरे, मिनरल वॉटर, सोडा, कोंल्ड्रिक्स, दोन लाखावरील वस्तू व सेवा, भाडयाच्या वाहनातून प्रवास,

मूव्हर्स ॲन्ड पॅकर्स, व्हीआयपी उपकरणे, आयात केलेल्या कार, लॉटरी तिकिटे, औद्योगिक सौर जलतापमान, कायदेशीर सेवा, कार, चित्रपट, सिगारेट, सिगार, तंबाखू, गुटखा, मोबाईल सेवा, बाहेरचे जेवण, हवाई प्रवास, रेडिमेड व एक हजारावरील ब्रॅण्डेड कपडे, चामडी बूट या वस्तू महागल्या आहेत. या सर्व गोष्टीवरून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा चेहरा २०१६-१७ चा अर्थसंकल्प वाटतो.

**निष्कर्ष**

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी झाला आहे. पण शेतीक्षेत्र आजही इतर क्षेत्राच्या तूलनेत जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेतीक्षेत्र असल्याने अरूण जेटली यांनी शेतीच्या विकासासाठी ३५ हजार ९८४ कोटीची तरतूद केली आहे. शेतीच्या सिंचनाचे प्रमाण वाढावे म्हणून देशात पाच लाख विहिरी व तलावाची निर्मिती करण्यात येणार आहे. सरकारने भूजल सर्वेक्षणावर विशेष भर दिला आहे.ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे पंख शेती क्षेत्र आहे. तेव्हा देशातील शेतीक्षेत्राचा विकास होणे अपरिहार्य वाटते.

नापिकी व कर्जाला कंटाळून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे सत्र थांबण्यास तयार नाही. तेव्हा शेती क्षेत्रासाठी वाढीव निधीची निश्चित आवश्यकता आहे. त्याच बरोबर शेतकऱ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

भारत ग्रामीण भागात पसरलेला देश आहे. ग्रामीण भागाच्या विकासात पायाभुत सोयीचे महत्व अनन्यसाधारण आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतर पायाभूत सोयी निर्मितीला वेग आलेला आहे. पायाभूत सोयीमध्ये बँका, रस्ते, पाणी, वीज यांचा समावेश होतो. १९५१ मध्ये देशात रस्त्यांची लांबी ४ लाख किमी होती, ती २०१४ मध्ये ४८ लाख किमी पर्यंत वाढलेली आहे. बँकांचा विस्तार बऱ्याच अंशी झाला पण ग्रामीण भागात पूर्णत: बँका विस्तारीत झालेल्या नाहीत. देशात जलसिंचनाचे प्रमाण ४६ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

ग्रामीण भागात रस्ते, पाणी, वीज, बँका या सुविधा पोहोचलेल्या नाहीत, असे नाही. पण ज्या गतीने पायाभूत सोयीचा विस्तार ग्रामीण भागात होणे अपेक्षित होते त्या गतीने झालेला नाही. तेव्हा ग्रामीण भागात पायाभूत सोयीच्या विस्तारावर सरकारने आणखी भर देणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातून देशाला आर्थिक विकासदराचे ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण करता येवू शकते.

■■■

*लेखक शिवछत्रपती कला महाविद्यालय, पाचोड, जि. औरंगाबाद येथे अर्थशास्त्र संशोधक आणि मार्गदर्शक आहेत.*

*email: shivajiyadav84@gmail.com*



## FORM IV

**Statement about ownership and other particulars about Yojana (Marathi)**
***to be published in the first issue every year after the last day of February***

| | | |
|---|---|---|
| 1. Place of publication | : | Mumbai |
| 2. Periodicity of its publication | : | Monthly |
| 3. Printer's Name | : | Dr. Sadhana Rout |
| Nationality | : | Indian |
| Address | : | Publications Division<br>Soochna Bhawan,<br>New Delhi – 110 003. |
| 4. Publisher's Name | : | Dr. Sadhana Rout |
| Nationality | : | Indian |
| Address | : | Publications Division<br>Soochna Bhavan,<br>New Delhi – 110 003. |
| 5. Editor's Name | : | Sh. Umesh Ujgare |
| Nationality | : | Indian |
| Address | | Publications Division,<br>701-Kendriya Sadan, Sector 19,<br>CBD-Belapur, Navi Mumbai -400614 |
| 6. Name and addresses of individuals: who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital | | Ministry of Information & Broadcasting<br>Government of India,<br>New Delhi – 110 001. |

**I, Sadhana Rout, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.**

Date: 29/02/16

(Dr. Sadhana Rout)
Signature of Publisher

# भारतीय रेल्वे अर्थसंकल्प २०१६-१७

प्रा. दत्तात्रय आण्णा होनमाने



***हा रेल्वे अर्थसंकल्प कोणतीही दरवाढ नसलेला तसेच समाजातील सर्व घटकांना समावून घेणारा आहे. यात रेल्वेच्या गतीमानतेवर भर देवून सुरक्षेलाही प्राधान्य देण्यात आलेले आहे. रेल्वेमंत्री सुरेश प्रभू त्यांच्या कार्यकाळातला हा दुसरा अर्थसंकल्प महसूल वाढविण्यासाठी रेल्वे भाडेवाढ करण्याचे त्यांनी पुर्णपणे टाळले आहे. याचे नेमके कारण सद्यातरी गुलदस्त्यात आहे पण नंतर मात्र मालवहातूकीच्या क्षेत्रातील घसरण थांबविण्यासाठी व आर्थिक विकासासाठी तसेच रेल्वेच्या मजबूतीकरणासाठी मालभाडयाची फेररचना करणार असल्याचे सुतोवाच त्यांनी केले आहे.***

देशाच्या अर्थव्यवस्थेत रेल्वे वाहतूक अतिशय महत्वाची आहे रेल्वे ही भारतीय अर्थव्यवस्थेची रक्त वाहिनी समजली जाते. भारतीय रेल्वेस आर्थिक दृष्टया सशक्त करून प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, सुखकारक व आनंददायी करणे या बरोबरच मागणीनुसार रेल्वेमध्ये आरक्षण देण्याचा प्रयत्न २०२० पर्यंत पूर्ण करणे, मालवहातुकीचे योग्य वेळापत्रक करून गाडयांचा वेग वाढविणा, सुरक्षेसाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करणे, मानवरहित रेल्वे क्रॉसिंग रद्द करणे, सुवर्ण चतुष्कोन मार्गावर वेगवान गाडया धावण्याची व्यवस्था करणे, रेल्वेतील स्वच्छता वाढविणे ही उद्दिष्टे समोर ठेवून रेल्वे मंत्री सुरेश प्रभु यांनी यंदाचा रेल्वे अर्थसंकल्प लोकसभेत मांडला. जागतिक मंदी आणि जागतिक अर्थव्यवस्थेची घसरण सुरू असताना २०१६-१७ या आगामी वर्षाचा रेल्वे अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. हा रेल्वेअर्थसंकल्प कोणतीही दरवाढ नसलेला तसेच समाजातील सर्व घटकांना समावून घेणारा आहे. यात रेल्वेच्या गतीमानतेवर भर देवून सुरक्षेलाही प्राधान्य देण्यात आलेले आहे. रेल्वेमंत्री सुरेश प्रभू त्यांच्या कार्यकाळातला हा दुसरा अर्थसंकल्प. महसूल वाढविण्यासाठी रेल्वे भाडेवाढ करण्याचे त्यांनी पुर्णपणे टाळले आहे. याचे नेमके कारण सद्यातरी गुलदस्त्यात आहे पण नंतर मात्र मालवहातूकीच्या क्षेत्रातील घसरण थांबविण्यासाठी व आर्थिक विकासासाठी तसेच रेल्वेच्या मजबूतीकरणासाठी मालभाडयाची फेररचना करणार असल्याचे सुतोवाच त्यांनी केले आहे. या अर्थसंकल्पात हमसफर, तेजस, आणि उदय या गाडया वगळता नवीन रेल्वेगाडया सुरू केलेल्या नाहीत. पण त्याऐवजी प्रवाशांसाठी काही नव्या वर्गातील सेवा देण्याचे ठरविले आहे. हा रेल्वे अर्थ संकल्प मागील वर्षाची थोडीसी सुधारीत आवृत्ती असा मानावा लागेल. कारण कोणतीही भाडेवाढ केली नसल्याने देशातील आमआदमी, उद्योजक, व अन्य व्यावसायीक यांना दिलासा देणारा हा रेल्वे अर्थसंकल्प वाटतो. या अर्थसंकल्पात तात्कालीक अर्थसवलती व सेवासुविधांवर जादा भर न देता रेल्वेच्या दीर्घकालीन सुधारणांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.त्यामुळे सध्या तो निराशाजनक वाटत असला तरी त्याच्या योजना खरोखरच अंमलात आणल्यास भारतीय रेल्वेचे जाळे विस्तारून देशातील सर्व जनतेचा फायदा होणार आहे.

**पुढील तक्त्यात भारतीय रेल्वेच्या रूपयाचा जमा व खर्च मांडण्यात आला आहे**

| **रूपया असा येईल** | | | **असा खर्च होईल** | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.न. | आवक | पैसे | अ.न. | खर्च | पैसे |
| १ | माल वाहतूक | ६५-६ पैसे | १ | वेतन आणि भत्ते | २९-७ पैसे |
| २ | प्रवासी वाहतूक | २६-१ पैसे | २ | निवृत्ती वेतन | १८-२ पैसे |
| ३ | फुटकळ उत्पन्न | ३-१ पैसे | ३ | इंधन | १७-८ पैसे |
| ४ | इतर रेल्वे सुविधा | २-५ पैसे | ४ | लाभांश | ५-७ पैसे |
| ५ | इतर उत्पन्न | २-७ पैसे | ५ | राखीव घसारा निधी | ५-८ पैसे |
| | | | ६ | भाडे खर्च | ५-० पैसे |
| | | | ७ | भांडवली निधी | ३-९ पैसे |
| | | | ८ | साठवण | ३-१ पैसे |
| | | | ९ | विकास निधी | ०-९ पैसे |
| | | | १० | कर्ज सेवा | ०-०४ पैसे |
| | | | ११ | इतर | ९-८६ पैसे |
| | एकूण | १०० पैसे | | एकूण | १०० पैसे |
| Source : Railway Budget 2016-17 documents ,KBK Infographics | | | | | |

सेवांवरील भर- यामध्ये गर्दीच्या मार्गावर पूर्णपणे अनारक्षित अशी सुपरफास्ट 'अंत्योदय एक्सप्रेस', तसेच लांब पल्याच्या गाडयांना अनारक्षित 'दीन दयाल डबे'जोडून प्रवाशांची गैरसोय टाळली आहे. ताशी १३० कि.मी. वेगाने धावणाऱ्या 'तेजस' यागाडीचे सर्व डबे वातानुकूलीत करणे तसेच गर्दीच्या व तिर्थस्थळांच्या ठिकाणी रात्री धावणाऱ्या रेल्वे गाडयांना 'अस्था सर्किट ट्रेन'या बरोबरच प्रवासी व मालगाडयांचा वेग वाढविणे, प्रवासी डब्यांची रचना बदलून त्यातील आसन व्यवस्थेत वाढ करणे, अधिक क्षमतेची रेल्वे इंजिने इत्यादी सारख्या सेवा देण्याचे ठरविले आहे. रेल्वेच्या विकासासाठी राज्य सरकारांना भागीदार करून घेण्याचे ठरविले आहे. वित्त व भांडवली निधीसाठी खाजगी उद्योग आणि वित्तीय संस्थांकडून वित्तसहाय घेण्याचे ठरविले आहे. त्यांच्या या धोरणामुळे रेल्वेला १. ८४ लाख कोटी रूपयाचा महसूल २०१६-१७ या वर्षात मिळेल अशी आशा व्यक्त केली आहे. तसेच १.२४ लाख कोटी रूपयाची भांडवली गुंतवणूक केली जाण्याची शक्यता वर्तवली आहे. एकंदरीत त्यांनी मोठया प्रमाणात खर्च करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. हा अर्थसंकल्प मांडताना त्यांनी 'नव अर्जन', 'नव मानक', आणि 'नव संरचना' या तीन आधारस्तंभाना महत्व दिले आहे. 'नव अर्जन' यानुसार रेल्वेच्या भाडेवाढीशिवाय महसूल वाढीसाठी नवीन व्यवहार्य मार्ग स्विकारणे यात रेल्वेच्या स्थावर व जंगम मालमत्तेतून जास्तीत जास्त पैसा उभा करणे, 'नव मानक'या नुसार प्रत्येक रूपया जास्तीतजास्त उत्पादक पध्दतीने खर्च करणे, 'नव संरचना' या नुसार सहकार्य व सहभाग तसेच नवीन कल्पना व संपर्क साधणे. असे नवीन मार्ग स्विकारले आहेत. थोडक्यात या रेल्वे अर्थसंकल्पातून सुरेश प्रभू यांनी सरकारच्या 'मेक इन इंडिया', 'स्वच्छ भारत', 'डिजिटल इंडिया', आणि 'स्टार्ट अप इंडिया' या महत्वाकांक्षी योजना साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. देशातील चारशे रेल्वे स्थानकात वायफायची सुविधा देण्यात येणार आहे.

रेल्वेचा विकास साधण्यासाठी ठरविलेली सात कलमे -रेल्वेची प्रवासी आणि मालवाहतूक क्षमता वाढवून त्याद्वारे महसूल वाढविणे, अपघात टाळणे,

खासगी भागीदारी वाढविणे, कारभारात पारदर्शकता आणणे, रेल्वेगाडयांचा वेग वाढवणे यासाठी पुढील सात कलमे राबविण्यावर भर दिला आहे.

१. मिशन २५ टन- माल वाहतूक करणाऱ्या वाघिणींची वहनक्षमता वाढवून महसूलात वाढ करण्यासाठी २५ टन ऍक्सेल-लोड वाघिणीद्वारे मालवाहतुकीत १० ते २० टक्के वाढ करणे. तसेच ही वाहतूक २०२० पर्यंत ७० टक्क्यापर्यंत वाढविणे.

२. झीरो ऍक्सिडेंट मिशन- मानवरहित रेल्वे फाटकांची संख्या कमी करून पुढील ३ते ४ वर्षात ब्रॉडगेज मार्गावरील मानवरहीत रेल्वे फाटकांची संख्या शून्यावर आणणे त्यामुळे अपघाती मृत्युची संख्या कमी होईल तसेच पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असलेली टक्कररोधक यंत्रणा वापरून संभाव्य रेल्वे अपघात टाळणे.

३. प्रॉक्युरमेन्ट ऍण्ड कन्झम्प्शन इफिशिअन्सी- विविध सेवांचा स्तर उंचावण्यासाठी आवश्यक तेवढीच खरेदी करून तिचा जास्तीतजास्त वापर करणे की ज्यामुळे १५०० कोटी रूपयांची बचत होईल.

४. मिशन रफतार- पुढील पाच वर्षात मालगाडीचा वेग दुपटीने वाढविणे तसेच सुपरफास्ट मेल आणि एक्सप्रेस गाडयांचा सरासरी वेग ताशी २५ कि.मी. ने वाढविणे.

५. मिशन १०० - येत्या दोन वर्षात किमान १०० सायडिंग सुरू करून खासगी भागीदारी वाढविण्यासाठी विद्यमान सायडिंग/पीएफटी धोरणात सुधारणा करणे. तसेच अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे व नव्या अर्जाच्या प्रक्रियेसाठी ऑनलाईन पोर्टल सुरू करणे.

६. नवी लेखा प्रक्रिया - गुंतवणुकीचा लाभ किती प्रमाणात झाला आहे हे पाहाण्यासाठी नवी लेखा प्रक्रिया राबविणे यामुळे वाजवी मुल्यनिर्धारण, वाजवी खर्च आणि योग्य परिणाम साधता येणार आहे.

७. क्षमतेचा वापर- रेल्वेची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने दिल्ली-मुंबई आणि दिल्ली-कोलकता असे दोन 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर्स' २०१९ पर्यंत कार्यान्वित करून त्याचा वापर पूर्ण क्षमतेने करणे.

**रेल्वेचा विकास साधण्यासाठी ठरविलेली उपाय व योजनात्मक धोरणे-** रेल्वेचा विकास साधण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने पुढील उपाय योजना करण्याचे ठरविले आहे.

१. अधिकार आणि निर्णय प्रक्रियेचे विभागीय पातळीपर्यंत विकेंद्रिकरण करणे.

२. रेल्वे मंडळाची फेर रचना करणे.

३. रेल्वे कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणे.

४. रेल्वेच्या सेवा, भाडे आकारणी यांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र रेल्वे विकास प्राधिकरण स्थापन करणे.

५. कुशल कर्मचारीवर्गासाठी स्वतंत्र रेल्वे विद्यापिठे स्थापन करणे व या माध्यमातून रेल्वेच्या गरजा लक्षात घेवून त्यानूसार संशोधन व तंत्रज्ञान विकास साधणाऱ्या संस्था स्थापन करणे.

६. २०२० पर्यंत सर्वांना कन्फर्म तिकीटांची व्यवस्था करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

७. प्रवाशांसाठी साडेचार हजारपेक्षा जास्त सेवा कोचमध्ये देण्यात येणार आहेत.

८. १७००० नवे बायोटॉयलेट बसविण्यात येणारा आहेत.

९. १३० कि.मी. वेगाने धावणा-या तेजसचा प्रस्ताव मांडयात आलेला आहे.या बरोबरच हमसफर आणि उदय या नव्या रेल्वे गाडया सुरू करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे.

१०. २००० किलो मीटर रेल्वे लाईनचे विद्युतीकरण करण्यात येणार आहे.

११. रेल्वे स्थानकावरील खाद्यपदार्थाचे स्टॉल स्थानिकांना तसेच अनुसुचित जाती,जमातीना दिले जाणार आहेत त्यामध्ये महिलांसाठी ३३ ठक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.

१२. वृध्द व अपंग नागरिकांसाठी सारथी सेवेअंतर्गत व्हिलचेअरची सुविधा आणि प्रत्येक प्लॅटफॉर्मवर स्वच्छतागृहाची सुविधा देण्यात येणार आहे.

१३. प्रवाशांसाठी एफ.एम.रेडिओ स्थापन करून लांब पल्ल्याच्या रेल्वेत तीन आरक्षित कोचची सोय तसेच मोबाईल चार्जींग आणि पेयजलाची व्यवस्था, तसेच चारशे स्थानकांवर वाय-फाय सोय उपलब्ध केली जाणार आहे.

**रेल्वे अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टये-**

१. सर्व मुख्य स्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याची योजना.

२. फक्त मालवहातुकीसाठी कॉरिडॉर तयार करण्याची योजना.

३. जयगड, दिघी, रेवास आणि पॅरादिप ही बंदरे रेल्वेने जोडण्यावर भर.

४. मेक इन इंडिया अंतर्गत इंजिन तयार करण्याच्या कारखान्याचे दोन प्रस्ताव मान्य केले आहेत.

५. रेल्वे गाडयांची निर्मीती तीस टक्क्यांनी वाढविणार.

६. अनेक स्थानकांचा पुनर्विकास करून रेल्वे स्थानकांची क्षमता वाढविण्यावर भर.

७. हेल्पलाईन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे सुरक्षेत वाढ.

८. पाणी आणि मोबाईलची सुविधा असलेले दीन दयाळू हे अनारक्षित डबे.

९. डिजिटल इंडिया अंतर्गत प्रायोगिक तत्वावर बारकोडेड तिकीट, परकीय डेबिट कार्डवर ई-तिकीट.

१०. १३९ हेल्पलाईनचा वापर करून तिकीट रद्द करण्याची सोय.

११. जेष्ठ नागरिकांसांठी ५० टक्के आणि महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण कोटा.

१२. मणिपूर आणि मिझोराम रेल्वेने उर्वरित देशांशी रेल्वे वाहतूक जोडण्यावर भर.

१३. दिव्यांग (अपंग), महिला व जेष्ठ नागरिकांसाठी निवडक स्थानकाच्या सर्व फलाटांवर मोबाईल चार्जींग व शौचालयाच्या सोई वाढविणार.

१४. आगामी आर्थिक वर्षात १,८४,८२० कोटी रूपये अपेक्षित उत्पन्न मिळेल अशी योजना

१५. ४७५ स्थानकांवर १७ हजार जैव शौचालये .

१६.ईशान्य भारतासाठी आसाममधील बराक व्हॅलीपर्यंत लोहमार्गाची सोय वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे.तसेच आगरताळा रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वेमार्ग करण्यावर भर देण्यात आलेला आहे. या बरोबरच मिझोराम आणि मणिपूरमध्ये ब्राडगेजचे जाळे तयार करण्यावर भर देण्यात आलेला आहे. कथलक-भैरवी आणि अरूणाचल- जिरीबाम प्रकल्प राबवून ईशान्य भारताच्या विकासाला चालना दिली आहे.

१७. प्रस्तावित नवे मार्ग यामध्ये खडगपूर-विजयवाडा, दिल्ली - चेन्नई, आणि मुंबई खडगपूर मालवाहतूक मार्ग वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे.

१८. रेल्वे सुधारणा करण्याच्या हेतूने ऑनलाईन भरती प्रक्रियेची व्याप्ती सर्व पदांपर्यंत वाढविली आहे. पारदर्शकता वाढविण्यासाठी सोशलमिडियाचा वापर करणे, सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाईन करणे, प्रकल्प मंजूरीचा कालावधी कमी करून तो सात ते आठ महिन्यावर आणणे, सर्व विभागातील वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करणे, रेल्वे कारभारातील त्रुटी दूर करण्यासाठी विशेष पथक स्थापन करणे, राज्य सरकारबरोबर संयुक्त प्रकल्प राबविणे यासाठी २३ करार मंजूर करण्यात आलेले आहेत. अशा विविध प्रयत्नांनी रेल्वे कारभार सुधारण्यावर भर देण्यात आलेला आहे.या शिवाय रेल्वे सेवा सुधारण्यासाठी 'रेल्वे विकास मंडळ' स्थापन करून या मंडळाच्या माध्यमातून नवीन संकल्पना, नूतनीकरण, संस्थात्मक पुनर्रचना, सशक्तीकरण, एकीकरण, संशोधन व विकास, विश्लेषण, नवरचना राबविण्यावर भर देण्यात आलेला आहे.

१९. २०१६-१७ या वर्षातील लक्ष्य व ठरविलेली उदिष्टये पूर्ण करण्याच्या हेतूने कार्यकौशल्याचे प्रमाण ९२ टक्के करण्यावर भर देण्यात येणार आहे. याबरोबरच सातवा वेतन आयोग लागू होताच दैनंदिन खर्चाचे प्रमाण ११.७ टक्क्यानी कमी करणे, डिझेल आणि विजेच्या वापरावर नियंत्रण मिळविणे, २,८०० कि. मी. नवीन लोहमार्ग टाकणे,एक्सपेस गाडयांचा किमान सरासरी वेग ८० कि.मी. प्रतितास करणे, दर दिवसाला सरासरी सात कि.मी.लोहमार्ग तयार करणे (पूर्वी ही सरासरी ४.३ कि. मी होती) ही सरासरी पुढील तीन वर्षात १९ कि.मी. पर्यंत वाढविणे, अधिकारांचे विकेंद्रिकरण करण्याची प्रक्रिया सुरू करणे, पूर्वीच्या पाच वर्षातील गुंतवणुकीचा विचार करता या वर्षातील गुंतवणूक दुप्पट करणे,याबरोबरच १.२१लाख कोटी रूपयाचे नवे प्रकल्प राज्यसरकारशी सहकार्य करून राबविणे याबरोबरच सार्वजनिक खाजगी भागीदारी निर्माण करणे या उद्दिष्टांवर भर दिलेला आहे.

**गतकाळातील अर्थसंकल्पाशी २०१६-१७च्या नवीन अर्थसंकल्पाची तूलना-**

| अ.न. | घटक (आकडे कोटी मध्ये) | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| १ | वाहतुकीतून एकूण उत्पन्न | १५६७११ | १८३५७८ | १८४८२० |
| २ | एकूण कामकाजी खर्च | १४२९९६ | १६२२१० | १६९२६० |
| ३ | रेल्वेचा निव्वळ महसूल | १४२९९६ | १६२२१० | १६९२६० |
| ४ | सर्वसामान्य महसुलीवरील देय लाभांश | ९१७४ | १०८११ | ९७३१ |
| ५ | कार्यगत प्रमाण टक्केवारी | ९१-३ : | ८८-५ : | ९२-० : |
| स्त्रोत : रेल्वे अर्थसंकल्प-२०१६-१७ | | | | |

**रेल्वे अर्थसंकल्पाची गुणात्मक बाजू-**

१. विकासात्मकतेवर भर- विकासापासून वंचित असणाऱ्या ईशान्य भारताला न्याय देऊन देशाचा समतोल विकास साधण्यावर भर दिलेला आहे. या रेल्वे अर्थसंकल्पामुळे देशात १.२१ लाख कोटीची भांडवली गुंतवणुक वाढणार असल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेत अनेक दूरगामी आणि सकारात्मक बदल घडून विकासाची गती निश्चित वाढेल.

२. सामान्य माणसाच्या सोईचा प्रस्ताव - या रेल्वे अर्थसंकल्पात अनारक्षित रेल्वेगाडया व अनारक्षित प्रवासी डब्यांची संख्या वाढ, जेष्ठ नागरिकांना सोईचे बर्थ मिळण्यावर भर, मोबाईल फोनच्या चार्जींग सुविधा, महिला प्रवाशांना सोईचे बर्थ, महिलांच्या सुरक्षिततेवर भर, रेल्वे गाडयांच्या स्वच्छतेवर भर, तिकिटे काढण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर यामुळे सामान्य माणसाच्या सोईचे अनेक प्रस्ताव या रेल्वे अर्थसंकल्पात मांडलेले आहेत.

३. सर्वसमावेशकतेवर भर- या रेल्वे अर्थसंकल्पात समाजातील प्रत्येक घटकाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यात गरीब आणि मध्यमवर्गीय समाजाच्या सोयी व सुविधांचा मोठया प्रमाणात विचार करण्यात आलेला आहे. बालके, वृध्द महिला, अंध, अपंग, या सर्वाचा विचार या रेल्वे अर्थसंकल्पात केला गेला आहे.

४. उद्योग व निर्यातीस प्रोत्साहन- देशातील बंदरे रेल्वेने जोडण्यावर या रेल्वे अर्थसंकल्पात भर दिल्याने उद्योग व निर्यातीत वाढ होईल.

५. ड्रोनसेवेचा वापर- देशाच्या दुर्गम भागातील रेल्वेचा विकास करताना कामाचा आढावा घेण्यासाठी तसेच मालवाहतुकीचा आढावा घेण्यासाठी ड्रोन सेवेचा वापर केला जाणार असल्याने दुर्गम भागाच्या विकासाच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

६. विम्याची सोय- आरक्षण करतानाच अपघात विम्याचा पर्याय दिल्याने विमा कंपन्यांच्या सहकार्याने प्रवाशांचा विमा उतरवला गेल्यामुळे रेल्वे अपघात प्रसंगी मृतांच्या वारसांना किंवा जखमीना मदत दिल्याने सुरक्षितता मिळाली आहे.

**रेल्वे अर्थसंकल्पावरील टीका किंवा कमतरतेच्या बाजू-**

१. नवीन काहीच नाही- या रेल्वे अर्थसंकल्पात ठोस उपाय योजण्याऐवजी केवळ शब्दांचाच खेळ करून जुन्याच योजना नव्या रूपात मांडण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे यात नवीन काहीच नाही अशी टीका केली जात आहे.

२. छुपी भाडेवाढ केली जाण्याची शक्यता- रेल्वेमंत्र्यांनी रेल्वे अर्थसंकल्प मांडताना कोणत्याही प्रकारची भाडेवाढ केलेली नाही असे म्हटले असले तरी वर्षभर कोणत्या ना कोणत्या तरी छुप्या मार्गाने भाडेवाढ केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. घटत्या इंधनांच्या किंमतीचा विचार केलेला नाही- जगभरातून इंधनाचे दर, कोळशाचे आणि तेलांचे दर कमी होत असताना रेल्वे भाडयात कपात होणे गरजेचे होते. पण अर्थसंकल्पात अशी भाडे कपात केली नसल्याने रेल्वे प्रवाशांच्या आर्थिक फायद्याचा विचार केला नाही.

४. समिश्र प्रतिसाद- पंतप्रधानांसह सर्व मंत्री आणि भाजप नेत्यांनी या रेल्वे अर्थसंकल्पाचे गुणगाण मोठया कौतुकाने केले आहे पण काँग्रेस व इतर विरोधी सदस्यांनी रेल्वे अर्थसंकल्पाबाबत नवीन काहीच नाही म्हणून नाराजी व्यक्त करून टीका केली आहे.

■■■

*लेखक आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर, ता. कडेगांव, जि. सांगली. येथे अर्थशास्त्र विभाग प्रमुख आहेत.*
email: profhonmane@gmail.com

## UPSC 2016-17

Prelim + Mains
Foundation Batch
Starts from : 4 July 2016
By : Ranjan Kolambe
& Bhagirath Team

## MPSC 2016-17


Prelim + Mains
Foundation Batch
Starts from : 4 July 2016
By : Ranjan Kolambe
& Bhagirath Team

## UPSC 2016 Prelim

**Test Series**
7 Subject wise Tests
3 Full Syllabus Tests (GS+CSAT)
Test + Detailed Discussion
in June-July 2016

## MPSC 2016 Prelim

**Test Series**
3 Full Syllabus Tests (GS+CSAT)
2nd Week of
March 2016




श्री. रंजन कोळंबे सर लिखीत
(आधुनिक भारताचा इतिहास) महाराष्ट्रात सर्वत्र उपलब्ध

## UPSC

ECONOMIC SURVEY OF INDIA
Lecture Series
In 3rd week of March 2016

Bhagirath IAS Academy
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे –३०.
फोन नं. : ०२० – ६४०१३४५०, ९९७०२९८१९७
*Web :* www.bhagirathacademy.com
*E-mail :* bhagirathacademypune@gmail.com
*Facebook :* Bhagirath IAS Academy

# रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर "प्रभू" कृपा

कैलास कोरडे



***अधिकृत आकडेवारीनुसार ५,६०१ किलोमीटर लांबीचे रेल्वेमार्ग महाराष्ट्रात असून या बाबत उत्तरप्रदेश आणि राजस्थाननंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, कोकण रेल्वे, दक्षिण-पूर्व रेल्वे आणि दक्षिण-मध्य रेल्वे अशा पाच वेगवेगळ्या रेल्वेंच्या हद्दीत हे जाळे विस्तारलेले आहे. तरीदेखील महाराष्ट्रातील अनेक भाग रेल्वेने जोडले गेलेले नाहीत. साहाजिकच त्यामुळे दरवर्षीच्या रेल्वे अर्थसंपकल्पाकडे महाराष्ट्र नव्या गाड्या, नवे रेल्वेमार्ग आणि नवे रेल्वे प्रकल्प या गोष्टींकडे नजर लावून असतो.***

कोणत्याही प्रदेशाच्या सर्वांगीन विकासामध्ये दळणावळणाचा महत्त्वाचा वाटा असतो. त्यातही रेल्वे हे अधिक प्रभावी, वेगवान आणि किफायतशीर माध्यम. त्यामुळे ज्या प्रदेशात रेल्वेचे जाळे मोठ्या प्रमाणात विनले जाते तेथे व्यापारउद्दीम आणि औद्योगिकीकरणाला आणि पर्यायाने विकासाला मोठी चालना मिळते. महाराष्ट्रातील औद्योगिकरणात रेल्वेचा सिहांचा वाटा आहे. किंबहुना त्यामुळेच इतकी वर्षे महाराष्ट्र अन्य राज्यांच्या तुलनेत आघाडीवर राहिला आहे, असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही.

देशात ६४,०१५ किलोमीटर लांबीचे रेल्वेजाळे आहे. रेल्वे बोर्डाच्या अधिकृत आकडेवारीनुसार ५,६०१ किलोमीटर लांबीचे रेल्वेमार्ग महाराष्ट्रात असून या बाबत उत्तरप्रदेश आणि राजस्थाननंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, कोकण रेल्वे, दक्षिण-पूर्व रेल्वे आणि दक्षिण-मध्य रेल्वे अशा पाच वेगवेगळ्या रेल्वेंच्या हद्दीत हे जाळे विस्तारलेले आहे. तरी देखील महाराष्ट्रातील अनेक भाग रेल्वेने जोडले गेलेले नाहीत. साहाजिकच त्यामुळे दरवर्षीच्या रेल्वे अर्थसंपकल्पाकडे महाराष्ट्र नव्या गाड्या, नवे रेल्वेमार्ग आणि नवे रेल्वे प्रकल्प या गोष्टींकडे नजर लावून असतो.

गतवर्षीपासून महाराष्ट्राच्या रेल्वे अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्याचे मुख्य कारण म्हणजे प्रदीर्घ काळानंतर महाराष्ट्राला लाभलेले रेल्वेमंत्रीपद. सुरेश कलमाडींनंतर प्रथमच देशाला महाराष्ट्रातील रेल्वेमंत्री मिळाला. अत्यंत अभ्यासू राजकारणी अशी ख्याती असलेल्या सुरेश प्रभू यांनी रेल्वे मंत्रीपदाची धुरा सांभाळली आहे. ज्या राज्यातील किंवा भागातील लोकप्रतिनिधी रेल्वेमंत्री बनतो, त्या भागावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करतो. हा इतिहास आहे. साहजिकच प्रभूदेखील महाराष्ट्राच्या पारड्यात झुकतं मापं टाकतील अशी जनतेची अपेक्षा होती.

पेशाने चार्टर्ड अकाऊंटंट असलेल्या प्रभूंनी गतवर्षी आपला पहिला रेल्वे अर्थसंकल्प सादर केला. रेल्वे अर्थसंकल्पात एकही नवी गाडी त्यांनी घोषित केली नाही. दरवर्षी नव्या गाड्या घोषित करण्याची हमखास वादग्रस्त ठरणारी प्रथा त्यांनी बंद केली. त्यामुळे तो रेल्वे अर्थसंकल्प 'पाथ ब्रेकिंग' ठरला. त्यात त्यांनी मुंबई महानगर परिसरातील उपनगरी प्रवास सुखकर करण्यासाठी

मुंबई शहरी वाहतूक प्रकल्पाचा सुमारे ११,५०० कोटींचा तिसरा टप्पा मंजूर केला . मात्र मुंबईव्यतिरिक्त महाराष्ट्र त्या अर्थसंकल्पात दूर्लक्षित राहिला.

गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र शासन सातत्याने रेल्वे मंत्रालयाकडून नव्या रेल्वेमार्गांच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करीत आहे. पुणे-नाशिक, मनमाड-धुळे-इंदौर, गडचांदूर-अदिलाबाद, कराड चिपळूण यासारख्या प्रकल्पांमध्ये खर्चाचा ५० टक्केपर्यंतचा वाटा उचलण्यास राज्य शासन तयार होते. तरीदेखील या प्रकल्पांना रेल्वे अर्थसंकल्पात स्थान मिळत नव्हते. नक्षलग्रस्त भागातील वडसा-गडचिरोली आणि गडचांदूर-अदिलाबाद हे प्रकल्प देशांतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यासाठी राज्याने प्रकल्पाच्या खर्चाचा २५ टक्के वाटा उचलण्याची तयारी दर्शविल्यानंतरही हे प्रस्ताव कित्येक वर्षे मंजुरीच्या प्रतिक्षेत राहिले.

***गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर दिघीसारखी काही खासगी नवीन बंदरे उभी राहिली आहेत व काही येऊ घातली आहेत. मात्र या बंदरांत उतरणारा माल देशाच्या कानाकोपर्‍यांत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेले रेल्वेजाळे उभे राहिलेले नाही. म्हणजे रत्नागिरीतील बंदरातील माल बंगलोरला न्यायचा असेल तर गोवा किंवा मुंबईमार्गे तो न्यावा लागतो. नेमकी याउलट परिस्थिती गुजरातमध्ये आहेत. बहुतांश बंदरे रेल्वेमार्गांनी जोडलेली असल्याने कंपन्यांचा तिकडे ओढा अधिक आहे.***

अन्य मार्गांच्या तुलनेत रेल्वेचा प्रवास अत्यंत स्वस्त, वेगवान आणि आरामदायी आहे. साहाजिकच त्यामुळे प्रवाशांचा रेल्वे प्रवासाकडे जास्त कल आहे. तिकिट काढण्याचा कालावधी चार महिन्यांपर्यंत वाढविल्यांतरही तिकीटविक्रीमध्ये फारसा फरक पडलेला नाही. जी प्रवासी वाहतुकीची, तीच गत मालवाहतुकीची आहे. त्यामुळे आपला भाग रेल्वेमार्गांनी जोडला जावा, अशी वाढती अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होते. लोकप्रतिनिधींकडून त्यासाठीही मागणी लावून धरली जाते. मात्र लोकप्रतिनिधींचे राजकीय वजन व कोणत्या पक्षाचे सरकार आहे, या निकषावर मग नव्या रेल्वेमार्गांच्या सर्वेक्षणांची रेल्वे अर्थसंकल्पातून घोषणा होते, हा आजवरचा इतिहास आहे.

महाराष्ट्रातही अशा नव्या रेल्वेमार्गांसाठी अनेकदा सर्वेक्षण-फेरसर्वेक्षण झाली आहेत. मात्र त्या प्रकल्पांना क्वचितच रेल्वे अर्थसंकल्पात स्थान मिळाले आहे. रेल्वेमार्गांचे सर्वेक्षण झाल्यानंतर नागरिक मात्र आशाळभूतपणे प्रकल्प घोषित होण्याची वाट पाहत बसतात. दुसरीकडे दलाल मंडळ त्याचा चांगला फायदा उठवतात. रेल्वेचा प्रकल्प येणार असल्याच्या नावाखाली लोकांना चढ्या भावात परिसरातील जमिनी विकतात. अमक्या, तमक्या ठिकाणी नवे रेल्वे स्थानक प्रस्तावित असल्याचे सांगून व तेथे अधिकार्‍यांकरवी सर्वेक्षणे घडवून आणून मुंबई, पुण्यासारख्या भागांत अनेक बिल्डरांनी सर्रास लोकांना घरे विकली आहेत. अर्थात या सर्व प्रकारात लोकांचा वा सरकारचा काही दोष नाही. मात्र या प्रकारांवरून रेल्वेचे लोकांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित होते.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर दिघीसारखी काही खासगी नवीन बंदरे उभी राहिली आहेत व काही येऊ घातली आहेत. मात्र या बंदरांत उतरणारा माल देशाच्या कानाकोपर्‍यांत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेले रेल्वेजाळे उभे राहिलेले नाही. म्हणजे रत्नागिरीतील बंदरातील माल बंगलोरला न्यायचा असेल तर गोवा किंवा मुंबईमार्गे तो न्यावा लागतो. नेमकी याउलट परिस्थिती गुजरातमध्ये आहेत. बहुतांश बंदरे रेल्वेमार्गांनी जोडलेली असल्याने कंपन्यांचा तिकडे ओढा अधिक आहे. त्यामुळे कोकण रेल्वेचा मार्ग चिपळूण-कराड व वैभववाडी-कोल्हापूरदरम्यान जोडला जावा, यासाठी राज्य शासनही प्रयत्नशील होते. दुसरीकडे राज्यात सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पांना पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने त्यांच्यासाठी पुरेसा निधी मिळावा, हीसुद्धा राज्य सरकारची रेल्वे अर्थसंकल्पाकडून ठरलेली अपेक्षा होती.

मुंबई महानगर क्षेत्रात झपाट्याने शहरीकरण झाले आहेत. विरार-वसई, पालघर-डहाणू, कर्जत-खोपोली, टिटवाळा-कसारा, कल्याण-डोंबिवली आणि पनवेल यासारख्या भागांतून मुंबईत सकाळ-संध्याकाळ अप-डाऊन करणार्‍यांची संख्या कमालीची वाढली आहेत. साहाजिकच रोज जवळपास ८० लाख प्रवाशांची ने-आण करणारी मुंबईची उपनगरी व्यवस्था अत्यंत तणावाखाली आहे. लोकलमधील तोबा गर्दी व दररोज रेल्वेमार्गांवर होणारे अपघात यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आहे. रेल्वे स्थानकांवर असलेली पायाभूत सुविधांची कमतरता आणि रखडलेले प्रकल्प यासारख्या गोष्टी त्यासाठी

कारणीभूत आहेत. ही परिस्थिती बदलावी यासाठी लोक कमालीची आग्रही आहेत व त्यासाठी प्रखर आंदोलनेही त्यांनी केली आहेत.

दक्षिणोत्तर पसरलेली मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थाही नेमकी तशीच विकसित झाली. म्हणजे मुंबईतच्या दक्षिण टोकावर असलेल्या बिझनेस डिस्ट्रिक्टमधील कार्यालयांत पोहोचण्यासाठी रोज सकाळी लाखो मंडळी उत्तरेकडील उपनगरांतून तिकडे प्रवास करतात. संध्याकाळी हाच प्रवास दक्षिणेकडून उत्तरेकडे असतो. त्यामुळे सकाळ संध्याकाळ लोकलमध्ये तोबा गर्दी उसळते. एकीकडे मुंबईतील गिरण्या,

***सुरेश प्रभूंनी रेल्वे अर्थसंकल्पात मुंबई वगळता उर्वरीत महाराष्ट्रासाठी तब्बल २८,८०० कोटींचे प्रकल्प मंजूर केले. पुणे-नाशिक, कोल्हापूर-वैभववाडी, मनमाड-मालेगाव-इंदौर, जेऊर-आष्टी, लातूर-लोहा-नांदेड, गडचांदूर-अदिलाबाद आणि जालना-खामगाव या नव्या रेल्वेमार्गांखेरीज जळगाव-भुसावळ दरम्यान चौथी रेल्वेमार्गिका, मनमाड-जळगाव तिसरी रेल्वेमार्गिका, वर्धा-नागपूर चौथी रेल्वेमार्गिका आणि दौंड-मनमाड दुहेरीकरण अशा तब्बल ११ नव्या प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. एका रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी इतके रेल्वेमार्ग मंजूर होण्याची, ही पहिलीच वेळ आहे.***

औद्योगिक कारखाने आणि बंदरातील उलाढाल जवळपास हद्दपार झाली आहे. गेल्या दीड-दोन दशकांत मुंबईत नवनवीन 'बिझनेस डिस्ट्रिक्ट' निर्माण झाले आहेत. देशाच्या या आर्थिक राजधानीमध्ये सेवा क्षेत्राने आता घट्ट पाय रोवले आहेत. साहाजिकच लोकांची दिवसभरात एका ठिकाणाहून दुसरीकडे पोहोचण्याची गरज झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे सकाळ संध्याकाळच्या वेळेपुरती मर्यादित असलेली लोकलची गर्दी सदासर्वकाळ झाली आहे.

भारतीय रेल्वेच्या विविध मार्गांवर धावणाऱ्या रेल्वेगाड्यांतून दररोज सुमारे १ कोटी ३० लाख लोक प्रवास करतात. त्यांपैकी ७५ लाखांहून जास्त लोक मुंबईच्या उपनगरी वाहतुकीचा वापर करतात. देशातील कोणत्याही राज्याच्या तुलनेत रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. त्यामुळे राज्यातील रेल्वे स्थानकांवर विविध प्रवासी व पायाभूत सोयीसुविधा पुरविण्याकडे अधिक लक्ष पुरविले जावे, अशी लोकांची अपेक्षा आहे.

यंदाचा आपला दुसरा रेल्वे अर्थसंकल्प २६ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर करताना सुरेश प्रभूंनी रेल्वे अर्थसंकल्पात मुंबई वगळता उर्वरीत महाराष्ट्रासाठी तब्बल २८,८०० कोटींचे प्रकल्प मंजूर केले. पुणे-नाशिक, कोल्हापूर-वैभववाडी, मनमाड-मालेगाव-इंदौर, जेऊर-आष्टी, लातूर-लोहा-नांदेड, गडचांदूर-अदिलाबाद आणि जालना-खामगाव या नव्या रेल्वेमार्गांखेरीज जळगाव-भुसावळ दरम्यान चौथी रेल्वेमार्गिका, मनमाड-जळगाव तिसरी रेल्वेमार्गिका, वर्धा-नागपूर चौथी रेल्वेमार्गिका आणि दौंड-मनमाड दुहेरीकरण अशा तब्बल ११ नव्या प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. एका रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी इतके रेल्वेमार्ग मंजूर होण्याची, ही पहिलीच वेळ आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण अशा सर्वच प्रदेशांना रेल्वेमंत्र्यांनी न्याय दिला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मात्र, यापैकी काही प्रकल्पांना केवळ रूपये १००० इतकेच मंजूर करण्यात आले असून, तेदेखील पूढील आदेश मिळे पर्यंत खर्च करू नयेत, अशी तळटीप आहे. त्यामागील अर्थ अद्यापही लागत नाही.

असो, पण प्रवासी वाहतुकीखेरील माल वाहतूक व आंतरिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या रेल्वेमार्गांचा यामध्ये समावेश आहे. यापैकी चार रेल्वेमार्ग रेल्वे राज्य शासनाशी भागीदारीतून होणार आहेत, इतर प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पाखेरीज अन्य मार्गांनी अर्थिक तरतूद केली जाणार आहे. दप्तर दिरंगाई टाळून रेल्वेचे प्रकल्प वेगाने मार्गी लावण्यासाठी रेल्वेने राज्य शासनांच्या सहभागाने 'स्पेशल पर्पज व्हेहिकल' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे प्रकल्प राबविण्यासाठी लवकरच ही 'एसपीव्ही' अस्तित्वात येण्याची शक्यता असून यंदा मंजूर झालेल्यांपैकी काही प्रकल्प तिच्याकडे सूपूर्द केले जाण्याची शक्यता आहे.

सात नव्या रेल्वेमार्गांचे सर्वेक्षणही नव्या बजेटमध्ये घोषित करण्यात आले आहे. त्यात गुलबर्गा-लातूर, टिटवाळा-मुरबाड, श्रीरामपूर-नेवासा, शेवगाव, गेवराई-परळी, नरखेड-वाशिम, बोधन-जलकोट-लातूर आदी मार्गांचा समावेश आहे. याशिवाय पेण-रोहा, पुणे-मिरज-कोल्हापूर, पनवेल-जसई, गोंदिया-नैनपूर-जबदपूर, मिरज-लोणंद आणि चाळीसगाव-धुळे या रेल्वेमार्गांच्या विद्युतीकरणालाही हिरवा कंदील मिळाला आहे. रेल्वेमार्गांवरील अपघात कमी

करण्यासाठी ६६ ठिकाणी रेल्वे पूल किंवा भूयारी मार्ग बांधण्यासाठी रेल्वे अर्थसंकल्पात निधी मंजूर करण्यात आला आहे. रत्नागिरी येथे उभारण्यात येणाऱ्या ३०० कोटींच्या रेल्वे कारखान्यासाठी ४० कोटींचा निधी तर बडनेरा येथील कारखान्यासाठी २० कोटींचा निधी बजेटमध्ये मिळाला आहे.

मुंबईसाठी रेल्वेमंत्र्यांनी चर्चगेट-विरार आणि सीएसटी-पनवेल उन्नत मार्गांची निविदा प्रक्रिया एका वर्षात पूर्ण करण्याची घोषणा रेल्वे अर्थसंकल्पात केली. खरे तर ही घोषणा कुणाच्या ध्यानीमनीही नव्हती. त्यामुळे त्यांची रेल्वे अर्थसंकल्पात झालेली घोषणा ही सर्वांसाठी आश्चर्याचा धक्का होती. हे दोन्ही प्रकल्प किमान पाच वर्षांपूर्वी घोषित झाले होते. सुमारे २३५०० कोटींची चर्चगेट-विरार उन्नत मार्ग पश्चिम रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला होता. तर ९,५०० कोटी रुपयांचा सीएसटी-पनवेल उन्नत मार्ग हार्बर मार्गावरील ताण कमी करून नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळाला रेल्वेने जोडण्याच्या उद्देशाने. राज्य शासनाच्या अपेक्षित प्रतिसादाअभावी दोन्ही प्रकल्पांची पूर्वतयारी जवळपास थंडावली होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट, असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचाही रेल्वेमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर करताना उल्लेख केला. हा भविष्यवेधी प्रकल्प जपान सरकारच्या मदतीने राबविण्यात येणार आहे. तर मुंबई-खरगपूरदरम्यान नव्या 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर'ची ही त्यांनी घोषणा केली. पूर्व-पश्चिम रेल्वे मालवाहतुकीच्या दृष्टीने ही घोषणा महत्त्वपूर्ण मानली जात आहे. याशिवाय रेल्वेमंत्र्यांनी सध्या मुंबईमध्ये सुरू असलेल्या मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प टप्पा-२ सह अन्य प्रकल्पांसाठी ७७१ कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. तरीदेखील मुंबईकरांची या रेल्वे अर्थसंकल्पाने निराशाच केली आहे.

दैनंदिन रेल्वे प्रवास सुकर करण्यासाठी रेल्वेमंत्र्यांनी अल्पमुदतीची कोणतीही ठोस उपाययोजना घोषित केली नाही. त्यामुळे मुंबईकरांना हा अर्थसंकल्प तितकासा रूचला नाही. याआधी मोनिका मोरे व त्यानंतर गेल्या वर्षी डोंबिवलीच्या २१ वर्षांच्या भावेश नकातेचा लोकलमधील गर्दीमुळे हात निसटून मृत्यू झाला. याशिवाय दररोज सरासरी ९-१० जणांचा मृत्यू उपनगरी मार्गांवर होत आहे. त्यामागील कारणांचा अभ्यास करण्यासाठी रेल्वेमंत्र्यांनी मध्य व पश्चिम रेल्वेवर दोन वेगवेगळ्या समित्याही स्थापन केल्या होत्या. मात्र कमी उंचीच्या सर्व फलाटांची उंची सुरक्षित पातळीपर्यंत वाढविण्याचे काम पुढील आर्थिक वर्षांत पूर्ण केले जाईल, या घोषणेखेरीज रेल्वे अर्थसंकल्पात दुसरी कोणतीही ठोस उपाययोजना घोषित झाली नाही.

वास्तविक, लोकलचे दरवाजे बंद करणे, उपनगरांतून विस्तारीत उपनगरांसाठी नव्या लोकल चालविणे, फलाटांची उंची वाढविण्याची कामे तातडीने पूर्ण करणे आणि आरामदायी वातानुकूलित रेल्वेगाड्या चालविणे यासारख्या उपाययोजनांची घोषणा मुंबईकरांना रेल्वे अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित होती. त्याशिवाय अत्यंत तणावाखाली असलेल्या हार्बर मार्गावर कँब सिग्नलिंगचा प्रकल्प रेल्वेमंत्री घोषित करतील अशी आशा होती. कँब सिग्नलिंगमुळे एका तासात १२ लोकल चालविता येत असतील तर त्यांची संख्या १८ ते २० पर्यंत वाढविली जाऊ शकते. कँब सिग्नलचा खर्च कमी असला तरी त्यासाठी पायाभूत गोष्टींमध्ये अनेक बदल करावे लागणार असल्याने हा प्रकल्प खर्चिक ठरणार आहे.

रेल्वे अर्थसंकल्प सादर करताना प्रभूंनी रेल्वे मालवाहतुकीच्या क्षेत्रात अनेक बदल प्रस्तावित केले आहेत. मध्यवर्ती राज्य म्हणून महाराष्ट्राला निश्चितच त्याचा जास्त लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. रेल्वेमंत्र्यांनी घोषित केलेल्या तेजस, हमसफर आणि उदय या वातानुकूलित व विनावातानुकूलित गाड्यांपैकी काही महाराष्ट्राच्या वाट्याला येतील. याशिवाय अनेक योजना व सोयीसुविधांची घोषणा प्रभूंनी रेल्वे अर्थसंकल्पातून केली आहे. त्यातून महाराष्ट्राला काय काय मिळेल, हे येत्या काही दिवसांत कळेलच. मात्र एकंदरित पाहता यंदाच्या अर्थसंकल्पात राज्याच्या वाट्याला हजारो कोटींचे नवे प्रकल्प आले आहेत. त्याशिवाय राज्यात येऊ घातलेल्या व सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पांसाठी सुमारे २४००-२५०० कोटींची तरतूद महाराष्ट्राला मिळाली आहे. आजवर रेल्वे अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मिळणाऱ्या निधीच्या तुलनेत ही रक्कम निश्चितच जास्त आहे. त्यामुळे यंदाच्या रेल्वेच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर प्रभू कृपा झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

■■■

*लेखक 'हिंदुस्तान टाईम्स'चे पत्रकार असून रेल्वे आणि सार्वजनिक वाहतूक या विषयाचे अभ्यासक आहेत.*
*email: kkorde@gmail.com*

# आर्थिक विकास आणि हवामानातील बदलाची किंमत

पुर्णमिता दास गुप्ता



***विकासातील निसर्गाची भूमिका समजून घेण्यासाठी महत्वाचा अतिरिक्त आयाम पुरवण्यात हवामानातील बदलाने मोठे योगदान दिले आहे, हवामानातील वैशिष्ट्यपूर्ण बदल व त्यांच्या परिणामांमुळे हे घडले आहे. हवामान बदलाच्या शास्त्राचे सुधारित आकलन आणि ग्लोबल वॉर्मिंगच्या विपरित परिणामांबाबत गेल्या दशकात शास्त्रज्ञामध्ये झालेली उच्च दर्जाच्या सहमतीचे आर्थिक विकासावरून विकास प्रक्रियेच्या शाश्वततेवर लक्ष वळवण्यात योगदान राहिले आहे.***

आर्थिक विकाससंबंधी विविध सिद्धांत आणि विवेचनांचे (माल्थुसिअन, शास्त्रीय, मार्क्सवादी आणि स्टिगलिझ आयोगासारखी अनेक) आर्थिक विकास म्हणजे काय, आर्थिक विकास निश्चित करणारे अत्यंत महत्वाचे घटक कोणते, आणि आर्थिक विकासाचा आढावा घेण्यासाठी प्रमुख निर्णायक घटक कोणते, याचे आकलन तयार करण्यात आणि उभारणी करण्यात महत्वाचे योगदान आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील नैसर्गिक साधनसंपत्तीची भूमिका आणि वरील प्रश्नांची उत्तरे देण्यातील त्यांचे महत्व नवी नाही.लोकसंख्या, मानवी भांडवल, सामाजिक भांडवल, साधनसंपत्तीची ईश्वरदत्त देणगी, तंत्रज्ञान, संस्था आणि राजकीय अर्थव्यवस्था हे घटक आर्थिक विकास समजून घेण्यात ठळकपणे महत्वाचे राहिले आहेत. विकासातील निसर्गाची भूमिका समजून घेण्यासाठी महत्वाचा अतिरिक्त आयाम पुरवण्यात हवामानातील बदलाने मोठे योगदान दिले आहे, हवामानातील वैशिष्ट्यपूर्ण बदल व त्यांच्या परिणामांमुळे हे घडले आहे. हवामान बदलाच्या शास्त्राचे सुधारित आकलन आणि ग्लोबल वॉर्मिंगच्या विपरित परिणामांबाबत गेल्या दशकात शास्त्रज्ञामध्ये झालेली उच्च दर्जाच्या सहमतीचे आर्थिक विकासावरून विकास प्रक्रियेच्या शाश्वततेवर लक्ष वळवण्यात योगदान राहिले आहे. शाश्वत विकासाच्या व्याख्या निश्चित करण्यात आल्या आहेत, त्यातही ही बाब प्रतिबिंबित झाली आहे. शाश्वत विकासाबाबत यूएनडीपीने तयार केलेल्या व्याख्येच्या व्यापक उच्चारणाचा (१९९५) उपयोग मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. स्वत:च्या गरजा भागवण्याच्या पुढील पिढ्यांच्या क्षमतेबाबत तडजोड न करता सद्यकालाच्या गरजा भागवणारा विकास (पर्यावरण आणि विकासावरील जागतिक आयोग,१९८७) अशी ती व्याख्या असून भविष्यातील वाढ आणि विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन गृहित धरले आहे. अगदी अलिकडेच संमत करण्यात आलेल्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये (एसडीजी) (संयुक्त राष्ट्रसंघ २०१५) हवामान बदलावरील उद्दिष्टाचाही स्पष्टपणे अंतर्भाव करण्यात आला आहे : हवामानातील बदल आणि त्यांच्या दुष्परिणामांचा मुकाबला करण्यासाठी त्वरित कृती

करणे. एसडीजीमधील हवामानातील बदलांविषयक उद्दिष्टात पहिलेच साध्य सर्व देशांतील हवामानाशी संबंधित संकटे आणि नैसर्गिक आपत्तींबाबत लवचिकता आणि परिवर्तनशीलता मजबूत करण्याचे आहे. वस्तुत:, इतरही अनेक उद्दिष्टे पर्यावरणाशी आंतरिक रित्या जोडलेले असून नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि त्यांचा शाश्वत वापर करण्याचे आवाहन केले आहे. मानवी समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप त्याचे कल्याण हेच असल्याचे तत्व लक्षात घेऊनच हे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.

हवामान बदलाच्या दृष्य आणि संभाव्य परिणामांवरील आयपीसीसीच्या ताज्या अहवालातील आढाव्यात सांगितल्यानुसार, अलिकडच्या अभ्यासांनीही हवामान बदलांच्या धोका जगभरातील सर्वच भागांना आहे, याचा पुरावा दिला आहे. जे समुदाय आणि पर्यावरणव्यवस्था अगोदरच कमकुवत आहे, त्यांच्यावर हवामान बदलाचे विपरित परिणामांची शक्यता भविष्यात जास्तच आहे. यात ग्रामीण भागातील गरीबांचा समावेश आहे, ज्यांची उपजीविका नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असते आणि अगोदरच ज्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे असे पर्यावरण आणि प्रजातींचा समावेश आहे. धोक्याचा स्तर कमी ते अतिउच्च असा व क्षेत्र व प्रदेशांनुसार वेगवेगळा आहे. उदाहरणार्थ, तापमानात एक डिग्री सेल्सियसने वाढ झाली तरी खडकावरील प्रवाळांना असलेला धोका अत्युच्च वाढतो. त्याउलट बहुतेक भागांत पीक उत्पादनाला तापमान वाढीमुळे होणारा धोका उच्च पातळीपर्यंत जात नाही. तापमानात दोन डिग्री सेल्सियसने किंवा त्यापेक्षा जास्त वाढ झाली तरीही पिकांना धोका नसतो. (आयपीसीसी एआर ५, २०१४)

आशिया खंडासाठी जे तीन प्रमुख धोके निश्चित करण्यात आले आहेत त्यात पायाभूत सुविधा, उपजीविकेची साधने व वसाहतींना असलेला पुराचा वाढता धोका, उष्णतेने होणारे मानवी मृत्यू आणि दुष्काळाशी संबंधित अन्न व पाण्याचा तुटवडा हे होत. (आयपीसीसी एआर ५, २०१४) थोडक्यात, हवामानातील बदलांमुळे हवामानाशी संबंधित धोक्यांच्या विद्यमान आकलनानुसार, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास आणि वाढीवर होणारा दुष्परिणाम या पद्धतीने आहे की, भारताचे सर्व प्रदेश आणि क्षेत्रांना त्यामुळे फटका बसेल.यात अनुमान करण्यात आलेले काही धोके नजीकच्या काळातच जाणवतील (२०४०) तर काही दीर्घकालात जाणवणार आहेत. (२१०० पर्यंत) पुराचा धोका आणि त्यामुळे होणाऱ्या नुकसानाचा विचार करता, भारत प्रचंड तीव्र नैसर्गिक आपत्तींमुळे सर्वाधिक धोका असलेल्या जगातील सर्वोच्च २० देशांमध्ये आहे आणि २०५० मध्ये समुद्रसपाटीपासून धोक्यात असलेल्या लोकसंख्येत ८० टक्के वाढ झाल्याचा अनुभव येईल. तसेच कोलकता आणि मुंबई ही दोन शहरे लोकसंख्या आणि मालमत्तेला असलेल्या धोक्याला सामोरे जाणारी असतील. उष्म्यामुळे येणाऱ्या ताणाचा कामगारांच्या उत्पादकतेवर विपरित परिणाम होईल आणि बांधकाम तसेच कृषी क्षेत्रातील क्रियाकलापांमध्ये जेथे कामगारांना कित्येक तास तीव्र उन्हात काम करावे लागते, तेथे उष्माघाताचा धोका वाढणार आहे. समुद्रकिनारे आणि पर्वतीय पर्यटनासारख्या अनेक क्षेत्रांवरही आर्थिक दुष्परिणाम होण्याची शक्यता असून मलेरिया व हगवणीसारख्या आजार वाढल्याने आरोग्याच्या दृष्टीनेही दुष्परिणाम जाणवतील.

परिस्थितीशी जुळवून घेण्याची कमी क्षमता, देशाचे भौगोलिक स्थान, नैसर्गिक संबंधित उपजीविकेवर मोठ्या संख्येने असलेल्या लोकसंख्येचे अवलंबून असणे हे पाहता भारतात हवामान बदलामुळे होणारे महत्वपूर्ण दुष्परिणाम अपेक्षित आहेत. तसेच कृषी क्षेत्रावर परिणाम होणार आहेत. हवेच्या वाढत्या तापमानामुळे अन्न सुरक्षा आणि धान्य उत्पादन व्यवस्थेवर अनुमानित परिणामांशी संबंधित अभ्यासांवरून आर्थिक परिणामांच्या तीव्रतेची कल्पना करता येऊ शकते. २०१० पर्यंत ज्वारी उत्पादनात २ ते १४ टक्क्यांपर्यंत घट होण्याचे अनुमान असून गंगेच्या खोऱ्यात तर २०५० पर्यंत उत्पादनात कमालीची घट होणार आहे तर सर्वाधिक अनुकूल क्षेत्रात गव्हाच्या उत्पादनात तब्बल ५१ टक्क्यांची घट होईल, असे अनुमान काढण्यात आले आहे. भात लागवडीच्या बाबतीत, सध्याचे तापमान हेच वाढीच्या अवस्थांमध्ये धोकादायक पातळी आताच गाठत असल्याचा दावा केला जात आहे. उदाहरणार्थ, उत्तर भारतात (ऑक्टोबर), दक्षिण भारतात (एप्रिल, ऑगस्ट) आणि पूर्व भारतात (मार्च ते जून). एका ताज्या अभ्यासानुसार, २०५० पर्यंत धान्य उत्पादनातील एकंदर घट ही १८ टक्के असेल (दासगुप्ता २०१३). एकूण, हे दुष्परिणाम व्यापक स्तरावरील असतील असे अनुमान असून लक्षणीय आर्थिक बोजा टाकू शकतील. संकटाच्या शक्यतांवर परिणाम करणाऱ्या घटकांमुळे धोक्याच्या

पातळीवर प्रभाव पडतो आणि जेव्हा असे संकट उद्भवते तेव्हा केलेल्या हस्तक्षेपांमुळे दुष्परिणामांची तीव्रता पुष्कळ कमी केली जाऊ शकते. यातील पहिला भाग हा ग्रीन हाऊसेस गॅसेसचे उत्सर्जन कमी करणाऱ्या क्रियाकलापांशी संबंधित असून दुसऱ्या भागात अशा घातक दुष्परिणामांना बळी पडणारी असुरक्षितता कमी करण्याच्या किंवा परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवण्याच्या पैलुंचा समावेश आहे. उपभोगाचा आकृतीबंध, लोकसंख्या वाढ, तंत्रज्ञान आणि ज्ञानाची उपलब्धता व संस्थात्मक क्षमता असे घटक परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमता व ग्रीन हाऊस गॅसेसच्या उत्सर्जनावर प्रभाव टाकू शकतात. हवामानातील बदलांना कसा प्रतिसाद द्यायचा, हे ठरवताना साधनसंपत्तीच्या वाटपातील प्राधान्यीकरण व आर्थिक धोरणात्मक साधनांचा उपयोग यानुसार आर्थिक निर्णय प्रक्रिया ही अत्यंत महत्वाची आहे. निर्णय प्रक्रियेत अनुमानित दुष्परिणामांची किंमत आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतांमध्ये वृद्धी व ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करण्यासाठी आवश्यक हे महत्वाचे इनपुट्स आहेत.

हवामान बदलाच्या आर्थिक किमतीचा विचार वेगवेगळ्या प्रकारे करता येईल. एकीकडे दुष्परिणाम हे अर्थव्यवस्थेला होणारे तोटे असून त्यांचा काळजीपूर्वक आढावा घेतला पाहिजे. दुसरीकडे, ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करणे आणि परिस्थिती अनुकूल करण्याच्या क्रियाकलापांद्वारे दुष्परिणाम कमी करण्याचीही किमत द्यावी लागणार आहेच. हे दोन्ही समान नाहीत, याची नोंद करणे आवश्यक आहे. हवामान शास्त्राने असेही पुरावे दिले आहेत की, यापैकी काही परिणाम अगोदरच जाणवू लागले असून काही परिणाम अपरिवर्तनीय असून काही प्रमाणात उष्णतामान वाढणे अटळ आहे. दुष्परिणाम कमी करण्यासाठीच्या कृतींसाठी पूर्ण क्षमतेने साधनसंपत्ती उपलब्ध असली तरीही परिस्थिती अनूकूल करण्याला (adaptation) मर्यादा आहेत.

उदाहरणार्थ, दीर्घकालात प्राप्त केलेली स्थिती अनुकूलनाची अगदी काल्पनिक उच्च अवस्था गृहित धरली तरीही उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्युच्या धोक्याची पातळी उच्चच राहते आणि दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या पाणी व अन्न टंचाई ज्यातून कुपोषण घडते. त्या संदर्भात स्थिती अनुकूलन उच्च प्रमाणात केले तर अल्पकालीन मुदतीत (२०३०-४०) धोक्याची पातळी कमी होते आणि २ ते ४ डिग्री सेल्सियस तापमान वाढीच्या परिस्थितीत दीर्घकालात (२०८०-२१००) धोक्याची पातळी कमी ते मध्यम राखता येते. उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या संकटांचा सामना करण्यासाठी जी उपाययोजना करावी लागेल,त्यात उष्म्यामुळे आरोग्याला निर्माण होणाऱ्या धोक्याचा इशारा देण्याची व्यवस्था, उष्णता बेटांची संख्या कमी करण्यासाठी शहर नियोजन आणि पर्यावरणात सुधारणा यांचा समावेश असेल. दुसऱ्या भागातील स्थिती अनुकूलनासाठी करावयाच्या उपायांमध्ये आपत्तीच्या पूर्वतयारी कार्यक्रमात गुंतवणूक, लवकर इशारे देणारी यंत्रणा आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या स्थानिक क्षमता मजबूत करणे यांचा समावेश आहे. (आयपीसीसी एआर ५ २०१४)

ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करण्याच्या परिप्रेक्ष्यातून हवामानातील बदलांमुळे आर्थिक विकासावर होणारा परिणाम व त्यांची किंमत याबद्दल विविध प्रकारचे प्रतिरुपे (स्द्‌ाते) वापरण्यात आले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत वरून खाली व खालून वर याप्रमाणे अनेक प्रकारचे प्रतिरुपे आणि एकीकृत आढावा प्रतिरुपांचा प्रयोग करण्यात आला आहे. याबाबत सर्वसाधारण दृष्टीकोन असा आहे की, हवामानातील बदलाचे आर्थिक विकासावर होणारे दुष्परिणाम उत्पादकतेत बदल, साधनसंपत्तीची ईश्वरदत्त देणगी, उत्पादन आणि उपभोगाचा आकृतीबंध यात होणाऱ्या बदलांच्या माध्यमातून अपेक्षिले आहेत. या अभ्यासांतून भविष्यासाठी पर्यायी परिदृष्ये तयार केली असून हवामान बदलासंदर्भात मिटीगेशनबाबत (ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करणे) नव्या धोरणाचा अभाव विरूद्ध ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करण्यासाठी लक्ष्य हे संदर्भ म्हणून परिदृष्य वापरण्यात आले आहे. हे परिदृष्य अंमलात आणण्यासाठी आवश्यक गुंतवणुकीच्या संदर्भात किंमत काढली गेली असून सहसा ती जीडीपीच्या टक्केवारीत मांडली जाते. आर्थिक किंमत मोजताना अर्थव्यवस्थेला जीडीपीचा होणारा तोटा म्हणून मोजली जाते. उद्दिष्टाची रचना या पद्धतीने केली आहे की, सर्वोच्च आर्थिक विकास साधताना मिटीगेशनचा खर्च कमीत कमी असावा.

संगणकीय आव्हानांवर मात करण्यासाठी बहुतेक सर्व प्रतिरूपे ही सुलभ गृहिते धरून थोड्या क्षेत्रांवरच लक्ष केंद्रित करतात आणि त्यामुळे अनेक पैलू वगळले जातात. अशा भूमिकेत सामाजिक आणि संस्थात्मक पैलू तसेच बिगर बाजारपेठीय

मूल्यांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती असते. विशिष्ट मुद्यांवर विचार करणारा क्षेत्रीय दृष्टीकोन उदाहरणार्थ अधिक स्वच्छ तंत्रज्ञान स्वीकारले असता एखाद्या विशिष्ट उद्योगाचा खर्च किती प्रमाणात वाढेल अथवा जागतिक बाजारपेठेत उद्योगाची स्पर्धात्मकतेला कितपत बाधा येईल, यावर विचार केल्यास अधिक तपशीलवार माहिती पुरवली जाते. सध्या हवामान बदलाच्या अर्थव्यवस्थानिहाय किंमतींच्या अंदाजांबाबत मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करण्याविषयी परिदृष्ये, कालबद्धता, तांत्रिक उत्पादकतेत वाढ व उर्जेविषयक क्षमता यांसारखी गृहितके यांसदर्भात तपशीलांमधील वैविध्यामुळे अंदाजांत तफावत आहे. पारीख (२००२) यांनी २००५ ते २०५० या दरम्यान साडेबारा टक्के जीडीपीत घट होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे तर शुक्ला व धर यांनी याच कालावधीसाठी जीडीपीत ६.७ टक्क्यांचे नुकसान होण्याचे भाकीत वर्तवले आणि प्रधान व घोष यांनी २०३० पर्यंत जीडीपीमध्ये १.१ ते १.३ टक्के घट होण्याचा अंदाज काढला आहे.

मिटीगेशनच्या धोरणांबाबत भारताने यूएनएफसीसीसीला (आयएनडीसी २०१५) सादर केलेल्या अहवालात २०३० पर्यंत बिगर इंधनाधारित उर्जा एकत्रित वीज निर्मिती क्षमता ४० टक्के साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. २०३० पर्यंत वनीकरण आणि वृक्षलागवडीतून बाहेर पडणाऱ्या कार्बन डायॉक्साईडमधून २.५ ते ३ अब्ज टन अतिरिक्त कार्बन नष्ट करण्याचा हेतू ठेवला आहे. याशिवाय, उर्जाक्षमता सुधारणे, १०० स्मार्ट शहरांमध्ये हवामानाला जुळवून घेणाऱ्या अशा लवचिक पायाभूत सुविधा उभारणे, सार्वजनिक परिवहन व्यवस्था विकसित करणे आणि अशाच काही पुढाकारांचा इतरही काही प्रतिसादांमध्ये समावेश आहे.

हवामानातील बदलांशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेची किंमत ठरवताना हवामानातील बदलांमुळे झालेले नुकसान व ते भरून काढण्यासाठी द्यावी लागणारी किंमत या संदर्भात बदलांच्या परिणामांचे मोजमाप करणे आवश्यक ठरते. स्थिर (static) विश्लेषण किंवा आदर्श तंत्राचा वापर करुन पैशांच्या स्वरूपात काढलेली किंमत ( कॉस्ट इफेक्टिव्हनेस ऍनालिसिस, कॉस्ट बेनेफिट ऍनालिसिस व इतर कॉस्ट संबंधित विश्लेषणे) असे पारंपरिक दृष्टीकोन अपुरेच ठरतात कारण त्यांत हवामान बदलांच्या विश्लेषणांच्या मध्यवर्ती स्थानी असलेल्या जोखीम व अनिश्चितता या पैलुंचा विचार करण्यात ते कमी पडतात. अशा पद्धतीने किंमत काढण्यासाठी अनेक पद्धतींचा वापर केला पाहिजे ज्यात कालाची मिती, नवीन आणि विभिन्न दृष्टीकोन तसेच इतरही निर्णयाला येण्यासाठी मदत करणाऱ्या साधनांचा समावेश असेल.

हवामानातील बदलांमुळे जगभरातील अर्थव्यवस्था आणि लोकसंख्यांवर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम होत असल्याचे अंदाज वर्तवले जात असल्याने प्रमुख चिंतेचा मुद्दा हा असतो की, हवामानाचे परिणाम अथवा त्यांना प्रतिसादांची किंमत ठरवताना अनिश्चितांनी भरलेल्या पर्यावरणीय व्यवस्थांनाही योग्य महत्व दिले पाहिजे. खर्च आणि फायद्यांचे मूल्यांकन करताना प्रत्येकांचे भिन्न मूल्य लक्षात घ्यायला हवे. (चेंबवेरा हील २०१४) कॉस्ट बेनेफिट विश्लेषण वापरणाऱ्या अर्थतज्ज्ञांपुढे अनेक वर्षांपासून हे एक आव्हान आहे परंतु अंदाजित प्रमाणाची व्याप्ती आणि परिणामांच्या विस्तारामुळे हवामान बदल वरील चिंतेचे मुद्दे अनेक पटींनी मोठे करून दाखवते. परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रक्रिया (ऍडाप्टेशन) व मिटीगेशनला प्रतिसादांची भरावी लागणारी किंमत ही तांत्रिक, व्यवस्थापकीय, कार्मिक आणि संस्थात्मक पासून ते संशोधन व विकासविषयी जागृती आणि क्षमतांची उभारणीपर्यंत इतकी विविधतापूर्ण असते.

ऍडाप्टेशन आणि मिटीगेशनचे नियोजन करताना आर्थिक मर्यादांनी बांधलेल्या अर्थव्यवस्था पर्याय निवडतात. लोकसंख्येला किमान दर्जाचे राहणीमान देण्यासाठी ठरवलेल्या अनेक उद्दिष्टे लक्षात घेऊन आपल्या कृतींची अपॉर्च्युनिटी कॉस्ट काढली जाते. भारतासारख्या विकसनशील देशात हवामान बदलाला प्रतिसाद देताना आर्थिक निर्णयप्रक्रियेचा जो संदर्भ वापरला जातो, तो अस्तित्वात असलेले बिगर हवामानविषयक अनेकविध तणाव आणि ऍडाप्टेशन, मिटीगेशन व शाश्वत विकास यांच्यातील आंतरिक संवाद यांना मान्यता देणारा असा असतो. ऍडाप्टेशन, मिटीगेशन व शाश्वत विकास यांच्यात समझोत्यासाठी ताळमेळ आणि अदलाबदली यातून केल्या जाणाऱ्या हवामान विषयक कृतीमुळे संशोधकांना सह-खर्च आणि सह-फायद्यांचे मूल्य काढणे शक्य होते.

ऍडाप्टेशन आणि मिटीगेशन किंमतींबाबत जागतिक स्तरावरील उपलब्ध अंदाजांमध्ये महत्वपूर्ण तफावत आहे. वातावरणात कार्बन डायॉक्साईड सोडण्याचा वाढीव परिणाम (कार्बनची सामाजिक किंमत) काही

डॉलर्स ते शेकडो डॉलर्स प्रतिटन कार्बन यादरम्यान असतात. गृहित धरलेले नुकसान आणि सवलतीचे दर यानुसार या अंदाजांत तफावत आढळते. त्याचप्रमाणे, विकसनशील देशांसाठी ॲडाप्टेशनची अंदाजित किंमत २०१० ते २०५० या दरम्यान प्रतिवर्ष ४ ते १०९ अमेरिकन डॉलर इतकी राहते. जागतिक स्तरावर ॲडाप्टेशनच्या गरजा आणि उपलब्ध निधी याबाबत मोठ्या प्रमाणावर तूट येते. (आयपीसीसी सिंथेसिस अहवाल)

आयएनडीसीला भारताने दिलेल्या अहवालात एडीबीच्या अभ्यासाचा हवाला देऊन असे म्हटले आहे की, २०५० पर्यंत भारतात हवामान बदलामुळे होणारे आर्थिक नुकसान व तोटा जीडीपीच्या १.८ टक्के इतका प्रतिवर्ष असेल. नीती आयोगाच्या अंदाजाचा दाखलाही त्यात दिला असून त्यानुसार, माफक प्रमाणात कार्बन विकसित होण्यासाठी आवश्यक असलेल्या मिटीगेशन कृतींचा खर्च २०३० पर्यंत ८३४ अब्ज अमेरिकन डॉलर इतका (२०११ च्या किंमतीवर आधारित) असेल. आयएनडीसीच्या म्हणण्यानुसार, २०१५ ते २०३० या कालावधीत कृषी, वने, मासेमारी पायाभूत सुविधा, आणि पर्यावरण व्यवस्था या क्षेत्रांमध्ये ॲडाप्टेशन कृतींसाठी २०६ अब्ज अमेरिकन डॉलर्स (२०१४-१५ च्या किंमतींवर आधारित) खर्च येणार असून आपत्ती व्यवस्थापनासाठी अतिरिक्त निधीची गरज लागणार आहे. भारतात बहुतेक सर्व ॲडाप्टेशन धोरणे हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजना आणि राष्ट्रीय मोहीम या चौकटींच्या अधीन राहूनच ठरवली जातात.

अलिकडच्या काही वर्षांत खर्च सोसण्यासाठी हवामान निधीची तरतूद करण्यासाठी लाभांश, नियमन आणि योग्य साधने पुरवण्यासाठी सार्वजनिक उपक्रमांनी भूमिका बजावावी, असा आग्रह धरण्यात आला आहे. (आयपीसीसी ए आर ५ २०१४) मूलभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्याची तरतूद, जैववैविध्याचे संवर्धन तसेच तंत्रज्ञान हस्तांतरणाचे सुलभीकरण, ज्ञानाचे आदानप्रदान आणि सामाजिक व आर्थिक विषमता यांचे निवारण याद्वारे हवामान बदलाचा मुकाबला करण्याची क्षमता व स्वायत्त ॲडाप्टेशन करुन किमान दर्जेदार राहणीमान पुरवण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका व सार्वजनिक उपक्रमांकडून निधी पुरवला जाणे अत्यंत महत्वाचे आहे.

▪▪▪


*लेखिका नवी दिल्ली येथील 'इनस्टिटूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ' मधील पर्यावरण अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख असून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्येही त्या अतिथी अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.*

email: purnamita@yahoo.com

## योजना मासिकाचे नवीन दरपत्रक

| एका अंकाची किंमत | विशेषांक | वार्षिक वर्गणी | दोन वर्षांसाठी वर्गणी | तीन वर्षांसाठी वर्गणी |
|---|---|---|---|---|
| रु. २२ | रु. ३० | रु. २३० | रु. ४३० | रु. ६१० |

योजना मासिकाची वर्गणी ऑनलाईन भरण्याची सुविधा www.bharatkosh.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या वेबसाईटवर जाऊन Publication Division e-store यथे क्लिक करून ऑनलाईन वर्गणी इंटरनेट बँकिंग/एटीएम/डेबिट कार्ड/क्रेडीट कार्डद्वारे भरता येईल. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत ऑनलाईन पैसे भरणाऱ्या वर्गणीदारांना त्याच महिन्यापासून अंक पाठविण्यात येईल आणि ५ तारखेनंतर वर्गणी भरणाऱ्यांना पुढील महिन्यापासून अंक पाठविले जातील.




## eJekeÀemeâ®ee eOMee- `mele'Yeej lece hekeÀuhe

Yeej lee®e helehe0eeve Þee. vej ê ceeoe ³ee®³ee nmle vekeÀle®e veJee eouuee ³eLe mele Yeej lece ³ee hekeÀuhee®e Yeceehepeve keÀj C³eele Deeue. `meleYeej lece' ³eepeveÜej oMeele jeäæ³e ceneceeie®ee ceeþî ee heceeCeeJej GYeej Cee, DeeJeM³ekeÀ leLe juJe heuee®ee yeeOeCee, meJe jeäæ³e ceneceeie juJe ¬eÀeemeie eJejenle DemeCe ³eeJej Yej eouee peeCeej Deen. juJe ¬eÀeemeieJej DemeCeeN³ee ceneceeieeJej eue Dehe leele Je peeJelenevee jeKeC³eemeeþe mele Yeej lece hekeÀuhe eJekeÀemele keÀj C³eele Deeuee Deen. mecee j 20,800 keÀe ì e ª he³e Ke®ee®³ee ³ee cenlJeekeÀe#ee hekeÀuheeleiele juJe G[ [eCeheue Je juJe Deleiele ³eCeej Ye³eeje ceeie yeeOeC³eele ³eCeej Deen. l³eeceU jeäæ³e ceneceeie juJe ¬eÀeemeie ceÊeÀ neC³eeyejeyej ®e juJe ¬eÀeemeieJej JeenlekeÀ KeeUyeC³ee®e hekeÀej LeeyeC³eeme ceole neFue DeeeCe heJeemee®ee Jeie Jee{ue. eMeJee³e juJe ¬eÀeemeieJej neCeeN³ee Dehe leeleevee DeeUe yemeC³eeme ceole neCeej Deen. ³eece0³e jep³eevene³e DeeOe heoMeele 33, Deemeecece0³e 12, eyenej ³eLe 20, í eÊeme ie[ jep³eele hee®e, iepejelece0eDe³e Deeþ, nej ³eeCeele one, encee®eue heoMe ³eLe hee®e, PeejKe[ ce0³e 11, keÀvee ì keÀ jep³eele 17, keÀjU jep³eele ®eej, ce0³eheoMe ³eLe mene, cenejeäle 12, Deee[Mece0³e ®eej, hepeeye jep³eele one, jepemLeeveele Je leeceUvee[ ce0³e hel³ekeÀe veT, GÊejeKe[ele oeve , GÊej heoMe veT DeeCe hee½ece yeieeue heeleele 22 Deme SkeÀCe 208 Ye³eejeceeie Je G[ [eCeheue yeeOeC³eele ³eleeue. ³ee hekeÀuhee®³ee meeJemlej heenCee DenJeeueevemeej Deeleehe³ele 208 hekeÀe 73 G[ [eCeheuee®³ee GYeej Ceemeeþe DeeOee®e cepeje eceUeueuee Demeve 2015-16 ³ee DeeeLekeÀ Je<ee®ee meeielee neC³eeheJee ³eehekeÀe 64 G[ [eCeheuee®³ee GYeej Ceemeeþe mecee j 500 keÀj e[ ª he³ee®³ee DeeeLekeÀ cepej eceUC³ee®e peJeUpeJeU vekekeÀe Deen. eJeMe<e oKeue leC³eepeiee yeeye cnCepe ³ee ³eepeveleiele ouee#ele leme®e ceeieeme heoMeele leeve npeej ekeÀueeceeì j®e jeäæ³e ceneceeie yeeOeue peeCeej Deenle. l³ee®eyej eyej he³e ì ve eJeYeeiee®³ee me®eveevemeej eJeeJeOe he³e ì vemLeU jeäæ³e ceneceeieeMee keÀMee pee [uee peeleeue ³eemeeþe he³elve keÀue peeCeej Deenle. ³ee®e he×leeve OeeecekeÀ mLeUne jeäæ³e ceneceeieeMee pee [C³ee®ee hemleeJe Deen. ³eeceU he³e ì veeuee leme®e OeeecekeÀ mLeUe®³ee ³ee$eevee DeeOekeÀ ®eeuevee eceUue DeeCe l³ee®ee hej Ceece l³ee l³ee Yeeiee®³ee eJekeÀemee®³ee ª heeve eomeve ³eFue.

mej Uele JeenlekeÀemeeþe De[e®e uewe®e jmle Ghe³eÊeÀ þj leele, DeMee he×lee®ee eve<keÀ<e mecee j Deeuee Demeve, lee ³ee ³eepevemeeþe Deej eKe[e le³eej keÀj leevee mecee j þJeuee peeCeej Deen. ³eeye eyej ®e mecee j 1500 peve Je cee [keÀUeme Deeueu³ee heuee®e veleveeekeÀj Ce keÀj C³ee®e keÀecene ³ee hekeÀuheeleiele ì hh³ee ì hh³eeve nelee leC³eele ³eCeej Demeve l³eemeeþe 30 npeej keÀe ì e ©he³ee®ee Ke®e Dehee#ele Deen. jeäæ³e jmle Je ceneceeie eJekeÀeme ce$eeueu³eekeÀ [ve ³eemeeþe meeJemlej hekeÀuhe DenJeeue le³eej keÀj CeeN³ee le%e meuueeieej e®³ee eve³eÊeÀeemeeþe eveeJeoe ceeieeJeC³ee®ee hee¬eÀ³eene DeeOee®e me ª keÀj C³eele Deeuee Demeve cee®e 2016 DeKej he³e le heehle Peeueu³ee eveeJeoeleve ³ee keÀeceemeeþe ³eei³e meuueeieej e®ee veceCekeÀ keÀj C³eele ³eFue.

...

Yojana Marathi (Monthly) March 2016
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2016-18
Published Date : 12th Mar., 2016
Date of Posting : 16th Mar., 2016




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.